# महाराष्ट्र विधानपरिषद

## तिसरे अधिवेशन, २०१७

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**बुधवार, दिनांक २६ जुलै, २०१७ / श्रावण ४, १९३९ ( शके )**

| | |
|---|---|
| **(१) मुख्यमंत्री**<br>**(२) गृहनिर्माण मंत्री**<br>**(३) कामगार, कौशल्य विकास, भूकंप पुनर्वसन, माजी सैनिकांचे कल्याण मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ११४**

---

### मुंबईसह देशभरातून अल्पवयीन मुलांची तस्करी करणारी टोळी पकडल्याबाबत

**(१) * ३३२५९ श्री.तानाजी सावंत :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईसह देशभरातून अल्पवयीन मुलांची तस्करी करणारी टोळी दिनांक २४ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास पोलिसांच्या गुन्हे शाखेने पकडल्याची घटना निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर घटनेची चौकशी करण्यात आली आहे काय, त्यातील दोषी व्यक्तीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे व अपहरण केलेल्या किती मुलांना त्यांच्या मुळ पालकांकडे सुपूर्द करण्यात आले आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे

(२) सदर प्रकरणी सहार पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. १२२/२०१७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असुन सदर गुन्हयाचा पुढील तपास गुन्हे शाखेचे जबरी चोरी दरोडा विरोधी पथक, गु.प्र.शा., गु.अ.वि.कुर्ला (प.), मुंबई हे त्यांचे गु.र.क्र.१७/२०१७ कलम ३७० (५), ४१९, ४२०, ४६५, ४६७, ४६८, ४७१, २०१, १२० (ब) भा.दं.वि. सह कलम १२ (१) (२) पारपत्र अधिनियम अन्वये करीत आहेत.

नमूद गुन्हयात एकुण १४ आरोपींना अटक करण्यात आली असून त्यांच्याकडून ४ अल्पवयीन मुलांना ताब्यात घेऊन त्यांच्या पालकांकडे सुपुर्द करण्यात आले आहे. गुन्हयाचा तपास सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**डोल्हारी (ता.दारव्हा, जि.यवतमाळ) येथील शेतकरी कुटुंबाने जिल्हाधिकारी कार्यालयात विष प्राशन करुन आत्महत्या करण्याचा प्रयत्न केल्याबाबत**

**(२) * ३११४५ श्री.हरिसिंग राठोड, श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डोल्हारी (ता.दारव्हा, जि.यवतमाळ) येथील शेतकरी कुटुंबाने दारव्हा पोलीस ठाण्याच्या ठाणेदाराच्या जाचाला कंटाळून जिल्हाधिकारी यवतमाळ कार्यालयात विष प्राशन करुन आत्महत्या करण्याचा प्रयत्न केल्याची घटना दिनांक २७ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दोन कुटुंबाचे वादाचे निरसन करण्याऐवजी दारव्हा येथील ठाणेदाराने पिडीत कुटुंबियांना ठाण्यातून हाकलून लावल्याने पिडीत कुटुंबियांनी शेवटचा मार्ग म्हणून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने दोषी ठाणेदार, मंडल अधिकारी, तलाठी यांचेविरूध्द चौकशी करून कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, मयत कुटुंबातील वारसांना आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) सदर प्रकरणाची चौकशी उपविभागीय पोलीस अधिकारी, दारव्हा यांनी केली असून त्यानुसार पोलीस स्टेशन दारव्हा येथील ठाणेदार यांनी आत्महत्येचा प्रयत्न करणाऱ्या इसमांवर वा त्यांच्या कुटूंबीयांवर कोणत्याही प्रकारचा दबाव आणलेला नाही असे आढळून आले. तसेच, सदर प्रकरणी चौकशी करण्यासाठी उपविभागीय दंडाधिकारी, यवतमाळ यांची न्यायदंडाधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आली असून सदर प्रकरणाची चौकशी सुरु आहे.

(४) सदर प्रकरणी आर्थिक मदत देण्याची बाब ही शासनाच्या प्रचलित नियमात बसत नसल्यामुळे, तसेच शेतकरी आत्महत्या या सदरात ही मोडत नसल्याने सदर मयताच्या कुटुंबियांना मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून आर्थिक मदत मिळण्यासाठी प्रस्ताव सादर करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## औरंगाबाद शहरातील भूमिगत गटार योजनेचे काम अपूर्ण असल्याबाबत

**(३) * ३२५२७ श्री.सुभाष झांबड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद शहरात भूमिगत गटार योजनेचे काम करण्यासाठी केंद्र व राज्य शासनाने महापालिकेला आतापर्यंत ७५० व ३५० कोटी रुपयांचा निधी दिला असून इतका निधी खर्च करुनही या योजनेचे २० टक्के काम अपूर्ण आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर या कामाच्या ठेकेदाराला पुढील दहा वर्षे देखभाल व दुरुस्तीसाठी महापालिकेला दरवर्षी रुपये ६ कोटी रक्कम द्यावी लागणार असल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, औरंगाबाद महापालिकेवर या अगोदरच मोठया प्रमाणावर कर्ज असताना त्यात इतकी मोठी रक्कम ठेकेदारास दिली जाणार असल्याने या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, तद्नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) अंशत: खरे आहे.

- केंद्र शासन पुरस्कृत युआयडीएसएसएमटी योजनेंतर्गत रुपये ३६५.६९ कोटीची औरंगाबाद शहर भूमिगत गटार योजना मंजूर आहे.
- सदर प्रकल्पासाठी केंद्र व राज्य शासन हिश्याचा रुपये २९२.५५ कोटी निधी महानगरपालिकेस वितरीत केला आहे.
- औरंगाबाद महानगरपालिकेने त्यांच्या हिश्यापैकी रुपये १८.२८ कोटी निधी उभा केला आहे.
- अशा प्रकारे औरंगाबाद महानगरपालिकेकडे एकूण प्राप्त रुपये ३१०.८३ कोटी निधीपैकी रुपये २४५.६७ कोटी खर्च झाला असून प्रकल्पाचे ७०% काम पूर्ण झाले आहे.

* सदर प्रकल्पाचे काम डिसेंबर, २०१७ पर्यंत पुर्ण करण्याचे औरंगाबाद महानगरपालिकेचे नियोजन आहे.

(२) प्रकल्पाच्या निविदेतील अटी व शर्तीनुसार देखभाल व दुरुस्तीसाठी प्रतीवर्ष रुपये ६.४३३ कोटी खर्च अपेक्षित आहे. सदरचा खर्च औरंगाबाद महानगरपालिकेस प्राप्त होणाऱ्या मलनिस्सारण करातून करण्याचे प्रस्तावित आहे.

(३) व (४) केंद्र शासनाच्या युआयडीएसएसएमटी योजनेच्या मार्गदर्शक सूचनेनुसार देखभाल व दुरुस्तीचा खर्च महानगरपालिकेने त्यांच्या करातून करणे क्रमप्राप्त आहे.

-----------------

**पालघर शहरातील धोकादायक इमारतीबाबत**

**(४) * ३२३०९ श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, ॲड.राहुल नार्वेकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर शहरातील १५ इमारती धोकादायक असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर इमारतीची शासनामार्फत पाहणी केली आहे काय, पाहणीचे निष्कर्ष काय आहेत व तदनुसार पालघर शहरात इमारती पडून जिवित व वित्तहानी होवू नये म्हणून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) पालघर नगरपरिषदेने नगरपरिषद हद्दीतील धोकादायक इमारतीची माहे एप्रिल मध्ये तपासणी केली असता, ७ इमारती धोकादायक असल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) धोकादायक इमारतीच्या मालकांना तसेच भोगवटादारांना इमारती रिकाम्या करण्याबाबत महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ च्या तरतूदी अन्वये नोटीशी बजावण्यात आल्या असून, स्थानिक वर्तमानपत्रामध्ये दिनांक ०४/०५/२०१७ रोजी जाहिर सूचना प्रसिध्द केलेली आहे.

तद्नंतर मुख्याधिकारी, पालघर नगरपरिषद यांनी दिनांक १३/०७/२०१७ रोजी केलेल्या प्रत्यक्ष पाहणीनुसार सदरहू इमारतीमध्ये पूर्वी ७२ रहिवासी रहात होते. वरील कार्यवाहीमुळे ५४ रहिवाश्यांनी अन्य ठिकाणी स्थलांतर केले असून, सद्यस्थितीत त्या ठिकाणी १८ रहिवासी रहात आहेत. त्यांनी सुध्दा सुरक्षित ठिकाणी स्थलांतरित व्हावे, याबाबत नगरपरिषदेकडून कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## राज्यातील कौशल्य विकास व उद्योजकता विभागाच्या कार्यकक्षेतील शिक्षक-शिक्षकेतरांच्या समस्यांबाबत

**(५) * ३१५७१ डॉ.अपूर्व हिरे, श्री.नागोराव गाणार : तारांकित प्रश्न क्रमांक २०२८५ ला दिनांक २० जुलै, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कौशल्य विकास व उद्योजकता विभागाच्या कार्यकक्षेतील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी खाजगी विनाअनुदानित शाळेत केलेली सेवा वरिष्ठ/ निवडश्रेणी तसेच कालबध्द पदोन्नतीसाठी ग्राह्य धरण्याबाबतच्या विचाराधीन असलेल्या प्रस्तावावर शासनाचा विचार पुर्ण झाला आहे काय,

(२) असल्यास, त्यानुषंगाने कोणता निर्णय घेण्यात आला आहे व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर :** (१), (२) व (३) सदर प्रस्ताव शासनाच्या अद्यापी विचाराधीन आहे. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने अधिक माहितीची आवश्यकता असल्याने सदर माहिती संकलित करण्यात येत आहे.

-----------------

## विक्रोळी येथे सुसज्ज न्यायालय सुरु करण्याबाबत

**(६) * ३३४७८ ॲड.अनिल परब :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विक्रोळी येथील कन्नमवार नगरामध्ये सन १९८९ पासून म्हाडाच्या दुकानांच्या इमारतीत रुपये १ लाख भाडे तत्वावर महानगरदंडाधिकारी यांचे न्यायालय सुरु आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या न्यायालयात सहा न्यायालय भरली जातात तसेच अडीचशे वकील आणि तेवढेच कर्मचारी काम करीत असल्याने न्यायालयासाठी ही जागा अपुरी पडत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या न्यायालयाच्या बाजूलाच आरक्षित असलेल्या सुमारे बाराशे चौरस मीटरच्या जागेत सुसज्ज असे न्यायालय सुरु करण्याचा प्रस्ताव विधी व न्याय विभागाच्या विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रस्तावाची सद्य:स्थिती काय आहे व उपरोक्त नवीन न्यायालय सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही. विक्रोळी येथील महानगर दंडाधिकारी न्यायालय, हे म्हाडाच्या इमारतीमध्ये भाडे तत्वावर सुरु नसून विधी व न्याय विभागाच्या मालकीच्या जागेत सदर न्यायालयाचे कामकाम सुरु आहे.

(२) हे अंशत: खरे आहे. प्रस्तुत न्यायालय विधी व न्याय विभागाच्या मालकीच्या जागेत सुरु असले तरी, सदरील न्यायालयास ही जागा अपुरी पडते.

(३) हे अंशत: खरे आहे. प्रस्तुत न्यायालयालगतचा भूखंड क्र. ३५६/अे-२, येथील सुमारे २०९८.७५ चौ.मी. क्षेत्र इतक्या जागेवर नवीन न्यायालयीन इमारत बांधण्याचे प्रस्तावित आहे. विधी व न्याय विभाग, शासन निर्णय क्र.सीसीबी-१११३/११६०/प्र.क्र.२१४/का.१३, दिनांक २२/५/२०१५ नुसार सदर कामास रुपये ४३,५०,९७,६६६/- इतक्या अंदाजित खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे.

(४) सदर न्यायालयासाठी आरक्षित भूखंड क्र. ३५६/अे-२ वर बृहन्मुंबई महानगरपालिकेने प्रारुप विकास योजना-२०३४ मध्ये, बहुउद्देशिय सामाजिक केंद्र असे आरक्षण दर्शविण्यात आले आहे. प्रारूप विकास योजना-२०३४ संबंधी पुढील वैधानिक कार्यवाही बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या स्तरावर सुरु असून बृहन्मुंबई महानगरपालिकेने प्रारुप विकास योजना-२०३४, नगर विकास विभागाच्या मान्यतेस्तव सादर केल्यानंतर महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ नुसार सदर भूखंड क्र. ३५६अे/२ न्यायालयासाठी आरक्षित करण्याबाबत आवश्यक प्रस्ताव विधी व न्याय विभागाकडून नगर विकास विभागास पाठविण्यात येईल. याबाबत मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

### निलंगा (जि.लातूर) येथील दौऱ्याच्यावेळी मा.मुख्यमंत्री महोदयांच्या हेलिकॉप्टरला झालेल्या अपघाताबाबत

**(७) * ३०९३१ श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) निलंगा (जि.लातूर) येथील दौऱ्याच्यावेळी मा.मुख्यमंत्री महोदयांच्या हेलिकॉप्टरला दिनांक २५ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास अपघात झाला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील हेलिकॉप्टरला झालेला अपघात हा स्थानिक प्रशासनाच्या सुरक्षेतेच्या अभावामुळे झाला हे प्रथमदर्शिनी चौकशीत निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरील घटनेची चौकशी करण्यात आली काय, त्यात काय आढळून आले, तद्नुसार दोषी असणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय
(२) व (३) सदरील घटनेबाबत केंद्र शासनाच्या अखत्यारीतील AAIB (Aircraft Accident Investigation Board) मार्फत चौकशी सुरु आहे. या चौकशीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात येईल. तथापि, जनहिताच्या दृष्टीने चौकशी होईपर्यंत अपघाताच्या वेळी असणारे पायलट कॅ.संजय कर्वे व सहपायलट कॅ.मोहित शर्मा यांचे लायसन्स हक्क निलंबित करण्यात आल्याचे Director, Air Safety, DGCA, New Delhi यांनी कळविले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नाशिक जिल्हयातील दलितवस्ती सुधार योजनेसाठी प्राप्त झालेला निधी जिल्हा प्रशासनाकडे पडून असल्याबाबत

**(८) * ३०९४८ श्री.जयवंतराव जाधव, श्री.अमरसिंह पंडित, श्री.धनंजय मुंडे, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक जिल्हयातील दोन महानगरपालिका व १५ नगरपरिषदा क्षेत्रातील दलितवस्ती सुधार योजनेसाठी प्राप्त झालेला सुमारे २६ कोटींचा निधी गेल्या दोन वर्षांपासून जिल्हा प्रशासनाकडे पडून आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) सन २०१४-१५ ते २०१६-१७ या मागील तीन वर्षात नाशिक जिल्हयातील महानगरपालिका व नगरपरिषदांना सदर योजनेंतर्गत शासनाकडून वितरीत एकूण रुपये ५६ कोटीपैकी रुपये २५.४० कोटी महानगरपालिका व नगरपरिषदांना वितरीत करण्यात आले आहेत. उर्वरित रुपये ३०.६० कोटीच्या अनुषंगाने निधी वितरणाची कार्यवाही जिल्हास्तरावर सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**औरंगाबाद येथे नगरसेवकाच्या घरी अभियांत्रिकी परीक्षेचा पेपर लिहिल्याच्या प्रकाराबाबत**

**(९) * ३१९९२ ॲड.जयदेव गायकवाड, श्री.धनंजय मुंडे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, ॲड.निरंजन डावखरे, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद येथे नगरसेवकाच्या घरी अभियांत्रिकी परीक्षेचा पेपर लिहिताना विद्यार्थांना दिनांक १६ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास अटक झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नूसार सदर नगरसेवकांवर तसेच परीक्षार्थी विद्यार्थ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) सदर प्रकरणी हर्सुल पोलीस स्टेशन येथे दिनांक१७/०५/२०१७ रोजी गु.र.नं.७५/२०१७ भा.दं.वि. कलम ४२०, १०७, १०९, ११४, १२०(ब), ३४ सह महाराष्ट्र विद्यापीठ शिक्षण मंडळ आणि इतर विशिष्ट परीक्षा मधील गैरव्यवहार प्रतिबंध कायदा १९८२ कलम ३(२), ४(२), ५(२), ६ आणि ८ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्ह्यात २३ विद्यार्थांसह एकूण ३३ आरोपींना अटक करण्यात आली असुन त्यातील ३१ आरोपींना मा. न्यायालयाने जामीन मंजुर केला आहे व दोन आरोपीं अद्यापही न्यायालयीन कोठडीत असुन गुन्ह्याचा तपास चालु आहे.

(३) विलंब झालेला नाही.

-----------------

**बाणेर (जि.पुणे) येथे रस्ता ओलांडताना झालेल्या अपघाताबाबत**

**(१०) * ३१३०४ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बाणेर (जि.पुणे) येथे रस्ता ओलांडताना दिनांक १७ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास भरधाव कारने उडविल्याने झालेल्या गंभीर अपघातात अडीच वर्षाची बालिका, तिची आई यांसह ८ जणांचा मृत्यू झाला असून यात इतर जण जखमी झाले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अपघात घटनास्थळी तात्काळ सेवा उपलब्ध असताना सदर अपघातग्रस्तांना रुग्णालयात पोहचविण्यास विलंब होण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून चालकावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच मृत्यू पावलेल्या व्यक्तीच्या परिवारांना कोणत्या स्वरुपाची मदत केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) दिनांक १७ एप्रिल, २०१७ रोजी बाणेर पुणे येथे रस्ता ओलांडण्यासाठी दुभाजकावर थांबलेल्या पादचाऱ्यांना भरधाव कारने उडविल्याने झालेल्या अपघातात एक तीन वर्षांची बालिका व तिची आई अशा दोघींचा मृत्यू झाला असून इतर तीन व्यक्ती जखमी झाल्या आहेत.
(२) अपघातग्रस्तांना स्थानिक लोकांनी उपचाराकरीता विनाविलंब रुग्णालयात दाखल केले आहे.
(३) दुर्घटनेतील मयत व अपघातग्रस्त हे बाणेरगांव कमान येथील रस्ता ओलांडण्याकरीता रस्त्याच्या दुभाजकावर थांबले असता आरोपी महिलेने भरधाव वेगाने व निष्काळजीपणाने कार चालवून त्यांना धडक देऊन तेथे न थांबता निघून गेली.

याप्रकरणी आरोपी महिलेविरुध्द चतु:श्रृंगी पोलीस स्टेशन येथे गु.र.क्र. २१५/२०१७, भा.दं.वि. कलम ३०४, ३०४(अ), २७९, २३८, मो.वा.का. कलम १३२ (१)(क), १७९, १८४, ११९/१७७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीस दिनांक १८/०४/२०१७ रोजी अटक करण्यात आली असून आरोपी सध्या जामीनावर आहे. आरोपीविरुध्द मा.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांचे न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

विम्याची रक्कम मिळणेकरीता मृत व्यक्तीच्या वारसास कागदपत्रे पुरविण्यात आलेली आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जुहू तारा रोड मुंबई येथील इस्टेला मद्यपान गृहामुळे नागरिकांना त्रास होत असल्याबाबत

**(११) * ३०९१३ श्री.नारायण राणे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जुहू तारा रोड, मुंबई येथील "इस्टेला" मद्यपान गृहामुळे परिसरातील नागरिकांना होत असलेल्या त्रासाबद्दल मुंबई पोलीस आयुक्तांना दिनांक ७ एप्रिल, २०१७ रोजी वा तत्पूर्वी सुद्धा तक्रार देऊनही आस्थापनेवर कारवाई करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, सदरहू आस्थापनेविरुद्ध किती कालावधीत कारवाई होणे अपेक्षित आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) जुहू तारा रोडवर पार्किंग होत असलेल्या वाहनावर कारवाई करण्यात आली असून यापुढेही कारवाई करण्यात येत आहे.

इस्टेला मद्यपानगृहाकडून राज्य उत्पादन शुल्क कायद्याचे, अग्निशमन कायद्याचे उल्लंघन होत असल्यास, त्याबाबत कारवाई करण्याबाबत राज्य उत्पादन शुल्क विभाग व चिफ फायर ऑफीसर, मरोळ यांना पोलीस विभागाकडून कळविण्यात आले आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## आमदार निवास, नागपूर येथे एका अल्पवयीन मुलीवर सामुहिक अत्याचार झाल्याच्या घटनेबाबत

**(१२) * ३०८९० श्री.धनंजय मुंडे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, ॲड.निरंजन डावखरे, श्री.हरिसिंग राठोड, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, श्री.अमरिशभाई पटेल :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आमदार निवास, नागपूर येथे एका अल्पवयीन मुलीवर सामुहिक अत्याचार केल्याची गंभीर घटना दिनांक १४ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त आमदार निवासात गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व्यक्तींचा उघड वावर असल्याच्या अनेक घटना यापूर्वीही निदर्शनास आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून आमदार निवास, नागपूर येथील कक्षाचा लोकप्रतिनिधीच्या शिफारस पत्राविना नियमबाहय पध्दतीने इतर खासगी व्यक्तिंना कक्ष देणा-या व यास जबाबदार असलेल्या व्यवस्थापक व अधिका-यावर व या प्रकरणातील आरोपीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

सदर घटनेबाबत पोलीस स्टेशन गिट्टीखदान अप क्र २१७/१७ कलम ३७६ (ड) ३४ भा.दं.वि. सह कलम ३, ४, ६ पोक्सा प्रमाणे गुन्हा दाखल करून गुन्हयातील २ आरोपींना अटक करण्यात आलेली आहे. सदर गुन्हयाचा तपास सुरू आहे.

(२) हे खरे नाही.

(३) असा प्रकार पुढे घडू नये याकरीता सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत पुढील उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत.

१. अभ्यागताचे ओळखपत्राची छायाप्रत उपलब्ध केल्या शिवाय कक्ष दिला जाणार नाही.
२. संबधित शाखा अभियंता यांनी प्रत्येक दिवशी रजिस्टर मधील नोंदी व आरक्षित करण्यात आलेले कक्ष याची प्रत्यक्ष पडताळणी करावी व प्रत्येक आठवड्यात दोन वेळा उपविभागीय अभियंता यांनी सुध्दा पडताळणी करावी.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## करमाळा (ता. कराड, जि. सातारा) येथे पोलिसांच्या मारहाणीत मृत्यू झाल्याबाबत

**(१३) * ३३३०७ श्री.परिणय फुके :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) करमाळा (ता.कराड, जि.सातारा) येथील संशयित रावसाहेब जाधव यांचा सुमारे सहा महिन्यापूर्वी कार्वे नाका पोलीस चौकीत पोलिसांच्या मारहाणीत मृत्यू झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर मृत्यूस जबाबदार संबंधित पोलीस अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

सदर घटना ही दिनांक १८/०६/२०१७ रोजी घडली आहे.

(२) सदर प्रकरणी दिनांक २०/०६/२०१६ रोजी कराड शहर पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. ३३२/२०१६ भा.दं.वि. कलम ३०२, ३६५, ३८६, ३२४, ३२३, ५०६, ३४ नुसार १२ आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मृत्यूस जबाबदार असलेल्या १ पोलीस अधिकारी व इतर १० पोलीस कर्मचारी यांना अटक करण्यात आली असून त्यांचेविरुध्द मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. तसेच, आरोपी पोलीस निरीक्षक अद्यापपर्यंत मिळून आलेले नसल्याने त्यांना फरारी घोषित करण्यात आले असून त्यांची मालमत्ता जप्तीची कारवाई सुरू आहे.

(३) विलंब झालेला नाही.

-----------------

## बृहन्मुंबई महानगरपालिकेची रुग्णालये सर्व सुविधांसह सक्षम करून रिक्त पदे भरण्याबाबत

**(१४) * ३२२५८ ॲड.राहुल नार्वेकर, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.सुभाष झांबड, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई शहर तसेच उपनगरातील महानगरपालिकेच्या रुग्णालयात कर्मचाऱ्यांची कमतरता, डॉक्टरांचा अभाव यामुळे नागरिकांच्या आरोग्यसेवेवर विपरीत परिणाम होवून रुग्णालयांची दुर्दशा होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विलेपार्ले येथील बाळासाहेब ठाकरे वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात १३८ व कुपर रुग्णालयात २९० डॉक्टर व अन्य रिक्त पदे भरण्यात आली नसल्याची माहिती माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुषंगाने महापालिकेची रुग्णालये सर्व सुविधांसह सक्षम करून रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस** : (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या ४ वैद्यकीय रुग्णालयांतील सन २०१६ मध्ये बाह्यरुग्ण विभागात एकूण ४७,१२,७५४ इतके रुग्ण उपचारासाठी आले होते. त्यापैकी २,२४,२८३ रुग्णांना रुग्णालयात दाखल करुन त्यांच्यावर वैद्यकीय उपचार करण्यात आले.

तसेच, १६ उपनगरीय रुग्णालयांतील बाह्यरुग्ण विभागात दररोज सरासरी १७,१६० रुग्ण उपचारासाठी येतात, त्यापैकी अंदाजे ५५० रुग्णांना रुग्णालयात दाखल करण्यात येऊन वेळोवेळी उपचार करण्यात येतात.

वैद्यकीय उपचारांकरिता येणाऱ्या रुग्णांची संख्या लक्षात घेता, महानगरपालिकेच्या प्रमुख रुग्णालये व उपनगरीय रुग्णालयांमधील उपलब्ध डॉक्टर्स व इतर कर्मचाऱ्यांवरील रुग्णसेवेच्या कामाचा भार वाढला आहे ही वस्तुस्थिती आहे.

महानगरपालिकेच्या प्रमुख रुग्णालये व उपनगरीय रुग्णालयांतील रुग्णांना पुढीलप्रमाणे सेवा देण्यात येतात:-

- सदर रुग्णांना २४ X ७ वैद्यकीय सेवा पुरविण्यात येते.
- आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील रुग्णांना उपचारासाठी वैद्यकीय समाजसेवक (MSW) यांचेमार्फत धर्मादाय संस्था यांचेकडून निधी उपलब्ध करुन दिला जातो.

(२) विलेपार्ले येथील बाळासाहेब ठाकरे वैद्यकीय महाविद्यालय व कुपर रुग्णालयातील डॉक्टरांची एकूण ३६६ पदे असून त्यापैकी ५४ पदे रिक्त आहेत, तसेच इतर कर्मचाऱ्यांची एकूण ११४१ पदे असून त्यापैकी २८२ पदे रिक्त आहेत.

(३) व (४) महानगरपालिकेच्या वैद्यकीय महाविद्यालयातील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

-----------------

**मलकापूर (ता.कराड, जि.सातारा) येथे स्वतंत्र पोलीस ठाणे स्थापन करण्याबाबत**

**(१५) * ३११११ श्री.आनंदराव पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मलकापूर (ता.कराड, जि.सातारा) येथे स्वतंत्र पोलीस ठाण्याचा प्रस्ताव गेली अनेक वर्षापासून प्रलंबित असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, वाढत्या गुन्हेगारीवर अकुंश ठेवण्यासाठी उभारलेल्या पोलीस चौक्या बंद करण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रस्तावावर निर्णय घेवून शासनाने येथे स्वतंत्र पोलीस ठाण्याची स्थापना करण्यासोबतच येथील बंद पोलीस चौक्या कार्यान्वित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) पोलीस अधिक्षक, सातारा यांच्याकडून दिनांक २१/०३/२०१४ च्या पत्रान्वये नवीन मलकापूर पोलीस ठाणे निर्माण करणेबाबतचा प्रस्ताव पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या कार्यालयास प्राप्त झाला होता. महाराष्ट्र पोलीस दलातील पदनिर्मितीच्या पाच टप्प्यांमध्ये मलकापूर पोलीस ठाणे निर्माण करणे प्रशासकीय कारणास्तव शक्य झालेले नाही. यास्तव पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी प्रस्तूत प्रकरणी सुधारीत प्रस्ताव सादर करण्याबाबत पोलीस अधिक्षक, सातारा यांना कळविले आहे.

(२) कराड शहर पोलीस ठाणे अंतर्गत मलकापूर पोलीस बीट असून आगाशिवनगर जिल्हा परिषद कॉलनी येथे चौकीचे कामकाज चालु आहे.

(३) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी मलकापूर पोलीस ठाणे निर्माण करणेबाबतचा सुधारीत प्रस्ताव पोलीस अधिक्षक, सातारा यांच्याकडून मागविला आहे. तसेच मलकापूर बीट बंद करण्यात आलेले नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे जिल्हयातील मुंढवा जॅकवेल प्रकल्पाबाबत

**(१६) * ३२३४५ श्री.अनिल भोसले : तारांकित प्रश्न क्रमांक १५११३ ला दिनांक १६ मार्च, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हयातील मुंढवा जॅकवेल प्रकल्पात नदीतील सांडपाण्यावर कोणतीच प्रक्रिया न करताच हे अशुध्द व दुर्गंधीयुक्त पाणी गेल्या दीड वर्षापासून कालव्यात सोडण्यात येत असल्याने शेतकरी व नागरिकांमध्ये असंतोष पसरला असल्याची बाब माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने पाहणी केली आहे काय, पाहणीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार या गंभीर बाबीकडे दुर्लक्ष करणाऱ्या प्रशासनातील अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२)

- पुणे शहरातून निर्माण होणाऱ्या सांडपाण्यावर मैलापाणी शुद्धीकरण केंद्रामध्ये प्रक्रिया केली जाते तथापि मैलापाणी शुद्धीकरण केंद्राची अपुरी संख्या व अपुरी क्षमता यामुळे संपूर्ण सांडपाण्यावर पूर्ण क्षमतेने प्रक्रिया होऊ शकत नाही.
- त्यामुळे प्रक्रिया न केलेले पाणी सोडले जाते व मुंढवा जॅकवेलद्वारे शेतीसाठी उपलब्ध होणारे पाणी काही अंशी दुर्गंधीयुक्त आहे ही वस्तुस्थिती आहे.
- तथापि मुठा उजव्या कालव्यामध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेले शेतीसाठीचे पाणी केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाचे नियम १९८६ नुसार ठरवून देण्यात आलेल्या मानकांची पूर्तता करणारे आहे.
- याबाबत संबंधीत ग्रामपंचायतीने दुषित पाण्याबाबत मा.राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणात मार्च, २०१६ मध्ये दावा दाखल केला आहे. प्रस्तुत प्रकरण सद्या मा.राष्ट्रीय हरित न्यायालयात न्याय प्रविष्ठ आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**औरंगाबाद येथील रेल्वे क्रॉसिंगकरीता एकनाथनगर उड्डाण पुल बांधण्याबाबत**

**(१७) * ३२४२३ श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद येथील रेल्वे क्रॉसिंगकरीता एकनाथनगर उड्डाण पुल बांधण्याचे नियोजन १२ वर्षापूर्वी करुन निधी अभावी पुलाचे काम प्रलंबित राहिल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार सदर उड्डाण पुलासाठी निधी उभारुन पुलाचे काम करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

औरंगाबाद येथील एकनाथ नगर उड्डाण पुल बांधण्यासाठी येणारा खर्च हा औरंगाबाद महानगरपालिका व एम.आय.डी.सी यांनी प्रत्येकी ५० % या प्रमाणात करण्याचा निर्णय महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेत सन २००६ मध्ये झाला होता.

तथापि, औरंगाबाद औदयोगिक क्षेत्र हे महानगरपालिकेस हस्तांतरित केल्यामुळे उड्डाणपुल बांधण्याच्या कामात आर्थिकदृष्टया सहभागी होणे शक्य नसल्याबाबत एम.आय.डी.सी. औरंगाबाद यांनी महानगरपालिकेस कळविले असल्यामुळे उड्डाण पुलाचे काम सुरु होऊ शकलेले नाही.

निधीच्या उपलब्धतेनुसार औरंगाबाद महानगरपालिकेमार्फत सदर उड्डाणपुलाचे काम हाती घेण्यात येईल असे औरंगाबाद महानगरपालिकेने कळविलेले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शिवडी (मुंबई) येथील क्षयरोग रुग्णालयातील विविध समस्यांबाबत

**(१८) * ३२३०१ श्रीमती हुस्नबानू खलिफे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिवडी (मुंबई) येथील महानगरपालिकेचे क्षयरोग रुग्णालय विविध समस्यांनी ग्रासले असून रुग्णालयातील ३० ते ३५ कर्मचाऱ्यांचा क्षयरोगाने मृत्यू झाला असल्याचे दिनांक २३ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अपुरे कर्मचारी व डॉक्टर, शवागृहाची दयनीय अवस्था, वॉर्डपासून शवागृहापर्यंत शेड नसल्याने मृतदेहाला उन्हात-पावसात भिजत न्यावे लागत असून महानगरपालिकेची रुग्णवाहिका सेवा नाही, पोलीस बिट सुध्दा नाही या अशा अनेक गैरसोयी असूनही संबंधित आवश्यक उपाययोजना करण्याऐवजी दुर्लक्ष करीत असल्याने रुग्णांची व रुग्णालयात कार्यरत कर्मचारी व डॉक्टर यांची गैरसोय होत असल्याने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) शिवडी येथील क्षयरोग रुग्णालय येथे गेल्या ७ वर्षांत २९ कर्मचाऱ्यांचा क्षयरोगाने मृत्यू झालेला आहे ही वस्तुस्थिती आहे.

(२) सदर प्रकरणी महानगरपालिकेमार्फत पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे :-

- क्षयरोग रुग्णालयातील कामगारांची रिक्त पदे भरण्यात येत असून त्याबाबत पाठपुरावा करण्यात येत आहे.
- वेळोवेळी जाहिरात देऊनही उमेदवार उपलब्ध झाले नसल्यामुळे डॉक्टरांच्या रिक्त पदांच्या जागी बंधपत्रित डॉक्टर, सीपीएस मार्फत पदविका करणारे डॉक्टर तसेच, विशेष वैद्यकीय सल्लागार यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

- शवागृहाची दुरुस्ती सन २०१३ मध्ये करण्यात आली असून वॉर्डपासून शवागृहापर्यंत शेड उभारण्याची आवश्यक ती कार्यवाही सुरु आहे. सदर काम मे, २०१८ पर्यंत पूर्ण करण्यात येणार आहे.
- सद्य:स्थितीत मृतदेह स्टीलच्या कव्हरमध्ये आच्छादित करुन स्ट्रेचर ट्रॉलीवरुन शवागृहात नेण्यात येतो.
- क्षयरुग्णांना इतर रुग्णालयात आवश्यकतेनुसार स्थलांतरीत करण्यासाठी भाडेतत्वावर (२४ x ७) रुग्णवाहिकेची व्यवस्था करण्यात आली आहे.
- क्षयरोग रुग्णालयास पोलीस मदतीची आवश्यकता भासल्यास ती रफी अहमद किडवाई मार्ग पोलीस ठाणे यांचेमार्फत त्वरीत उपलब्ध होते.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

**खार (मुंबई) येथे झोपडपट्टी पुनर्वसन योजनेमध्ये विकासकाने गैरव्यवहार केल्याबाबत**

**(१९) * ३१००९ आर्कि.अनंत गाडगीळ : तारांकित प्रश्न क्रमांक २८१४६ ला दिनांक २२ मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खार (मुंबई) येथील १६ व्या रस्त्यावर मोरदानी सिग्नेचर या आलिशान टॉवरसाठी झोपडपट्टी पुनर्वसन योजनेचा भूखंड दाखवून एफएसआय लूटण्याचा प्रकार विकासकाने केल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वांद्रे-खार मध्ये झोपडया नसतानाही झोपडपट्टी पुनर्वसन योजना म्हणून परवानगी घेऊन एफएसआय लाटण्याचा प्रकार विकासकांकडून केला असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तद्नुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता :** (१) व (२) हे खरे नाही.

सदरची योजना बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावलीतील विनियम ३३(१०) अंतर्गत झोपडपट्टी पुनर्वसन योजना नसून विनियम ३३(१४) अंतर्गत मोकळया भूखंडावर कायमस्वरुपी संक्रमण गाळे (PTC) बांधून देण्याबाबतची योजना आहे.

(३) व (४) बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावली, १९९१ च्या ३३(१४) अंतर्गत नगर विकास विभागाच्या दिनांक ३१/१०/२००८ रोजीच्या आदेशातील तरतुदीनुसार प्राधिकरणाकडून विकासक के.मोरदानी यांच्या खार येथील ५ योजनांचे जोगेश्वरी (पूर्व) येथील योजनेसोबत एकत्रिकरण करण्यास मंजूरी देण्यात आली आहे. त्यानुसार विकासकास खार येथील १७ कायमस्वरुपी संक्रमण शिबीराचे ४१९.३६ चौ.मी. क्षेत्र जोगेश्वरी (पूर्व) येथे व तेवढेच जोगेश्वरी (पूर्व) येथील विक्री घटकाचे क्षेत्रफळ खार येथे स्थलांतरीत करण्यास अनुमती देण्यात आली आहे. सदरहू परवानगीच्या अनुषंगाने उपरोक्त नमुद शासन आदेशातील तरतुदीनुसार विकासकाकडून रुपये ३,०४,३५,८७३/- इतकी रक्कम वसुल करण्यात आली आहे. तथापि, विकासकाने जोगेश्वरी येथील मिळकतीवर कायमस्वरुपी संक्रमण शिबीरातील १७ सदनिका बांधून न दिल्यामुळे मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांनी दिनांक ०२/०१/२०१७ रोजी पारित केलेल्या आदेशास अनुसरुन विकासकाच्या विक्री घटकाच्या गाळ्यांची नोंदणी करण्यात येवू नये, असे दिनांक २३/०१/२०१७ रोजीच्या पत्रान्वये अतिरिक्त नियंत्रक (मुद्रांक शुल्क) यांना झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने कळविले असून विकासकाच्या विक्री घटकातील बांधकामास झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने दिनांक २४/०१/२०१७ रोजी स्थगिती दिली आहे.

तसेच या प्रकरणी विकासकाविरुध्द तातडीने एमआरटीपी कायद्याखाली गुन्हा नोंद करण्याबाबत दिनांक १०/०३/२०१७ च्या पत्रान्वये झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणास कळविण्यात आले होते. त्या अनुषंगाने सदर प्रकरणी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडून चौकशी करण्यात आली आहे व विकासक व वास्तूविशारद यांच्यावर LOI व IOA मध्ये अंतर्भूत असलेल्या तरतुदीनुसार कायमस्वरुपी संक्रमण शिबीरे (PTC) बांधून झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या ताब्यात न दिल्यामुळे एमआरटीपी कलम ५३(१) अंतर्गत एमआरटीपी नोटीस देण्यात आली असून विकासक व वास्तूविशारद यांच्यावर FIR दाखल करुन घेण्यासाठी वरिष्ठ पोलीस निरिक्षक, खार पोलीस स्टेशन यांना दिनांक ०७/०७/२०१७ च्या पत्रान्वये कळविले असल्याचे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचा अहवाल आहे.

----------------

## बीड शहरात बाजारतळाची व्यवस्था करणेबाबत

**(२०) * ३३२२१ श्री.विनायकराव मटे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड शहरातील भाजी मंडईत विक्रेत्यांना बसण्यासाठी जागा नसल्याने राष्ट्रीय महामार्ग व शहरातील मुख्य रस्त्यावर भाजी विक्रेते बसतात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आठवडी बाजार आणि मंडईतील भाजी विक्रेते यांच्यामुळे शहरातील वाहतुकीला अडथळा निर्माण होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून शहरातील भाजी विक्रेते व आठवडी बाजारासाठी बाजारतळाची व्यवस्था करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

प्रामुख्याने आठवडी बाजाराच्या दिवशी रस्त्यांवर भाजी विक्रते बसल्याचे आढळून येते.

आठवडी बाजाराच्या दिवशी रहदारीस अडथळा निर्माण होवू नये यादृष्टीने रस्त्यावर बसणाऱ्या भाजी विक्रेत्यांना हटवून आठवडी बाजारात बसविण्याची कार्यवाही नगरपरिषदेकडून करण्यात येते.

(३) बीड नगरपरिषदेने आठवडी बाजारासाठी बाजारतळ व महात्मा फुले भाजी मंडई (सटवाई मैदान) येथे अनुक्रमे २६ व ६४ ओटे भाजी विक्रेत्यांकरीता बांधलेले असून बाजारतळ येथे आठवडी बाजाराची व्यवस्था केली आहे.

बीड शहरातील सिध्दी विनायक कॉम्प्लेक्स येथे अद्यावत भाजी मंडई नगर परिषदेकडुन कार्यान्वित करण्यात येत आहे.

केंद्र शासनाच्या पथविक्रेता (उपजीविकेचे संरक्षण व पथविक्री विनियमन) नियम, २०१४ नुसार राज्य शासनाने शासन निर्णय दिनांक ९ जानेवारी, २०१७ अन्वये योजना तयार केली असून त्याच्या अंमलबजावणीबाबत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना सुचना दिलेल्या आहेत.

विक्री प्रक्षेत्रे (फेरीवाला क्षेत्र) निर्धारीत करण्यासाठी पारंपारीक आठवडी बाजारांची ठिकाणे देखील विचारात घेऊन विहीत शर्ती व निर्बंधाच्या अधीनतेने रस्त्यावरील विक्रीसाठी परवानगी देण्याची तरतुद या योजनेत केलेली आहे.

सदर योजनेनुसार बीड नगरपरिषदेच्या स्तरावर मुख्याधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील नगर पथविक्रेता समिती कडुन विक्री प्रक्षेत्रे आणि ना-विक्री प्रक्षेत्रे निश्चित करणे आवश्यक आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सागर इन्व्हेस्टमेंट या कंपनीने गुंतवणुकदारांचे कोट्यवधी रुपयांची फसवणूक केल्याबाबत

**(२१) * ३२८४८ श्री.रविंद्र फाटक, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बदलापूर, कल्याण, डोंबिवली, ठाणे आणि महाराष्ट्रातील इतर महत्वांच्या शहरांमध्ये गेल्या काही वर्षापासून विविध गुंतवणुकदारांचे कोटयवधी रुपये घेऊन त्यांना बँकापेक्षा अधिक व्याज देण्याचे आमिष दाखवून गुंतवणुकीचा व्यवसाय करणाऱ्या सागर इन्व्हेस्टमेंट या कंपनीच्या संचालकांवर माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सागर इन्व्हेस्टमेंट या कंपनीमध्ये गुंतवणूक करणाऱ्या गुंतवणुकदारांचे पैसे परत मिळण्याबाबत शासनस्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर गुन्ह्यातील ४ आरोपींनी संगनमत करुन सागर इन्व्हेस्टमेंट नावाच्या विना नोंदणी कंपनीमध्ये वार्षिक १८ टक्के रकमेचा परतावा देण्याचे आमिष दाखवून मुदत ठेवीची मुद्दल रक्कम त्यावरील परतावा परत न करता फसवणूक केल्याबाबत दिलेल्या तक्रारीवरुन, बदलापूर पोलीस स्टेशन (पूर्व) येथे गु.र.क्र. ६०/२०१७ भा.दं.वि. कलम ४०६, ४०९, ४२०, २०१, १२० (ब) सह कलम ३ महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय संस्थांमधील) हितसंबंधाचे संरक्षण अधिनियम, १९९९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला असून सदर गुन्ह्याचा तपास सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पोलीस कर्मचाऱ्यांकरिता घर खरेदी करण्यासाठी किंवा बांधण्यासाठी व्याज सवलतीची कर्ज योजना राबविण्याबाबत

**(२२) * ३३७९५ श्री.जनार्दन चांदूरकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईसह राज्यातील पोलीस कर्मचाऱ्यांना मालकी हक्काचे घर खरेदी करण्यासाठी किंवा बांधण्यासाठी व्याज सवलतीची कर्ज योजना राबविण्याचा निर्णय गृह विभागाने घेतला असल्याचे दिनांक १२ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सध्या पोलिसांच्या संख्येच्या प्रमाणात पोलीस वसाहतीतील घरांची संख्या कमी आहे यामुळे प्रश्न भाग (१) मधील निर्णय शासनाने घेतला असून याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे. दिनांक १०/०४/२०१७ रोजी शासन निर्णय निर्गमित केला आहे.
(२) पोलीस महासंचालक, मुंबई कार्यालयातील पोलीस कर्मचाऱ्यांचे घरबांधणी अग्रीम मंजूरीसाठीचे प्रलंबित प्रस्ताव विचारात घेवून सदर निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ यांचेकडून घरबांधणीसाठी विविध बँकाकडून व्याज दर मागविण्यात आले असून सर्वात कमी व्याजदर देणाऱ्या संस्थांशी करार केला जाईल. बँकेकडून गृहकर्जावर आकारण्यात येणारे व्याज आणि शासकीय गृहकर्जावरील व्याज यामधील फरकाची रक्कम शासनाकडून अदा करण्यात येणार आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

## मुंबईतील पवई, हिरानंदानी येथील स्वामीनारायण मंदिर मार्गाच्या कामामध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत

**(२३) * ३३५०५ श्री.रामनिवास सिंह :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील पवई, हिरानंदानी येथील स्वामीनारायण मंदिर मार्गाच्या कामामध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत लोकप्रतिनिधीनी दिनांक ४ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास मा.नगरविकास राज्यमंत्री यांना पत्रव्यवहार करुनही कोणतीच कार्यवाही झाली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रस्त्याचे काम स्थानिक विकास कार्यक्रमाच्या अंतर्गत निधीमधून करण्यात आले असून काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाल्याने रस्त्यातील खड्डयांमुळे नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त रस्त्याच्या कामाची चौकशी करण्यात आली आहे काय, त्यात काय आढळून आले, तद्‌नुसार यास जबाबदार असणाऱ्या व्यक्तीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) पवई, हिरानंदानी येथील स्वामीनारायण मंदिर मार्गाच्या कामामध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत लोकप्रतिनिधीनी मा. राज्यमंत्री (नगर विकास) यांना निवेदन दिले आहे ही वस्तुस्थिती आहे.

तथापि, सदर रस्त्याच्या कामाबाबतचा तपशील महानगरपालिकेमार्फत दिनांक १२/०५/२०१७ रोजीच्या पत्रान्वये लोकप्रतिनिधींना अवगत करण्यात आला आहे.

(२) व (३) सदर रस्त्याचे काम बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या भांडवली निधीतून करण्यात येत असून आतापर्यंत ८०% काम पूर्ण झाले आहे. सदर रस्त्याचे काम पूर्ण करण्याचा कालावधी दिनांक ३०/११/२०१७ पर्यंत आहे.

नव्याने बांधण्यात आलेल्या सदर रस्त्यावर कोणताही खड्डा पडल्याचे आढळून आलेले नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## हिंगोली नगरपरिषद कार्यक्षेत्रात रस्त्यावरील पथदिवे बंद असल्याबाबत

**(२४)** * **३२२८३ श्री.रामराव वडकुते :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली नगरपरिषद कार्यक्षेत्रात रस्त्यावरील पथदिव्यांचे वीज देयके भरले नसल्याने महावितरण कंपनीने माहे मे, २०१७ पासून वीज पुरवठा खंडीत केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे रस्त्यावर अंधार पसरत असून रात्रीच्यावेळी तेथील जनतेला नाहक त्रास होऊन चोऱ्या होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय. पथदिव्यांचे थकीत वीज देयक भरणा न केल्यामुळे दिनांक ६ व ७ मे, २०१७ रोजी पथदिव्यांचा वीज पुरवठा खंडीत होता.

नगर परिषदेने दिनांक ८ मे, २०१७ रोजी थकीत विद्युत देयकापैकी रुपये १० लक्ष रकमेचा भरणा करुन पथदिव्यांचा वीज पुरवठा सुरु केला आहे. सध्या पथदिवे सुस्थितीत चालू आहेत.

(२) उक्त दिनांक ६ व ७ मे, २०१७ या कालावधीत हिंगोली शहरात चोऱ्या अथवा तत्सम घटना घडल्याचे निदर्शनास आले नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**कळंब शहरातील पोलीस वसाहतीची दुरवस्था झाल्याबाबत**

**(२५) * ३३६९५ श्री.सुजितसिंह ठाकूर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळंब शहरासह लगतच्या २६ गावातील कायदा व सुव्यवस्थेची जबाबदारी असणाऱ्या कळंब पोलीस ठाण्यातील कर्मचा-यांच्या वसाहतीची दुरवस्था झाल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त वसाहतीचे ढासळलेले प्लास्टर, जीर्ण झालेल्या भिंती, असे जुने दगडी बांधकाम असलेल्या वसाहतीमध्ये पोलीस कर्मचारी राहत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वसाहतीच्या दुरुस्तीबाबत संबंधितांकडे मागणी करुनही त्याकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तद्नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३), (४) व (५) पोलीस ठाणे कळंब येथे पोलीस अधिकारी/ कर्मचारी यांच्याकरीता ५६ निवासस्थाने बांधण्याबाबतचा प्रस्ताव विचाराधीन आहे.

-----------------

**मुंबई महानगरपालिकेच्या (एल) विभागात**
**दुषित पाणीपुरवठा होत असल्याबाबत**

**(२६) * ३३२८८ श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेच्या (एल) विभागाच्या हद्दीत येणाऱ्या कुर्ल्याच्या कोहिनूर सिटी, एच.डी.आय.एल., भारतीनगर, कपाडिया नगर, नाझ हॉटेल परिसर, नौपाडा, हॉल रोड इत्यादी ठिकाणी नळातून माती, किडे तसेच गढूळ आणि दुर्गंधीयुक्त पाणी येत असल्याचे दिनांक १९ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू विभागात मोठया प्रमाणात अनधिकृत कारखाने असुन तेथून हे घाण गटाराचे पाणी मुख्य प्रवाहात जात असल्याने पिण्याचे पाणी दुषित होत असल्याने नागरिक आजाराने त्रस्त झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत, त्या अनुषंगाने प्रस्तूत प्रकरणातील दोषीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, तसेच सदरहू भागात स्वच्छ पाण्याचा पुरवठा होण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या "एल" विभागाच्या हद्दीतील कोहिनूर सिटी, एच.डी.आय.एल., भारती नगर, कापडिया नगर, नाझ हॉटेल परिसर, नौपाडा, हॉल रोड इत्यादी ठिकाणी नळातून माती, किडे तसेच गढूळ आणि दुर्गंधीयुक्त पाणी येत असल्याबाबत दिनांक २०/०४/२०१७ रोजीच्या दै. पुढारी या वृत्तपत्रात बातमी प्रसिध्द झाली होती ही वस्तुस्थिती आहे.
(२) व (३) सदर विभाग हा निवासी क्षेत्र असून तेथे कारखाने नाहीत. तथापि, सदर ठिकाणी लघु कुटीर उद्योग अस्तित्वात आहेत ही वस्तुस्थिती आहे.

- सदर लघु कुटीर उद्योगातील सांडपाण्याचा निचरा मलनि:सारण वाहिनीद्वारे केला जातो. तथापि, लघु कुटीर उद्यागातील सांडपाणी मुख्य जलवाहिनीमध्ये जात असल्याचे पहाणीदरम्यान आढळून आलेले नाही.
- सदर परिसरात गढूळ पाण्याबाबतच्या तक्रारी प्राप्त झाल्यानंतर दिनांक ०३/०३/२०१७, दिनांक १०/०४/२०१७ व दिनांक १३/०४/२०१७ रोजी महानगरपालिकेमार्फत सदर परिसराची पाहणी करण्यात आली.
- सदर पाहणी दरम्यान खालीलप्रमाणे बाबी आढळून आल्या :-

❖ एच.डी.आय.एल. परिसरातील भूमिगत टाकी ही अस्वच्छ/गलिच्छ स्थितीत असल्याचे तसेच भूमिगत टाकीमध्ये गळती असल्याचे दिसून आले.
❖ सदर इमारतीला महानगरपालिकेची अधिकृत जलजोडणी देण्यात आलेली नसून, खाजगी टँकरमार्फत पाणीपुरवठा होत असल्याचे आढळून आले.
❖ सदर ठिकाणच्या पाण्याच्या टाकीतून पाण्याचा नमुना तपासणीसाठी घेतला असता ते पाणी पिण्यास अयोग्य असल्याचे निदर्शनास आले.
❖ कपाडिया नगर येथील इमारत क्रमांक १५ या इमारतीमध्ये गढूळ पाणीपुरवठा होत असल्याचे आढळून आल्यानंतर, सदर इमारतीच्या छतावरील टाकीचे निरीक्षण केले असता, सदर टाकी अत्यंत अस्वच्छ स्थितीत आढळून आली व त्यामधून गढूळ पाणी होत असल्याचे निदर्शनास आले.
❖ भारती नगर परिसरातील एल.बी.एस. मार्गावर ९०० मि.मी. व्यासाची जुनी जलवाहिनी बदलण्याचे काम सुरु असतांना, या विभागास पाणीपुरवठा करणारी ३०० मि.मी. व्यासाची जलवाहिनी फुटल्यामुळे सदर परिसरात काही काळ गढूळ पाणीपुरवठा होत होता.

- सदर भागात स्वच्छ पाण्याचा पुरवठा होण्यासाठी महानगरपालिकेमार्फत पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे :-
  - एच.डी.आय.एल. परिसरातील मे.एच.डी.आय.एल., एस.आर.ए. व एम.एम.आर.सी.एल. यांना दिनांक ०४/०३/२०१७ रोजी भूमिगत टाकी दुरुस्त करण्यासाठी कळविण्यात आले. तसेच, सदर इमारतीतील रहिवाशांना दरम्यानच्या काळात खाजगी टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात आला.
  - कपाडिया नगर ही खाजगी वसाहत असल्याने सदर वसाहतीतील अंतर्गत जलवाहिन्यांचे परिरक्षण करणे ही सर्वस्वी कपाडिया नगर या गृहनिर्माण संस्थेची जबाबदारी असून इमारतीतील छतावरील पाण्याच्या टाक्या व भूमिगत शोषण टाक्या स्वच्छ करण्याबाबत त्यांना योग्य त्या सूचना देण्यात आल्या आहेत.
  - भारती नगर परिसरातील ३०० मि.मी. व्यासाची फुटलेली जलवाहिनी तात्काळ दुरुस्त करण्यात आली.
  - कुर्ला विभागातील सर्व ठिकाणचे पाण्याचे नमुने तपासण्यात आले असून पाणीपुरवठा पिण्यायोग्य असल्याचे आढळून आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---------------

## भिवंडी (जि.ठाणे) शहरातील शालेय मुलींचे अपहरण झाल्याबाबत

**(२७) * ३०९६९ डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी (जि.ठाणे) शहरातील कामतघर, ब्रम्हानंदनगर, गैबीनगर व वेताळपाडा या परिसरातील १६ वर्षाच्या ३ शालेय मुलींचे अपहरण झाल्याच्या तक्रारी नारपोली, शांतीनगर या पोलीस ठाण्यात मुलींच्या नातेवाईकांनी दिनांक ३ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास नोंदविल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या तिन्ही मुलींच्या अपहरणाच्या तपासाची सद्यःस्थिती काय आहे, तसेच या अपहरण प्रकरणी पोलिसांनी कोणाला अटक केली आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे .

(२) ठाणे पोलीस आयुक्तालयाच्या भिवंडी परिमंडळातील शांतीनगर पोलीस स्टेशन येथे दाखल गु.र.क्र. ११९/२०१७ भा.दं.वि कलम ३६३ व गु.र.क्र १२०/२०१७ भा.दं.वि. कलम ३६३ या दोन्ही गुन्हयातील अपहरण झालेली मुली ह्या घरात कोणास काही एक न सांगता स्वत:हून निघून गेलेल्या होत्या व त्या पुन्हा स्वत: घरी परत आलेल्या आहेत. सदर गुन्हयाचे तपासामध्ये कोणत्याही प्रकारची अपहरणाची बाब आढळून आलेली नाही. म्हणून सदर गुन्हयाचे क समरी अहवाल मंजूर होणेबाबत मा.न्यायालयात सादर करण्यात आलेले आहेत.

नारपोली पोलीस स्टेशन येथे गु.र.क्र.२०८/२०१७ भा.दं.वि.३६३ मधील दिलेल्या फिर्यादीच्या अनुषंगाने दाखल गुन्हयात भा.दं.वि. कलम ३६६,३७६ सह बालकांचे लैंगिक अपराधापासून संरक्षण अधिनियम २०१२ चे कलम ४ प्रमाणे लावण्यात आलेली आहेत. सदर गुन्हयातील आरोपीस अटक केलेली असून गुन्हयाचा तपास सुरू आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

**मुंबईतील आयुर्मान संपलेल्या धोकादायक पुलांच्या पुनर्बांधणीबाबत**

**(२८) * ३२३९० श्री.अमरिशभाई पटेल, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेने सन २०१२ मध्ये धोकादायक म्हणून जाहीर केलेल्या मुंबईतील सुमारे ८० ते १०० वर्षे जुने उड्डाणपुल, लहान पुल तसेच पादचारी पुलांचा पुनर्बांधणी प्रस्ताव प्रलंबित असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दोन वर्षापूर्वी या पुलांच्या सर्वेक्षणाचा निर्णय महानगरपालिका प्रशासनाने घेतला होता परंतु, अद्याप सर्वेक्षण करण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबईतील बहुसंख्य पुलांचे आयुर्मान संपले असल्याने या धोकादायक पुलांचे सर्वेक्षण करुन या पुलांच्या पुनर्बांधणीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२), (३) व (४) बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील सर्व पुलांची विस्तृत माहितीसह सूची बनवून स्थितीदर्शक सर्वेक्षण करण्यासाठी महानगरपालिकेमार्फत सल्लागाराची नियुक्ती करण्यात आली आहे.

सदर सर्वेक्षण ऑक्टोबर, २०१७ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित असून, त्याबाबतचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर, पुलांची दुरुस्ती व पुनर्बांधणीचे नियोजन करुन महानगरपालिकेमार्फत पुढील कार्यवाही प्राधान्याने करण्यात येणार आहे.

-----------------

**राज्य शासकीय कर्मचाऱ्यांच्या कामाचा आठवडा पाच दिवसांचा करण्याबाबत**

**(२९) * ३२२६८ श्री.कपिल पाटील, आर्कि.अनंत गाडगीळ : तारांकित प्रश्न क्रमांक २८५१२ ला दिनांक ८ मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासकीय कर्मचारी संघटना, राजपत्रित अधिकारी संघटना आणि शिक्षक भारती यांच्या मागणीच्या अनुषंगाने कामकाजाचा पाच दिवसांचा आठवडा करण्याबाबत शासनाने नेमलेल्या समितीचा अहवाल प्राप्त झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यातील शिफारशींचा तपशील व शासनाचा निर्णय काय आहे,

(३) असल्यास, सर्व शासकीय, निमशासकीय कर्मचारी आणि प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक व महाविद्यालयीन शिक्षक यांना जागतिक मापदंडानुसार कामाचे तास, दिवस आणि पाच दिवसांचा आठवडा निश्चित करण्याबाबत शासनाचे धोरण काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) राज्य शासकीय कार्यालयांसाठी पाच दिवसांचा आठवडा करण्यासंदर्भात शासनाकडून कोणतीही समिती गठीत करण्यात आलेली नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**स्पर्धा परिक्षेचा अर्ज भरण्याच्या शुल्कात झालेली वाढ कमी करणेबाबत**

**(३०) * ३२७८६ श्री.गिरीशचंद्र व्यास, प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार, श्री.मितेश भांगडिया :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात बेरोजगारी वाढत असून स्पर्धा परिक्षेसाठी अर्ज भरण्याच्या शुल्कात केलेली वाढ सामान्य व गरीब विद्यार्थ्यांना परवडण्यासारखी नसल्यामुळे गरीब विद्यार्थी स्पर्धा परिक्षेपासून वंचित राहत असल्याचे दिनांक १४ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर स्पर्धा परिक्षेच्या शुल्कात १०० रुपयावरून ३०० ते ७०० रुपयापर्यंत वाढ झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर स्पर्धा परिक्षांचे शुल्क कमी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या व स्पर्धापरीक्षेच्या अर्ज भरण्याच्या शुल्कात सन २०१७ मध्ये १४ एप्रिल, २०१७ च्या सुमारास वाढ करण्यात आलेली नाही.

(२) १. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेचे शुल्क -

| अ.क्र. | भरतीचा प्रकार | | १/१/२००७ रोजीचे दर (रुपये) | | १/४/२०१४ रोजीचे दर (रुपये |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | अमागास | मागास | अमागास | मागास |
| १ | सरळ सेवा | अनुभव आवश्यक असलेली पदे | ४०० | २०० | ५२३/- | ३२३/- |
| | | अनुभव आवश्यक नसलेली पदे | २५० | १२५ | ३७३/- | २७३/- |
| २ | स्पर्धा परीक्षा-पूर्व | | २५० | १२५ | ३७३/- | २७३/- |
| | स्पर्धा परीक्षा-मुख्य | | ४०० | २०० | ५२३/- | ३२३/- |

३.आयोगाच्या कक्षेत नसलेल्या परीक्षांचे शुल्क -

| अ.क्र. | १९/१०/२००७ रोजीचे दर (रुपये) | | ११/३/२०१५ रोजीचे दर (रुपये) | |
|---|---|---|---|---|
| | अमागास | मागास | अमागास | मागास |
| १ | १५०/- | ७५/- | ३००/- | १५०/- |

परीक्षा शुल्कात १०० रूपयावरून ३०० ते ७०० रूपयांपर्यंत झालेली वाढ वस्तुस्थितीवर आधारीत नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बेलापूर (सी.बी.डी.) (नवी मुंबई) येथील अपोलो हॉस्पिटलमध्ये स्थानिकांना सवलती मिळणेबाबत

**(३१) * ३२४५१ श्री.जयंत पाटील, श्री.बाळाराम पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बेलापूर (सी.बी.डी) (नवी मुंबई) येथे सिडकोबरोबर करार करून अपोलो हॉस्पिटल उभारण्यात आले असून या हॉस्पिटलमध्ये स्थानिकांना ३० टक्के जागा राखीव व गरीबांना उपचारात ३० टक्के सवलत देण्याचा करार करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अपोलो हॉस्पिटलमध्ये करारानुसार स्थानिकांना रोजगार व उपचार मिळत नसल्याने स्थानिकांनी सिडको व अपोलो हॉस्पिटल विरोधात दिनांक १८ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास आंदोलन केले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) नाही.

सीबीडी बेलापूर, नवी मुंबई येथील सेक्टर क्र.२३ येथील भूखंड क्र.१३ (१४७८३.९६ चौ.मी.) हा सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलसाठी राखीव ठेवण्यात आला होता. सदर भूखंड निविदेद्वारे अपोलो हॉस्पिटल यांना वाटप करण्यात आला आहे. प्रस्तुतचा भूखंड हा निविदेद्वारे वाटप करण्यात आला असल्याने अपोलो हॉस्पिटल व सिडको यांच्यामध्ये झालेल्या करारात हॉस्पिटलमध्ये स्थानिकांकरिता ३० टक्के जागा राखीव व गरीबांना उपचारात ३० टक्के सवलत देण्यात येईल असे नमूद करण्यात आलेले नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ, नागपूरकरिता सभागृह बांधकामास मंजूरी मिळणेबाबत

**(३२) * ३१५२५ प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार, श्री.मितेश भांगडिया, श्री.प्रकाश गजभिये :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ, नागपूरकरिता अत्याधुनिक सुविधा असणारे भव्य सभागृह बांधकामाचा प्रस्ताव ना.सु.प्र. कडे सादर करूनही अद्याप सदर प्रस्तावास मंजूरी न मिळाल्याने प्रलंबित असल्याचे दिनांक २६ फेब्रुवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून सदर विद्यापीठाकरिता अत्याधुनिक सभागृह बांधकामास मंजूरी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठासाठी सभागृह बांधण्याचा प्रस्ताव नागपूर सुधार प्रन्यासला सादर झालेला नाही.

तथापि, स्व.वसंतराव नाईक जन्मशताब्दी वर्ष योजनेंतर्गत नागपूर येथे २००० आसन क्षमतेचे सभागृह बांधण्यासाठी जिल्हा प्रशासनाने नोडल एजन्सी म्हणून नागपूर सुधार प्रन्यासची नियुक्ती केली आहे.

-----------------

## अंबरनाथ येथे बोगस कॉल सेंटर सुरु असल्याबाबत

**(३३) * ३२८०७ श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अंबरनाथ येथे सुरु असलेल्या बोगस कॉल सेंटरमधून अमेरिकेतील नागरिकांची तसेच बोगस कॉल सेंटरमध्ये काम करणाऱ्या तरुणांची देखील फसवणूक करण्यात आल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तद्नुसार यास जबाबदार असणाऱ्या कॉल सेंटरच्या संचालकांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.
(२) होय.

सदर प्रकरणी ठाणे पोलीस आयुक्तालयातील परिमंडळ-४, शिवाजीनगर पोलीस ठाणे येथे गु.र.क्र.१५५/२०१७, ४१९, ४२०, १२० (ब), ४६५, ४६७, ४६८, ४७१ सह माहिती तंत्रज्ञान कायदा २००८ चे कलम ६६ (ब), ६६ (क), ७२ (१), ७५ सह द इंडियन टेलीग्राफ ॲक्ट कलम २५ (अ) प्रमाणे दिनांक ०९/०६/२०१७ रोजी १० आरोपींचे विरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला असून एकूण ९ आरोपींना अटक करण्यात आली आहे. याबाबत तपास सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अशासकीय तंत्र विद्यालयातील १२ वर्षे सेवा पूर्ण झालेल्या निदेशकांना वरिष्ठ वेतनश्रेणी लागू करण्याबाबत

**(३४) * ३११८५ ॲड.निरंजन डावखरे, डॉ.अपूर्व हिरे, श्री.विक्रम काळे : दिनांक ३० मार्च, २०१७ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ५ मधील प्रश्न क्रमांक २३६२८ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नेरूळ (नवी मुंबई) येथील तेरणा अशासकीय तंत्र विद्यालयातील १२ वर्षे सेवा पूर्ण झालेल्या निदेशक श्री.एस.राऊत यांचेसह राज्यातील अन्य निदेशकांनी वरिष्ठ वेतनश्रेणी लागू करावी अशी मागणी सन २०१३ पासून शासनाकडे वेळीवेळी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निदेशकांना वरिष्ठ वेतनश्रेणीसाठी त्यांचा नियुक्ती दिनांक हा कालावधी ग्राह्य न धरता ते कार्यरत असलेल्या संस्थेस १०० टक्के अनुदान प्राप्त झाल्याच्या दिनांकापासूनचा कालावधी ग्राह्य धरण्याच्या अटीवर संबंधित निदेशकांचे मागणी प्रस्ताव शासनाकडून अमान्य करण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाच्या शालेय शिक्षण विभागाच्या धोरणात्मक निर्णयानुसार सेवेत सलग १२ वर्षे सेवा ग्राह्य झालेल्या कर्मचाऱ्यांना वरिष्ठ वेतनश्रेणी लागू करण्यात येते, असे असताना तंत्रशिक्षण विभागाने मात्र त्या प्रकरणी नकारात्मक निर्णय घेण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, राज्यातील व्यवसाय शिक्षण संचालनालयांतर्गत असणाऱ्या अशासकीय अनुदानातील संस्थातील निदेशक, सहाय्यक अधिव्याख्याता, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी खाजगी विनाअनुदानित कालावधीत केलेली सेवा वरिष्ठश्रेणी/ निवडश्रेणी तसेच कालबध्द पदोन्नतीसाठी ग्राह्य धरण्याबाबतच्या विचाराधीन प्रस्तावावरील शासनाचा विचार पूर्ण झाला आहे काय,
(५) त्याचप्रमाणे शालेय शिक्षण विभागाच्या धर्तीवर याप्रकरणी तंत्रशिक्षण विभागाने फेर निर्णय घ्यावा अशा आशयाचे निवेदन-पत्र लोकप्रतिनिधीनी तत्कालिन मा.उच्च व तंत्रशिक्षण मंत्री व त्यानंतर आजतागायत अनेकदा निवेदने सादर केली असून उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, मुंबई यांचेकडे सदर प्रस्ताव प्राप्त झाला होता. तथापि, सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, मुंबई यांनी स्वयंस्पष्ट अभिप्रायासह प्रस्ताव पुन्हा सादर करण्याबाबत जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, ठाणे व संबंधित संस्थेस कळविले आहे.

(३), (४), (५) व (६) सदर प्रकरणी लोकप्रतिनिधी व विविध संघटना यांची निवेदने शासनास प्राप्त झालेली आहेत. त्यानुषंगाने व्यवसाय शिक्षण संचालनालयांतर्गत असणाऱ्या अशासकीय अनुदानित संस्थांतील निदेशक, सहा. अधिव्याख्याता, शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी खाजगी विनाअनुदानित काळात केलेली सेवा वरिष्ठ/निवडश्रेणी तसेच कालबध्द पदोन्नतीसाठी ग्राहय धरण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या अद्यापी विचाराधीन आहे. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने अधिक माहितीची आवश्यकता असल्याने सदर माहिती संकलित करण्यात येत आहे.

----------------

## राज्यातील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील तासिका तत्वावरील शिल्प निदेशकांच्या प्रलंबित मागण्यांबाबत

**(३५) * ३३१५९ श्री.नागोराव गाणार, प्रा.अनिल सोले :** सन्माननीय **कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील तासिका तत्वावरील शिल्प निदेशक यांच्या प्रलंबित मागण्याबाबत लोकप्रतिनिधींनी मा.मंत्री महोदयांना माहे मार्च, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तासिका तत्वावर शिल्प निदेशकांना रुपये १५ ते २० हजार मानधन आणि प्रमाणपत्र देण्याचे आश्वासन माहे जुलै, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान झालेल्या बैठकीत दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर :** (१) होय, हे खरे आहे.
(२), (३) व (४) हे खरे नाही. तथापि, औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये सैध्दांतिक व प्रात्यक्षिक तासिका घेण्यासाठी तासिका तत्वावरील निदेशकांच्या मानधनात प्रती तासिका दरात वाढ करणेबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

-----------------

## पुणे महानगरपालिकेच्या रुग्णालयांमध्ये सोनोग्राफी यंत्र खरेदीत गैरव्यवहार झाल्याबाबत

**(३६) * ३१२०५ श्री.किरण पावसकर, श्री.धनंजय मुंडे, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.आनंद ठाकूर, श्रीमती विद्या चव्हाण, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.रामराव वडकुते, डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे महानगरपालिकेच्या १५ रुग्णालयांमध्ये १५ सोनोग्राफी यंत्रे बसविण्यात आली आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर यंत्रांचा पूर्णक्षमतेने उपयोग होत नसतानाही रुपये ७० लाख खर्च करून आणखी पाच यंत्र मागविण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रत्यक्षात या यंत्राची किंमत कमी असतानाही त्या जास्त किंमतीच्या दाखवून खरेदी करण्यात आल्याची बाब माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तदनुसार संबंधितांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२)
- पुणे महानगरपालिकेच्या १५ रूग्णालयांमध्ये आजपर्यंत एकूण १६ सोनोग्राफी मशिन्स बसविण्यात आलेली आहेत.
- सन २०१६-२०१७ पूर्वी खरेदी केलेल्या एकूण ११ सोनोग्राफी मशिन्स पुणे महानगरपालिकेच्या रूग्णालयात वापरात आहेत. तथापि आवश्यकतेनुसार सन २०१६-२०१७ या आर्थिक वर्षात रूपये.१.५५ कोटी किंमतीची एकूण ५ सोनोग्राफी मशिन्स खरेदी करण्यात आलेली आहेत.

(३)

- सोनोग्राफी मशिन्सची किंमत कमी असतांनाही जास्त किंमत दाखवून मशिन्स खरेदी केल्या आहेत अशा स्वरूपाची तक्रार सजग नागरिक मंच, पुणे यांनी दिनांक २२/५/२०१७ रोजी पुणे महानगरपालिकेकडे केली आहे. तसेच याबाबतचे वृत्त स्थानिक वृत्तपत्रात आले होते.
- सन २०१६-१७ मध्ये निविदा प्रक्रियेनंतर ५ सोनोग्राफी मशिन्स टर्न कि पध्दतीने खरेदी करण्यात आल्या असून त्यामध्ये कॉम्प्युटर, प्रिंटर, यु.पी.एस., कॉम्प्युटर टेबल्स, इंटरनेट कनेक्शन इत्यादी बाबी उपलब्ध आहेत.
- तसेच खरेदी केलेल्या ५ मशिन्सपैकी एका मशिनमध्ये इलॅस्टोग्राफी व इतर सॉफ्टवेअर, अतिरिक्त प्रोब (Probe) इत्यादी सुविधाही उपलब्ध आहेत.
- खरेदी केलेल्या मशीन्सचे दर बाजारभावानुसार योग्य असल्याचे पुणे महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## गणेशनगर, वांद्रे (मुंबई) येथील एकाच कुटुंबातील महिलांवर आत्मघाती हल्ला केल्याबाबत

**(३७) * ३३३६६ श्रीमती स्मिता वाघ :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील वांद्रे बी.जे. रोडवरील बॅन्ड स्टॅण्ड, गणेशनगरात छेडछाडीचा जाब विचारल्याच्या रागातून तेथे राहणा-या एका कुटुंबातील दोन महिलांसह मुलीवर पेट्रोल ओतून त्यांना पेटवून दिल्याची बाब दिनांक १५ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, तद्‌नुसार आरोपींवर कोणता गुन्हा दाखल करण्यात आला आहे व दोषीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, बांद्रा पोलीस ठाण्याच्या हद्दीत सदरची घटना दिनांक १४ एप्रिल, २०१७ रोजी घडलेली आहे.

(२) सदर प्रकरणी चौकशी केली असून आरोपी विरुध्द बांद्रा पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. १५६/१७ भा.दं.वि. कलम ३०७, ३२६ (अ), ३०२ अन्वये गुन्हा नोंद केला आहे. या गुन्ह्यातील आरोपीस अटक करण्यात आली असून त्याच्या विरुध्द मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**औरंगाबाद महानगरपालिकेतील शाळेय विद्यार्थीनींना सायकलचे वाटप करणेबाबत**

**(३८) * ३२१७९ श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबाद शहरात महानगरपालिकेच्या ७० शाळा असून त्यात शिक्षण घेणाऱ्या मुलींचे प्रमाण ६० टक्के आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, इयत्ता १० वी पर्यंतच्या विद्यार्थीनींना सायकलीचे वाटप करण्यासाठी महानगरपालिकेने रुपये २४ लक्षच्या सायकली सन २०१४ मध्ये खरेदी केल्या परंतु, त्या सायकली अद्याप वाटप केल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, विद्यार्थीनींना सदर सायकली वाटप का केल्या नाही याची शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, अद्याप सायकली वाटप न करण्याचे कारण काय, योजनेनुसार कार्यवाही न करणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे, अंशतः खरे आहे.
औरंगाबाद महानगरपालिकेच्या एकूण ७० शाळा असून त्यात शिक्षण घेणा-या मुलींचे प्रमाण ५१ % आहे.
(२) हे खरे नाही.
महानगरपालिकेच्या महिला व बाल कल्याण विभागातर्फे सन-२०१४ मध्ये रुपये २३,७५,२२०/- इतक्या रकमेच्या ६२० सायकली निविदा मागवून खरेदी करण्यात आलेल्या होत्या.
सदर सर्व सायकलींचे वाटप सन २०१४-१५ व सन २०१५-१६ या कालावधीत करण्यात आलेले आहे.
(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**पुणे व कोल्हापूर येथे मा.उच्च न्यायालय, मुंबईचे प्रस्तावित खंडपीठ / सर्किट बेंचला मान्यता देणेबाबत**

**(३९) * ३०९०७ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे : तारांकित प्रश्न क्रमांक २८५७२ ला दिनांक २२ मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे व कोल्हापूर येथे मा.उच्च न्यायालय, मुंबईचे प्रस्तावित खंडपीठ / सर्किट बेंचला मान्यता देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(२) असल्यास, सदर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा. उच्च न्यायालयाकडे सादर केला आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रस्तावाची सद्यस्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) राज्य मंत्रीमंडळाने दिनांक १२/५/२०१५ रोजीच्या बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार कोल्हापूर येथे उच्च न्यायालयाचे फिरते खंडपीठ स्थापन करण्याबाबत सकारात्मक विचार व्हावा, अशी शिफारस शासनाने मा.मुख्य न्यायमूर्ती, उच्च न्यायालय, मुंबई यांना दिनांक १७/७/२०१५ रोजीच्या पत्रान्वये केली आहे.

(३) यानुषंगाने पुढील कार्यवाही मा.उच्च न्यायालयाकडून होणे अपेक्षित आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मुंबईत भटक्या कुत्र्यांची संख्या वाढत असल्याबाबत**

**(४०) * ३१५०८ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील रस्त्यावर मोकाट फिरणाऱ्या भटक्या कुत्र्यांना रोखणे महानगरपलिकेच्या आवाक्यात राहिले नसून भटक्या कुत्र्यांच्या निर्बीजीकरणासाठी कोट्यवधी रुपयांचा खर्च करूनही त्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दुचाकीस्वारांचे जीवघेणे पाठलाग, एकट्या-दुकट्या व्यक्तीवर तुटून पडणाऱ्या कुत्र्यांची झुंड आणि यामुळे जखमींचे व मृतांचे प्रमाण वाढत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कुत्रे पकडण्याची कामे सोपविलेल्या संस्था आणि त्यावर नियंत्रण ठेवणाऱ्या अधिकाऱ्यांचा निर्बीजीकरणाच्या कामावर लक्ष नसल्याने ही गंभीर समस्या निर्माण झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) मुंबईतील भटक्या श्वानांची गणना प्रथमत: जानेवारी २०१४ मध्ये महानगरपालिकेमार्फत करण्यात आलेली आहे.
(२) श्वान दंश व रेबीजमुळे झालेल्या मृत्यूबाबत मागील ३ वर्षांचा तपशील पुढीलप्रमाणे आहे:-

| वर्ष | श्वान दंश | रेबीजमुळे मृत्यू | |
|---|---|---|---|
| | | मुंबईतील | मुंबईबाहेरील |
| २०१४ | ८११६५ | ० | ३ |
| २०१५ | ७८६४६ | २ | ३ |
| २०१६ | ८६८५९ | २ | ५ |
| जाने. ते जून २०१७ | ३८०५६ | ० | २ |

(३) हे खरे नाही.

श्वान निर्बिजीकरण शस्त्रक्रिया करण्याकरीता महानगरपालिकेमार्फत चार अशासकीय संस्था कार्यरत होत्या. माहे नोव्हेंबर, २०१६ मध्ये दोन नवीन अशासकीय संस्था नेमण्यात आल्या आहेत.

अशासकीय संस्थांमार्फत करण्यात आलेल्या श्वान निर्बिजीकरण शस्त्रक्रियेचा तपशील पुढीलप्रमाणे आहे:-

| वर्ष | श्वान निर्बिजीकरण शस्त्रक्रियेची संख्या |
|---|---|
| २०१४ | ७,२३६ |
| २०१५ | ६,४१४ |
| २०१६ | ११,९६७ |
| जानेवारी ते जून २०१७ | ११,९४० |

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पांगारी-नानावळे (ता.भोर, जि.पुणे) गावात अवैध दारू विक्री होत असल्याबाबत**

**(४१) * ३०९५५ श्री.नरेंद्र पाटील, श्री.सुनिल तटकरे, श्री.धनंजय मुंडे, श्री.किरण पावसकर, श्री.जयवंतराव जाधव, श्रीमती विद्या चव्हाण, अ‍ॅड.निरंजन डावखरे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.हेमंत टकले :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पांगारी-नानावळे (ता.भोर, जि.पुणे) गावातील दारू विक्री लायसन्स क्रमांक ४१८/२००८-०९ या दुकानामध्ये अवैध दारू विक्री होत असल्याने भोर येथील पोलिसांनी दिनांक ६ मे, २०१७ रोजी छापा टाकून दुकानात असणारी रुपये १०,८६५ किंमतीची दारू हस्तगत केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मालकाचे रेशनिंगचेही दुकान असून रेशनिंग दुकानामध्येही देशी व विदेशी दारूची अवैधरित्या विक्री होत असल्याची तक्रार गावातील महिला वर्ग, ग्रामपंचायत तसेच परिसरातील इतर गावांमधून ग्रामस्थांनी पोलीस ठाण्यात तसेच जिल्हाधिकारी, पुणे व मा.मुख्यमंत्र्यांना देखील लेखी तक्रार अर्ज देण्यात आले असूनही मद्य विक्री करण्याऱ्या मालकावर कोणतीही कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणाबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार सदर दुकान मालकावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) मौजे पांगारी, नानावळे व इतर गावातील ग्रामस्थांनी भोर पोलीस स्टेशन येथे अवैध दारु विक्रीबाबत तक्रार दिली आहे, हे खरे आहे. सदर तक्रारीच्या अनुषंगाने तात्काळ कारवाई करण्यात आली आहे.

(३) पांगरी-नानावळे ता. भोर, जि.पुणे या गावामध्ये दारू विक्री लायसन्स क्रमांक ४१८/२००८-०९ हे बिअर शॉपीचे दुकान असून त्याच्याच शेजारी त्याच मालकाचे शेजारी रेशनिंगचे धान्य विक्रीचे दुकान आहे. सदर दुकानावर दिनांक ६/५/२०१७ रोजी सकाळी ८.०० वाजता छापा टाकून विदेशी दारूच्या ९८ बाटल्या किंमत रूपये १०,८६५/- चा माल जप्त करण्यात आलेला आहे. सदर प्रकरणी एका आरोपीविरूद्ध भोर पोलीस स्टेशन येथे प्रोव्हीबीशन गु.र.नं. ०९/२०१७ मुंबई प्रोहीबीशन कायदा कलम ६५(ई) अनुसार गुन्हा नोंद करण्यात आला असून

आरोपीस अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा तपास करून दिनांक १२/५/२०१७ रोजी मा.न्यायालय, भोर यांचेकडे आरोपीविरूद्ध दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. गुन्हा न्यायप्रविष्ठ आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नागपूर येथील वर्धा रोडवरील स्पेक्ट्रम रुग्णालयाची सुरक्षा भिंत कोसळून मजुरांचा मृत्यू झाल्याबाबत

**(४२) * ३२७४३ प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील वर्धा रोडवरील साई मंदिर चौकातील निर्माणाधीन स्पेक्ट्रम रुग्णालयाची सुरक्षा भिंत कोसळल्यामुळे ९ मजूर गंभीररित्या जखमी होऊन त्यात एकाचा मृत्यू झाल्याची घटना माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बांधकामादरम्यान मजुरांच्या सुरक्षेबाबत निष्काळजीपणा केल्याने ही दुर्घटना घडली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी रुग्णालय प्रशासनावर अथवा ठेकेदाराविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, मृत व जखमी मजुरांना जास्तीत जास्त आर्थिक मदत मिळण्यासाठी शासनस्तरावरुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) नागपूर येथील वर्धा रोडवरील साई मंदिर चौकातील निर्माणाधीन स्पेक्ट्रम रुग्णालयाची सुरक्षा भिंत कोसळल्याने ९ मजूर गंभीररीत्या जखमी होऊन त्यात दोन मजूरांचा मृत्यू झाल्याची घटना माहे जून, २०१७ मध्ये निदर्शनास आली आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) सदर प्रकरणी पोलीस स्टेशन धंतोली येथे अपराध क्रमांक १२३/१७ कलम ३३६, ३३७, ३३८, ३०४ (अ) भा.दं.वि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून एका आरोपीस अटक करण्यात आली आहे. गुन्हा तपासावर आहे.

(४) सदर घटनेतील मृत श्री.दिनेश पेंडर व श्री.हेमराज टेंबेकर यांच्या वारस पत्नीस अनुक्रमे रुपये ४५,०००/- व रुपये ७५,०००/- प्रदान करण्यात आले आहेत.

सदर प्रकरणी कंत्राटदार याने मा.कामगार न्यायालयात रुपये १४,२७,०४६/- चा धनादेश जमा केला आहे. सदर रक्कम मा.न्यायालयाच्या आदेशानुसार मृत कामगारांच्या वारसांना नुकसान भरपाई अदा होईल.

तसेच जखमी झालेल्या मजूरांवर औषधोपचारासाठी झालेला रुपये ८,००,२६९/- इतका खर्च कंत्राटदाराकडून करण्यात आलेला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**कल्याण (जि.ठाणे) तालुका पंचायत समितीच्या नवीन इमारत बांधकामाचा जादा एफएसआयचा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित असल्याबाबत**

**(४३) * ३१११५ श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.अमरसिंह पंडित :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण (जि.ठाणे) तालुका पंचायत समितीच्या नवीन इमारत बांधकामासाठी आवश्यक असलेला जादा एफएसआयचा प्रस्ताव जिल्हा परिषद, ठाणे यांचेकडून नगरविकास विभागास दिनांक ६ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास सादर झालेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रस्तावाबाबत कार्यवाही करण्याबाबत व प्रस्तावाच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीचा अहवाल यांची मागणी करणारे पत्र स्थानिक लोकप्रतिनिधीकडून शासनास दिनांक ११ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास देण्यात आलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) होय.

(३) जिल्हा परिषद, ठाणे यांच्या प्राप्त प्रस्तावावर आयुक्त, कल्याण डोंबिवली महानगरपालिका व सहायक संचालक नगर रचना, ठाणे शाखा यांचे अहवाल मागविण्यात आले आहेत. अहवाल प्राप्त झाल्यानंतर उचित कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## विक्रमगड (जि.पालघर) येथील स्वच्छ भारत अभियानांतर्गत लाभार्थी कुटुंबियांना शौचालयासाठी निधी वाटप करण्याबाबत

**(४४) * ३०९२४ श्रीमती विद्या चव्हाण, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.धनंजय मुंडे, ॲड.राहुल नार्वेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विक्रमगड (जि.पालघर) येथील स्वच्छ भारत अभियानांतर्गत विक्रमगड नगरपंचायतीकडून ३८१ लाभार्थी कुटुंबियांना शौचालयासाठी निधी वाटप झाला नसल्याबाबतची तक्रार श्रमजीवी संघटनेने माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान मा. मुख्यमंत्री, मा.ग्रामविकास मंत्री व जिल्हाधिकारी,पालघर यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, तद्नुसार संबंधित लाभार्थी कुटुंबियांना शौचालय बांधण्याकरिता निधी उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

स्वच्छ भारत अभियान (नागरी) अंतर्गत विक्रमगड (जि.पालघर) येथील लाभार्थी कुटुंबियांना शौचालयासाठी विक्रमगड नगरपंचायतीकडून निधी वाटप झाला नसल्याबाबतची श्रमजीवी संघटनेची तक्रार माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान मा. मुख्यमंत्री कार्यालयास व मा. ग्रामविकास मंत्री यांच्या कार्यालयात प्राप्त झालेली नाही.

(२)

- स्वच्छ भारत अभियान (नागरी) अंतर्गत विक्रमगड नगरपंचायतीकडून पात्र लाभार्थ्यास एकूण रुपये १७ हजार अनुदान तीन टप्प्यात देण्यात येत आहे.
- त्यानुसार आतापर्यंत एकूण ४६५ लाभार्थ्यांचे शौचालय बांधकामासाठीचे अर्ज मंजूर करण्यात आले आहेत.
- त्यापैकी एकूण २९९ लाभार्थ्यांच्या शौचालयाचे बांधकाम पूर्ण झाल्याने, त्यांना तिन्ही हप्त्याचा निधी म्हणून प्रत्येकी रुपये १७ हजार अनुदान वाटप करण्यात आले आहे.
- उर्वरित एकूण १६६ लाभार्थ्यांना दोन हप्त्याचा निधी म्हणून प्रत्येकी रुपये १२ हजार अनुदान वाटप करण्यात आले असून या लाभार्थ्यांच्या शौचालयांची बांधकामे अंतिम टप्प्यात आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुंबई शहरातील मोडकळीस आलेल्या इमारतींच्या पुनर्विकासाबाबत**

**(४५) * ३०९५३ श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.किरण पावसकर, श्री.धनंजय मुंडे, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.आनंद ठाकूर, श्रीमती विद्या चव्हाण, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रकाश गजभिये :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरात मोडकळीस आलेल्या इमारती आणि जुन्या चाळींच्या पुनर्विकासात भूमिपूत्रांना मुंबई बाहेर फेकू नका तसेच सर्वसामान्यांना परवडणारी घरे देणारी विकास नियमावली आणावी अशी मागणी मुंबईतील लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री यांच्याकडे दिनांक ४ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पावसाळयाच्या पार्श्वभूमीवर म्हाडाने मुंबईतील सेस (उपकरप्राप्त) इमारतीची पाहणी करुन मोडकळीस आलेल्या इमारतीतील रहिवाशांना ट्रान्झिट कॅम्पमध्ये स्थलांतरीत करण्याचा निर्णय माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबईतील ट्रान्झिट कॅम्पच्या इमारतींची अवस्था अतिशय दयनिय असल्याने मोडकळीस आलेल्या इमारतींमधील रहिवाशी ट्रान्झिट कॅम्पमध्ये स्थलांतरित होण्यास नकार देत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, दुरवस्था झालेल्या ट्रान्झिट कॅम्प इमारतींची दुरुस्ती करुन मुंबई शहर व उपनगरात नव्याने ट्रान्झिट कॅम्प उभारण्याबाबत तसेच वर्षोनुवर्षे ट्रान्झिट कॅम्पमध्ये रहात असलेल्या रहिवाशांना नव्याने घरे देण्याबाबत व उक्त प्रश्न भाग (१) मध्ये नमूद निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता :** (१) हे खरे नाही.

याबाबत कोणतेही निवेदन मा.मुख्यमंत्री महोदयांना प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही.

(२) होय, हे खरे आहे.

दरवर्षीप्रमाणे यावर्षीसुध्दा मुंबई शहरातील जुन्या उपकरप्राप्त इमारतींची पाहणी करण्यात आली असून, एकूण ०९ इमारती अतिधोकादायक म्हणून घोषित करण्यात आल्या आहेत. या इमारती रिकाम्या करुन त्यामधील रहिवाश्यांना मंडळाच्या संक्रमण शिबीरात स्थलांतरित करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) हे खरे नाही, मंडळाकडे उपलब्ध सुस्थितीत असलेल्या संक्रमण शिबीरामध्ये रहिवाश्यांना स्थलांतरीत करण्यात येत आहे.

(४) मंडळातर्फे वेळोवेळी संक्रमण शिबीराची आवश्यक असलेली दुरुस्ती करण्यात येते. संक्रमण शिबीरामध्ये वर्षानुवर्षे वास्तव्यास असलेल्या अधिकृत रहिवाशांना मास्टर लिस्टनुसार मुंबई शहरामध्ये मंडळाकडे उपलब्ध असलेल्या अतिरीक्त सदनिकेचे वाटप करण्यात येते.

तथापि, शासन गृहनिर्माण विभागाने संक्रमण शिबीरातील मूळ भाडेकरुंना त्याच ठिकाणी पुनर्वसन सदनिका देणे तसेच अनधिकृत रहिवाश्यांना पंतप्रधान आवास योजनेच्या धर्तीवर नवीन योजना आखून सर्वांसाठी घरे अभियानांतर्गत केंद्र व राज्य शासनाच्या निर्णयानुसार योग्य त्या सदनिका देण्यासाठी धोरण ठरविण्यासांदर्भात दिनांक ०९/०१/२०१७ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे मंत्रीमंडळ उपसमिती स्थापन केली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## भामरागड (जि.गडचिरोली) येथे नक्षलवाद्यांनी केलेल्या स्फोटात शहिद झालेल्या जवानांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत देणेबाबत

**(४६) * ३२८६४ श्री.प्रकाश गजभिये, श्री.धनंजय मुंडे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, ॲड.निरंजन डावखरे, श्री.अमरिशभाई पटेल, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भामरागड (जि.गडचिरोली) येथे नक्षलवाद्यांनी एक बुलेटप्रूफ गाडी सुरुंगाने उडवून दिल्याने एक जवान शहिद तसेच २२ जवान जखमी झाल्याची घटना माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त स्फोटात जखमी झालेल्या जवानांवर उपचार करण्यास नागपूरच्या नामांकित रुग्णालयांनी नकार दिल्याची बाब माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जखमी जवानांवर उपचारास नकार देणाऱ्या रुग्णालयांविरुध्द कारवाई करण्याचे आदेश गृह राज्यमंत्री यांनी दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार नक्षलीहल्ल्यात शहिद झालेल्या जवानांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत देणेबाबत तसेच जखमींना औषधोपचार करण्याबाबत व जवानांवर उपचारास नकार देणाऱ्या रुग्णालयांविरुध्द कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) गडचिरोली जिल्ह्यामध्ये नक्षलवाद्यांच्या हल्यामध्ये १ पोलीस जवान शहिद व २० पोलीस जवान जखमी झाले आहेत.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) मयत पोलीस कर्मचाऱ्यांच्या वारसदारांना सानुग्रह अनुदान व जखमी पोलीस कर्मचाऱ्यांना नुकसानभरपाई संदर्भात पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मौजे धामणे (ता.मावळ, जि.पुणे) येथे वारकरी संप्रदायातील जेष्ठ टाळकरी व त्याची पत्नी आणि मुलाची दरोडेखोरांनी हत्या केल्याबाबत**

**(४७) * ३१४६७ श्री.हेमंत टकले, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, अॅड.जयदेव गायकवाड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे धामणे (ता.मावळ, जि.पुणे) येथे वारकरी संप्रदायातील जेष्ठ टाळकरी त्यांची पत्नी आणि मुलाची हत्या करण्यात आल्याची घटना दिनांक १९ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास घडली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर घटनेत २५ वर्षीय महिला गंभीर जखमी झाल्याची घटना घडली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत त्यात काय आढळून आले व तद्नूसार सदर दरोड्यातील दरोडेखोरांना अटक करुन त्यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) मौजे धामणी (ता.मावळ, जि.पुणे) येथे वारकरी संप्रदायातील जेष्ठ टाळकरी व त्यांची पत्नी आणि मुलाची हत्या करण्यात आल्याची घटना दिनांक २५ एप्रिल, २०१७ रोजी घडली आहे.
(२) सदर घटनेत एक २६ वर्षीय महिला व एक दिड वर्षाची मुलगी जखमी झाली आहे.
(३) सदर घटनेत दोन पुरूष व एक महिलेची हत्या करण्यात आली असून एक महिला आणि एक दिड वर्षाची मुलगी जखमी झाली आहे. तसेच सदर घटनेत रुपये १,७४,०००/- चा माल जबरीने चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी अकरा आरोपीविरूद्ध मौजे धामणे ता.मावळ जि.पुणे येथे घडलेल्या घटनेबाबत तळेगाव दाभाडे पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. १४५/२०१७ भादंवि ३९५,३९६,३९७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे तसेच सदर गुन्हयातील अकरा आरोपींना अटक करण्यात आली असून आरोपींकडून ३५,०००/- रुपये किंमतीचे सोन्याचे दागिने हस्तगत करण्यात आले आहेत. गुन्हा तपासावर आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अतिरिक्त आयुक्त, आदिवासी विकास विभाग, ठाणे यांना लाच स्विकारताना पकडल्याबाबत

**(४८) * ३३२६१ श्री.तानाजी सावंत, श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे आदिवासी विकास विभागातील १२ कर्मचा-यांची रेक्टर या पदावर नियुक्ती करण्यात आली असून सदर पदोन्नती रद्द करण्याची धमकी देत १२ कर्मचाऱ्यांकडून प्रत्येकी रुपये १ लाख लाच स्विकारताना आदिवासी विभागाचे अतिरिक्त आयुक्त यांना पकडल्याची घटना दिनांक १७ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शैक्षणिक पात्रता नसतानाही निव्वळ पैसे देऊन सदर पदोन्नती देण्यात येत असल्यामुळे या विभागातील महत्वाच्या योजना लाभार्थ्यांपर्यंत पोहचत नाहीत व गैरव्यवहाराची प्रकरणे वारंवार होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले तद्नुसार दोषी व्यक्तीवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) आलोसे मिलिंद भगवान गवादे व आलोसे किरण सुखलाल माळी यांच्याविरुध्द वागळे इस्टेट पो. स्टे. येथे भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ तील कलमान्वये दिनांक १६/०४/२०१७ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर गुन्हयात त्यांना त्याचदिवशी अटक करुन मा. विशेष न्यायालय, ठाणे येथे हजर केले असून सदर गुन्हयाचा तपास सुरु आहे.

आलोसे गवादे व आलोसे माळी यांना शासनाने तात्काळ निलंबित केले आहे.

(४) विलंब झालेला नाही.

-----------------

## नागपूर येथील सुधारगृहातून पळालेल्या निराधार अल्पवयीन मुलीवर अत्याचार झाल्याबाबत

**(४९) * ३१२७८ श्री.हरिसिंग राठोड, श्री.हेमंत टकले, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील सुधारगृहातून पळालेल्या निराधार अल्पवयीन मुलीवर अत्याचार झाल्याची घटना माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान घडली असून या प्रकरणातील सहा आरोपींना दिनांक २४ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास पोलिसांनी अटक केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर घटनेची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार सुधारगृहातून पळालेल्या अल्पवयीन मुलीवर सामुहिक अत्याचार करणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, नागपूर येथील कायदा व सुव्यवस्था अबाधित राहण्याकरिता शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

सदर गुन्हयामध्ये ११ आरोपींना अटक करण्यात आलेली आहे.

(२) सिताबर्डी पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजि क्र १५३/१७ कलम ३६३, ३६६(अ), ३७६(ड), १२०(ब), ५०६(ब), १०९, ११८ भादंवि सहकलम ६, १७ लैंगीक अपराधांपासून बालकांचे सरंक्षण अधिनियम अन्वये दिनांक २३/०४/२०१७ रोजी गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. नमूद गुन्हयामध्ये दोषारोप पत्र तयार करून मा. न्यायालयात दाखल करण्यात आले आहे. सदर गुन्हयात ११ आरोपीना अटक करण्यात आलेले असून गुन्हयातील सर्व आरोपी न्यायालयीन कोठडीत आहेत.

(३) पोलीस आयुक्त, नागपुर शहर यांच्यातर्फे पोलीस आयुक्त वेबसाईट, Twitter, Face-Book, Whats up Group, १०० Number, DCRMS च्या २० लाइन्स कार्यान्वित करण्यात आल्या असून सर्व पोलीस ठाण्यातील ४५० पोलीस वाहनांवर GPS सिस्टीम बसविण्यात आली आहे. आयुक्तालयातील सर्व पोलीस स्टेशनचे Twitter Account उघडण्यात आले आहे.

पोलीस आयुक्तालयात एक मिडीया व्हॅन तयार करण्यात आली असून महिला व बालकांविरुध्द घडणा-या गुन्हयांबाबत शाळांमध्ये व सार्वजनिक ठिकाणी जनजागृती करण्यात येत आहे. तसेच शाळा, कॉलेज, निर्जनस्थळी सतत दामिनी पथकाव्दारे पेट्रोलिंग करण्यात येत आहे.

तातडीने कारवाई करण्यासाठी प्रतिसाद ॲप, वाहन चोरी ॲप, पोलीस मित्र ॲप तयार करण्यात आले असून त्या माध्यमांव्दारे जनतेच्या तक्रारींचे निवारण करण्यात येत आहे.

नागपूर शहरात एकूण २९ सी.आर. व्हॅन आणि ई-पेट्रोलिंग मोबाईल कार्यान्वित करण्यात आल्या असून प्रत्येक मोबाईल व एका ॲपव्दारे सुचना देण्यात येऊन त्याच्या हालचालींची माहिती पोलीस ठाण्यास प्राप्त होते.

सार्वजनिक ठिकाणी इशारेबाजी, असभ्य वर्तन करणारे इत्यादींविरुध्द जानेवारी ते जून २०१७ पावेतो १७०३ केसेस मुंबई पोलीस कायदयान्वये कारवाई करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील क्रॉफर्ड मार्केटमध्ये विविध पक्षी व प्राण्यांची बेकायदेशीरपणे होत असलेली विक्री रोखण्याबाबत

**(५०) * ३२६३१ श्री.सुभाष झांबड, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील क्रॉफर्ड मार्केटमध्ये विविध जातीचे पक्षी व प्राण्यांना वाईट परिस्थितीत ठेऊन त्यांची बेकायदेशीरपणे विक्री करीत असल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मार्केटमधील पक्षी व प्राण्यांची बेकायदा विक्री करणारे दुकाने बंद करण्याचे आदेश मा.उच्च न्यायालयाने शासनाला दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून पक्षी व प्राण्यांची बेकायदेशीरपणे विक्री करणारी दुकाने बंद करण्याबाबत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) विविध जातीचे पक्षी व प्राण्यांच्या बेकायदेशीरपणे विक्रीबाबत मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल करण्यात आलेल्या जनहित याचिका क्रमांक ७३/२०१६ मध्ये, महात्मा ज्योतिबा फुले मंडईतील पक्षी व प्राण्यांची अनधिकृत विक्री करणारी दुकाने बंद करण्याचे आदेश मा. उच्च न्यायालयाने दिनांक १०/०४/२०१७ रोजी दिले आहेत.

(३) सदर मंडईतील २३ अनुज्ञापत्रधारक नोंदणीकृत व्यवसाय तसेच पक्षी व प्राण्यांची बेकायदेशीरपणे विक्री करीत असल्याचे आढळून आल्यामुळे त्यांचे अनुज्ञापत्र महानगरपालिकेमार्फत रद्द करण्यात आले आहे.

सदर बाब दिनांक ०४/०५/२०१७ रोजी मा. उच्च न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर मा. न्यायालयाने जनहित याचिका क्रमांक ७३/२०१६ निकाली काढली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

## तलासरी नगरपंचायत हद्दीत बेकायदा बांधकामे सुरु असल्याबाबत

**(५१) * ३२३१२ श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, अॅड.राहुल नार्वेकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तलासरी (जि.पालघर) तालुक्यातील नगरपंचायत हद्दीतील सुतारवाडा, पाटीलवाडा व विकासपाडा या ठिकाणी मोठ्या प्रमाणात बेकायदा बांधकामे सुरू असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले तद्नुसार सदर बेकायदा बांधकामे निष्काषित करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) तलासरी नगरपंचायतीची स्थापना दिनांक ०७/०५/२०१६ रोजी करण्यात आलेली आहे.

माहे मे, २०१७ मध्ये नगरपंचायत हद्दीतील मालमत्तांचे सर्व्हेक्षण तपासणे करण्यात आले असता एकूण ४३७३ मालमत्तापैकी १३ मालमत्तांधारकांनी वाढीव बांधकाम केल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) सदर अनधिकृत बांधकामाबाबत मुख्याधिकारी, तलासरी नगरपंचायत यांनी महाराष्ट्र नगरपरिषदा नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ च्या कलम १८९ अन्वये बांधकाम काढून टाकण्याबाबत १३ मालमत्ताधारकांना दिनांक २६/०५/२०१७ रोजी नोटीशी बजावल्या आहेत. तसेच जिल्हाधिकारी, पालघर यांना संबधित सहायक संचालक नगर रचना यांच्याकडून तपासणी करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायाधिशांच्या गृहनिर्माण सोसायटीच्या भूखंडाबाबत

**(५२) * ३३५२४ ॲड.अनिल परब :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उच्च न्यायालयाच्या विद्यमान न्यायाधिशांच्या प्रस्तावित गृहनिर्माण सोसायटीसाठी शासनाने ओशिवरा येथील भूखंड मंजूर करण्यात आल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त भूखंड मंजूर करण्यापूर्वी शासनाने वैयक्तिक सदनिका मंजूर करण्यासाठीचे निकष शिथील केले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विद्यमान न्यायाधीशांकरीताच पात्रता निकष शिथील करण्यामागची कारणे काय आहेत

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता :** (१) महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (मिळकत व्यवस्थापन, विक्री, हस्तांतरण आणि सदनिकांची अदलाबदल) विनियम १९८१ च्या विनियम १३(२) मधील तरतुदीनूसार म्हाडाकडून प्राप्त प्रस्तावाच्या अनुषंगाने शासनाने मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांकरीता गृहनिर्माण योजना राबविण्यासाठी दिनांक ०१/०९/२०१५ च्या शासनपत्रान्वये सहमती देण्यात आलेली आहे.

(२) व (३) शासनाच्या दिनांक ०८/०२/२००७ व दिनांक २५/०४/२०११ च्या शासननिर्णयान्वये विनियम १३(२) अंतर्गत गृहनिर्माण योजना राबविण्यासाठी मार्गदर्शक सुचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. त्यामध्ये असलेल्या सर्वोच्च/उच्च न्यायालयाच्या न्यायाधिशांसाठीच्या गट व पात्रते संदर्भात शासनाच्या विधी व न्याय विभागाचे अभिप्राय घेऊन दिनांक १२/०८/२०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये काही सुधारणा केलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे शहरातील कच-याचा समस्या सोडविण्याबाबत

**(५३) * ३१३९६ श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरात कच-याची समस्या गंभीर झाली असून शहरातील कचरा टाकण्यास उरुळी देवाची आणि फुरसुंगी गावातील नागरिकांनी माहे एप्रिल - मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान २३ दिवस आंदोलन करुन विरोध दर्शविला होता. त्यावर उपाययोजना करता यावी यासाठी दिनांक ७ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास मा. मुख्यमंत्री यांनी संबंधित ग्रामस्थ, लोकप्रतिनिधी आणि महानगरपालिकेचे पदाधिकारी/अधिकारी यांची संयुक्त बैठक आयोजित केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बैठकीत पुणे शहराच्या कचरा समस्येबाबत एका महिन्यात सर्वंकष आराखडा तयार करण्याचे आणि उरुळी देवाची तसेच फुरसुंगी गावातील प्रकल्पग्रस्तांना कायमस्वरुपी महानगरपालिकेच्या सेवेत घेण्याचा निर्णय विशेष बाब म्हणून घेण्यात येणार असल्याचे आश्वासन मा. मुख्यमंत्री यांनी दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२), (३) व (४) या अनुषंगाने आवश्यक प्रस्ताव अंतिम मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे.

-----------------

## नाशिक येथे महामार्ग सुरक्षा कार्यालय स्थापन करण्याबाबत

**(५४) * ३१००० श्री.जयवंतराव जाधव, श्री.अमरसिंह पंडित, श्री.धनंजय मुंडे, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक येथे एकत्रित स्वतंत्र महामार्ग सुरक्षा पथक व पोलीस अधिक्षक महामार्ग सुरक्षा कार्यालय स्थापन करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रश्न भाग (१) मधील विचाराधीन प्रस्तावावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

**पुण्यातील मेट्रो प्रकल्पास शिवाजीनगर येथील कृषि महाविद्‌यालयाची जागा देणेबाबत**

**(५५) * ३१९९५ ॲड.जयदेव गायकवाड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुण्यातील मेट्रो प्रकल्पास शिवाजीनगर येथील कृषि महाविद्‌यालयाची १५ एकर जागा न देता केवळ ३ एकर जागा देण्याची तयारी महानगरपालिकेने दर्शविली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्‌नूसार मेट्रो प्रकल्प पूर्णत्वास जावा म्हणून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) पुणे मेट्रो रेल्वे प्रकल्पासाठी कृषि महाविद्‌यालय, पुणे येथील १३ हेक्टर २९ आर जमीन आवश्यक आहे. सदर जमिनीवरील सध्याच्या फळबागांचे पुर्नरोपण झाल्यानंतर सदर जमीन पुणे मेट्रो रेल्वे प्रकल्पासाठी हस्तांतरीत करण्यात येणार आहे. यानुषंगाने फळबागांचे पुर्नरोपण करण्याचे नियोजन कृषि महाविद्‌यालय, पुणे व पुणे मेट्रो रेल्वे प्रकल्पाची विशेष हेतू कंपनी महाराष्ट्र मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड यांच्या स्तरावर करण्यात आला आहे.

----------------

**डहाणू (जि.पालघर) येथे डम्पिंग ग्राऊंड उभारण्याबाबत**

**(५६) * ३१३१६ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, ॲड.राहुल नार्वेकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) डहाणू (जि.पालघर) नगरपालिकेला शहरातील कच-याची विल्हेवाट लावण्यासाठी स्वत:च्या मालकीचे डम्पिंग ग्राऊंड नसल्याने शहरात दररोज साठणारा १०० टन कचरा कुठे टाकावा अशी गंभीर समस्या निर्माण झाली असल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१)

- डहाणू नगरपरिषद क्षेत्रात दररोज सुमारे १२ मे. टन घनकचरा निर्माण होतो.
- या कचऱ्याचे शहरात पाच ठिकाणी ओला व सुका कचरा असे विलगीकरण करण्यात येते.
- विलगीकरण केलेल्या ओल्या कचऱ्यावर शास्त्रोक्त पध्दतीने प्रक्रीया करुन कंपोस्ट खत तयार करण्यात येत आहे.
- विलगीकरण केलेला सुका कचरा, पुन्हा वर्गीकरण करुन त्यावर पुनर्प्रक्रीया करण्यासाठी पाठविण्यात येतो.

(२)

- स्वच्छ महाराष्ट्र अभियानातंर्गत नागरी घनकचरा व्यवस्थापनाचे सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी कोंकण विभागाकरीता आयसीयुसी कन्संल्टन्स प्रा.लि. या एजन्सीची नियुक्ती केली आहे.
- या एजन्सी मार्फत डहाणूसह कोकण विभागातील सर्व शहरांचे नागरी घनकचरा व्यवस्थापनाबाबतचे सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यात येत आहेत.
- त्यानुसार डहाणू शहराचा घनकचरा व्यवस्थापनासाठीचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करुन घेऊन त्यास उच्चाधिकारी समितीची मान्यता प्राप्त झाल्यानंतर केंद्र व राज्य शासनाच्या हिश्श्याचा अनुज्ञेय निधी वितरीत करण्याची कार्यवाही प्रस्तावित आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कणकवली येथे खासगी विकासकाच्या माध्यमातुन पार्किंग आरक्षण विकसित केले जात असल्याबाबत

**(५७) * ३०९१५ श्री.नारायण राणे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कणकवली नगरपंचायतीच्यावतीने राष्ट्रीय महामार्गालगत पार्किंग आरक्षणासाठी खासगी विकासकाच्या माध्यमातुन ३८ गुंठे क्षेत्रात पार्किंग आरक्षण विकसित केले जात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रकल्पाचे आराखडे आमसभेपुढे मंजुरीसाठी न मांडता नगरसेवकांना अनभिज्ञ ठेवून प्रकल्प राबविला जात असल्याच्या तक्रारी स्थानिक लोकप्रतिनिधीकडून होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू पार्किंग आरक्षण विकासकाच्या प्रस्तावाला मंजूरी देताना मा.नगरविकास राज्यमंत्री जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग यांनी नियमितता पाहिली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) कणकवली शहराच्या मंजूर विकास योजनेतील आरक्षण क्र.२६-पार्किग या आरक्षणाचा समावेशक आरक्षणाच्या तत्वानुसार विकास करणेसाठी ग्लोबल असोसिएट तर्फे भागीदार श्री.राजन कृष्णा तेली व सौ. रुजिता राजन तेली, यांनी नगर पंचायतीकडे दाखल केलेल्या प्रस्तावाबाबत नगर रचनाकार, सिंधुदुर्ग यांचेकडून तांत्रिक मार्गदर्शन व अभिप्राय प्राप्त करुन घेण्याबाबत नगरपंचायत सभा ठराव क्र.७१, दिनांक ३/१२/२०१६ करण्यात आलेला आहे.

(३) मंजूर आराखडयातील आरक्षणे विकसित करण्याची बाब नगर पंचायतीच्या अधिकार क्षेत्रातील आहे. दिनांक १०/५/२०१६ रोजीच्या शासन अधिसुचनेतील तरतुदींनुसार समावेशक आरक्षणाच्या माध्यमातून आरक्षण क्र. २६ - पार्किंगचा विकास करण्याचा निर्णय नगर पंचायतीचा आहे. नगर पंचायतीने नगर रचना कार्यालयाकडील तांत्रिक मार्गदर्शन व शासन अधिसुचनेतील दिनांक १०/५/२०१६ मधील तरतुदींनुसार विकास प्रस्तावावर कार्यवाही केली आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वाशिम शहरामध्ये आयकर विभागाचे अधिकारी असल्याचे भासवून बनावट धाड टाकल्या

**(५८) * ३१०७८ श्री.धनंजय मुंडे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.अमरसिंह पंडित, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशिम शहरामध्ये आयकर विभागाचे अधिकारी असल्याचे भासवून बनावट धाड टाकल्याचे दिनांक ९ ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आल्याने सदर प्रकरणाची तक्रार वाशिम शहर पोलीस स्टेशनला त्याच दिवशी दाखल केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर तक्रारीनुसार कोणताही तपास न केल्यामुळे संबंधितांनी जिल्हा पोलीस अधिक्षकांची भेट घेवून त्यांनाही निवेदने देऊन कार्यवाही करण्याबाबत विनंती केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्हा पोलीस अधिक्षकांनी सदर निवेदनाची दखल न घेतल्यामुळे संबंधितांनी उपोषणाला बसण्याचा इशारा दिल्यानंतर दिनांक २० ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्या सुमारास गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर गंभीर प्रकरणाची तात्काळ दखल न घेता गुन्हा दाखल करण्यास टाळाटाळ करणाऱ्या ठाणेदार व जिल्हा पोलीस अधिक्षकावर शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.
(२) तक्रारदारांनी दिनांक १६/८/२०१६ रोजी पोलीस अधिक्षक, वाशिम यांना लेखी अर्ज सादर केला असून सदर अर्ज कारवाई करीता पोलीस स्टेशन, वाशिम शहर यांचेकडे पाठविला होता. तसेच तक्रारदाराच्या दिनांक ९/८/२०१६ रोजी दिलेल्या अर्जासंबंधाने पोलीस स्टेशन, वाशिम शहर येथील १ पोलीस उपनिरीक्षक व २ पोलीस कर्मचारी यांचे पथक नेमून तात्काळ चौकशी सुरू करण्यात आली.
(३) व (४) तक्रारदार यांनी पोलीस अधिक्षक, वाशिम कार्यालयास दिलेला अर्ज तात्काळ पुढील चौकशीकामी पोलीस स्टेशन, वाशिम शहर येथे पाठविण्यात आला. तदनंतर सदर प्रकरणाच्या चौकशीनंतर फिर्यादीचे तक्रारीवरून पोलीस स्टेशन, वाशिम शहर येथे अप.क्रमांक. ३१७/२०१६ भादंवि कलम १७०, ४१६, ४१७, ४१९,४४८,१०९, ३४ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला असून सदर गुन्हयात ११ आरोपींना अटक करण्यात आली आहे. गुन्हा तपासावर आहे. सदर प्रकरणी कोणतीही टाळाटाळ झालेली नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

### मुंबई शहर व उपनगरातील झोपडपट्टी प्रकल्प प्रलंबित असल्याबाबत

**(५९) * ३२६७५ अ‍ॅड.राहुल नार्वेकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, अ‍ॅड.निरंजन डावखरे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.अमरसिंह पंडित, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.आनंद ठाकूर, अ‍ॅड.जयदेव गायकवाड, श्री.सुभाष झांबड, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई शहर व उपनगरातील २४ झोपडपट्टी प्रकल्प मागील अनेक वर्षापासून प्रलंबित असून त्यांची मान्यता झोपडपट्टी प्राधिकरणाने माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान रद्द केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ज्या विकासकांचे प्रकल्प रद्द केले आहेत त्यांची नावे काय आहेत व ज्या विकासकांकडे एसआरएचे भूखंड ताब्यात आहेत त्यांच्याकडून ते परत घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार सदर प्रलंबित प्रकल्प लवकर पूर्ण व्हावेत म्हणून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता :** (१) होय, हे खरे आहे

माहे जानेवारी, २०१६ ते माहे जून, २०१७ या कालावधीत एकूण ४२ विकासकांची नियुक्ती झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने रद्द केली आहे.

(२) विकासकांची यादी पुढीलप्रमाणे आहे.

| अ.क्र | सोसायटीचे नाव | विकासक |
|---|---|---|
| १ | अष्टविनायक एसआरए सह.गृह. संस्था | एस एस व्ही रिअलटर्स |
| २ | जनता एसआरए सह.गृह. संस्था | मे. एस के कोर्पोरेशन |
| ३ | संजीवनी एसआरए सह.गृह. संस्था | मे. वैभव लक्ष्मी बिल्डर्स ॲन्ड डेव्हलपर्स |
| ४ | न्यू साफल्य एसआरए सह.गृह. संस्था | मे.अमीकृपा लॅन्ड डेव्हलपर्स |
| ५ | गणेश नगर सह.गृह. संस्था | मे.धनश्री डेव्हलपर्स |
| ६ | जयहिंद गांधीनगर सह.गृह. संस्था | मे. हरी ओम डेव्हलपर्स /<br>मे.विजय कमल प्रॉपर्टीज प्रा.लि. |
| ७ | श्री. गणेश निवास सह.गृह. संस्था | मे.ड्रिम डेव्हलपर्स |
| ८ | संजीवनी व इतर एसआरए सह.गृह. संस्था | मे.एस.एस.व्ही डेव्हलपर्स |
| ९ | गणेश नगर सह.गृह. संस्था | मे.साईसिध्दी डेव्हलपर्स |
| १० | श्री.अष्टविनायक सह.गृह. संस्था | मे.गॅलेक्सी इंटसप्राईजेस |
| ११ | वंक्रतुंड एस.आरए सह.गृह. संस्था | मे.आयडीएल डेव्हलपर्स ॲन्ड डेव्हलपर्स |
| १२ | समता एसआर ए सह.गृह. संस्था | वैधही आकाश हौसिंग प्रा.लि. |
| १३ | अण्णा-कासमनगर सह.गृह. संस्था | मे. के.एस. चमणकर एंटरप्राईजेस |
| १४ | साईधाम एसआरए सह.गृह. संस्था | मे.एस.एस.व्ही डेव्हलपर्स |
| १५ | डिवाईन मर्शी सह.गृह. संस्था | कुंजन मेहता बिल्डर्स ॲन्ड डेव्हलपर्स |
| १६ | श्री.सिध्दीविनायक सह.गृह. संस्था | यश बिल्डर्स ॲन्ड डेव्हलपर्स |
| १७ | भाई बंदरकर फिशरमेन्स सह .गृह. संस्था | मे.मॅझसन बिल्डर्स डैव्हलपर्स प्रा.लि. |

| | | |
|---|---|---|
| १८ | मौर्या एसआरए सह.गृह. संस्था | मे.म्हात्रे आणि असोसिएटस् |
| १९ | समता सह.गृह. संस्था | मे.डिसन्स इन्व्हेस्टमेंट ॲन्ड फायनांन्स प्रा.लि. |
| २० | अमनएकता सह.गृह. संस्था | मे.डिसन्स इन्व्हेस्टमेंट ॲन्ड फायनांन्स प्रा.लि. |
| २१ | मोतीलाल सह.गृह. संस्था | पंक्ती हाउ. प्रा.लि. |
| २२ | एकविरा विहार सह.गृह. संस्था | मे. राम चंद्रा जी पाटील |
| २३ | शिवनेरी सह.गृह. संस्था | मे.सृष्टी असोशिएटस् बिल्डर्स ॲन्ड डेव्हलपर्स |
| २४ | किशोर किरण सह.गृह. संस्था | मे.स्कायलार्क बिल्डकॉन प्रा.लि. |
| २५ | हरी ओम सह.गृह. संस्था | मे.अमिकृपा लॅन्ड डेव्हलपर्स प्रा.लि. |
| २६ | गणेश नगर सी सीएचएस | मे.लकडावाला डेव्हलपर्स |
| २७ | बी.सी. ॲन्ड ओ.(पार्ट) ब्लॉक व्ही. पी. नगर सीएचएस | मे. मिहिर ठक्कर ॲन्ड असोसिएटस् |
| २८ | जय भवानी व इतर १४ सह.गृह. संस्था | मे.जी.एम.एस. वास्तु आणि बिल्डर्स प्रा.लि. |
| २९ | फ्लायओव्हर सह.गृह. संस्था | मे.लकी डैव्हलपर्स |
| ३० | न्यू नवरत्न वक्रतुंड सह.गृह. संस्था | मे.माऊली साई डेव्हलपर्स प्रा.लि. |
| ३१ | श्री साईकृपा/ श्रीबजरंग सह.गृह. संस्था | मे. परेश वालीया ॲन्ड असोशिएटस् |
| ३२ | आदर्श सह.गृह. संस्था | मे.कुनाल बिल्डर्स ॲन्ड डेव्हलपर्स |
| ३३ | जनता कल्याणकारी सह.गृह. संस्था | मे. सिध्दार्थ बिल्डर्स ॲन्ड डेव्हलपर्स |
| ३४ | नवशक्तीनगर/ सह.गृह. संस्था | मे.बीजेय रिअल्टर्स प्रा.लि. |
| ३५ | साहिल सह.गृह. संस्था | मे.फ्रिस्कॉन इंन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. |
| ३६ | चैतन्य सह.गृह. संस्था | मे. एन.एस.टी रिअलटर्स प्रा.लि. |
| ३७ | न्यू शांतिसेवा सह.गृह. संस्था | मे.सिध्दार्थ बिल्डर्स ॲन्ड डेव्हलपर्स |
| ३८ | सन रे सह.गृह. संस्था | मे.मिडास डेव्हलपर्स प्रा.लि. |
| ३९ | आनंद नगर सह.गृह. संस्था | मे.अभिनी डेव्हलपर्स |
| ४० | शुध्दोधन सह.गृह. संस्था | मे.ॲमेस्थिट कन्टस्ट्रक्शन आणि इनफोस्ट्रक्चर कंपनी |
| ४१ | श्री.सम्राट एसआरए सह.गृह. संस्था | मे.ॲमेस्थिट कन्टस्ट्रक्शन आणि इनफोस्ट्रक्चर कंपनी |
| ४२ | एकता एसआर ए सह.गृह. संस्था | मे.फॅटकॅट इनफ्रास प्रा.लि. |

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाद्वारे कलम १३(२) अन्वये आदेश पारित करुन नियुक्ती रद्द केलेल्या विकासकांऐवजी संस्थेने ठराव करुन नियुक्त केलेल्या नवीन विकासकाची सक्षमता तपासून त्यांना पुढील विकासकामी मंजूरी देण्याबाबतची कारवाई करण्यात येत आहे.
(३) संस्थेने नवीन विकासकाची नियुक्ती केल्यावर सक्षमता तपासून, त्यांना संबंधित झोपडपट्टी पुनर्वसन योजनेबाबत विविध परवानग्या नियमानुसार निर्गमित करुन प्रकल्प/योजना लवकर पूर्ण होण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## कराड (जि.सातारा) येथील लोकप्रतिनिधी यांच्या अंगरक्षकाला मारहाण झाल्याबाबत

**(६०) * ३३७२० श्री.आनंदराव पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कराड (जि.सातारा) येथील लोकप्रतिनिधी यांच्या अंगरक्षकाला काही गुंडप्रवृत्तीच्या लोकांकडून झालेल्या मारहाण प्रकरणी कराड तालुका पोलीस ठाण्याचे निरीक्षक व तपास अधिकारी श्री.अण्णासाहेब मांजरे यांनी घटनेची चौकशी करुन कारवाई करण्यास दुर्लक्ष व टाळाटाळ केल्यामुळे त्यांना निलंबित करण्याची घोषणा मा.गृह राज्यमंत्री यांनी सन २०१७ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात विधानपरिषदेत केली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या घोषणेनुसार शासनाने सदर पोलीस अधिका-यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सदर प्रकरणात पोलीस अधिकारी श्री. अण्णासाहेब मांजरे हे गुन्ह्याचे तपासी अंमलदार नसून गुन्ह्याचा तपास प्रथम पासून महिला स.पो.नि. श्रीमती जौजाळ या करीत आहेत. पोलीस निरीक्षक मांजरे हे कराड तालुका पोलीस ठाणेचे प्रभारी अधिकारी होते. परंतू त्यांची कराड तालुका पोलीस ठाणे गु. र. क्र. ७८/२०१७ हा गुन्हा दाखल करतांना भा.दं.वि. कलम ३५३ हे तात्काळ का लावण्यात आले नाही म्हणून मा. विशेष पोलीस महानिरीक्षक, कोल्हापूर परिक्षेत्र, कोल्हापूर यांनी पोलीस निरीक्षक मांजरे यांना त्यांची देय वार्षिक वेतनवाढ ३ वर्ष कालावधीसाठी स्थगित का करण्यात येऊ नये ? अशी कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कात्रज-कोंढवा रोडवरील पाणीपुरवठा लाईनची दुरुस्ती करण्याबाबत

**(६१) * ३२३४८ श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हयातील कात्रज-कोंढवा रोडवरील उड्डाणपुलाच्या खालील रस्त्यावरुन जाणारी कात्रज पंपींग स्टेशन ते केदारेश्वर पाण्याची टाकी यादरम्यान सुमारे १२९६ मि.मी.व्यासाची पाणीपुरवठा लाईन वारंवार फुटून लाखो लीटर पाणी वाया जात असल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार पाणीपुरवठा करण्याच्या लाईनची योग्य देखभाल करण्याबाबत व याकडे दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यावर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) कात्रज पंपिंग स्टेशन ते केदारेश्वर पाण्याची टाकी या दरम्यानची पाईपलाईन फुटल्यामुळे पाणी वाया जात असल्याच्या घटना अधूनमधून घडत असतात, ही वस्तुस्थिती आहे.

(२) उक्त प्रकरणी पाहणी केली असता जलवाहिनी विकसित करताना ठिकठिकाणी मॅनहोल ठेवण्यात आलेले आहेत, सदर मॅनहोलचे झाकणाचे वेल्डींगला तडा गेल्याने सदर जलवाहिनीची गळती झाल्याची बाब जून, २०१७ मध्ये निदर्शनास आलेली आहे.

याबाबत तातडीने कार्यवाही करून गळती बंद करण्यात आलेली असून लाईनची योग्य देखभाल वेळीच झालेली आहे तथापि अशा प्रकारे वारंवार घटना घडू नयेत याबाबत दक्षता घेण्याच्या सूचना पुणे महानगरपालिकेस देण्यात आलेल्या आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## औरंगाबाद महापालिकेने वीज बचतीचे काम दिलेल्या ठेकेदाराने अटी शर्थीचे उल्लंघन केल्याबाबत

**(६२) * ३२४२७ श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद महापालिकेने सन २०१३-२०१४ व २०१४-२०१५ या आर्थिक वर्षात वीज बचतीचे ठेकेदाराला दिलेले काम महापालिकेने दिलेल्या अटी शर्तीनुसार न करता ७ कोटी रुपये ठेकेदाराला दिल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार महापालिकेने घातलेल्या अटी शर्थीनुसार काम न करणाऱ्या ठेकेदारावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) हे खरे नाही.

औरंगाबाद शहरातील एकूण ९५०० नग सोडियम पथदिव्यांच्या ठिकाणी ऊर्जा बचतीचे पथदिवे लावण्यात आलेले आहेत.

सदरचे काम औरंगाबाद महानगरपालिकेने बी.ओ.टी तत्वावर मे.विनवॉक सिस्टीम्स, नाशिक यांच्याकडून विहित अटी व शर्तीनुसार करुन घेतले आहे.

सदर बि.ओ.टी. तत्वांवरील पथदिव्यांच्या कामाचा एकूण कालावधी सात वर्षाचा असून सदर कामावर एकूण रुपये १७.८८ कोटी इतका खर्च झालेला आहे. या कामात वार्षिक सरासरी ४०% वीज बचत झालेली असून ठेकेदारास वेळोवेळी विहित अटी व शर्ती नुसार देयक मंजूर करण्यात आले असल्याचे आयुक्त, औरंगाबाद महानगरपालिका यांनी कळविले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## स्वातंत्र्य सैनिकांची निवृत्ती वेतनाची प्रकरणे निकाली काढण्याबाबत.

**(६३) * ३२३०७ श्रीमती हुस्नबानू खलिफे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या नव्या निकषानंतर आवश्यक कागदपत्रे न जोडल्याने सुमारे ४ ते ५ हजार स्वातंत्र्य सैनिकांचे निवृत्तीवेतन प्रकरणे नामंजूर करण्यात आली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणांची शासनाने पडताळणी करुन स्वातंत्र्य सैनिकांची निवृत्ती वेतनाची प्रकरणे निकाली काढण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) शासन निर्णय दि.०४.०७.१९९५ नुसार (अ) तुरुंगवास झालेले स्वातंत्र्य सैनिक, (आ) पकड वॉरंट निघाल्यामुळे फरारी राहिलेले स्वातंत्र्य सैनिक, (इ) भूमिगत स्वातंत्र्य सैनिक आणि (ई) गोवा मुक्ती संग्रामात सहभागी झालेले स्वातंत्र्य सैनिक यांनी निवृत्तीवेतन मिळण्यासाठी कोणते पुरावे सादर करणे आवश्यक आहे, हे विहित करण्यात आलेले आहे.

या शासन निर्णयान्वये विहित निकषांची पूर्तता ज्या अर्जदारांच्या बाबतीत होत नाही, अशा अर्जदारांचे अर्ज सन १९९६ पासून आतापर्यंतच्या कालावधीत नामंजूर करण्यात आलेले आहेत.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईत डेंग्युच्या साथीचा प्रादुर्भाव रोखण्याबाबत

**(६४) * ३१११६ आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.जनार्दन चांदूरकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेकडून डेंग्यु विरोधात दर महिन्याला सरासरी रुपये ८.२८ लाख खर्च करुन देखील डेंग्युच्या आजारात वाढ झाली असल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महानगरपालिकेच्या निष्काळजीपणामुळे डेंग्यु व मलेरियाचा प्रादुर्भाव वाढत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबईतील डेंग्यु व मलेरिया व अन्य साथीच्या आजारांचा प्रादुर्भाव रोखण्याबाबत तसेच यासंदर्भात निष्काळजीपणा करणा-या संबंधित अधिका-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२), (३) व (४) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या साथरोग नियंत्रण कक्षाच्या आकडेवारीनुसार, निश्चित डेंगी रुग्णांची संख्या जानेवारी ते जून या कालावधीत सन २०१५ मध्ये १७१, सन २०१६ मध्ये १६२ व सन २०१७ मध्ये १३० इतकी होती.

बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत डेंगी व मलेरिया आजाराच्या प्रतिबंधासाठी दर महिन्याला कर्मचाऱ्यांच्या वेतनासह सरासरी रुपये १०.४५ कोटी इतका खर्च येतो ही वस्तुस्थिती आहे.

डेंगी व मलेरिया आजारावर नियंत्रण आणण्याकरिता महानगरपालिकेमार्फत पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे :-

- जानेवारी ते जून २०१७ या कालावधीत डेंगी आजार पसरविणाऱ्या एडिस डासांची ५४२३ व मलेरिया आजार पसरविणाऱ्या ॲनॉफिलीस डासांची ११७५ उत्पत्तीस्थाने नष्ट करण्यात आली आहेत.
- महापालिका क्षेत्रातील झोपडपट्टी विभागात किटक नियंत्रण विभाग व आरोग्य स्वयंसेविकांमार्फत ड्रममध्ये भरुन ठेवलेल्या पाण्यामध्ये टेमिफॉस डास अळीनाशक टाकण्यात आले आहे.
- स्वच्छ मुंबई प्रबोधन अभियान व महानगरपालिकेच्या कामगारांमार्फत ताडपत्र्यांमध्ये साचलेल्या पाण्याचा निचरा करण्यात येऊन काही ठिकाणी ताडपत्रे काढण्यात आली आहेत. तसेच, इतर डास उत्पत्तीस्थानांवर डास अळीनाशक तेलाची फवारणी करण्यात आली आहे.
- जानेवारी ते जून २०१७ या कालावधीत झोपडपट्टी विभागातील छपरांवर ठेवण्यात आलेले १०,१९४ टायर्स काढून टाकण्यात आले आहेत.
- गृहनिर्माण संस्थांमधील व झोपडपट्टी परिसरातील २,२४,७२८ अडगळीचे सामान / भंगार वस्तू काढून टाकण्यात आले आहे.
- गृहनिर्माण संस्थांमध्ये एडिस डासाचे उत्पत्ती शोधक नेमण्याकरिता अपील पत्रे देण्यात येऊन ५२६ डास उत्पत्ती शोधकांना प्रशिक्षण देण्यात आले.
- दररोज प्रभागनिहाय २३४ धुम्रफवारणी यंत्राद्वारे धुम्रफवारणी करण्यात येते.
- उच्चभ्रू वस्तीत डासांची उत्पत्तीस्थाने असलेल्या शोभेच्या फुलदाण्या, कुंडीखालील प्लेटमधील पाणी, फेंगशुईकरिता वापरात असलेल्या विविध वस्तुंमध्ये साचलेले पाणी, प्लास्टिकचे वापरलेले छोटे कप, पत्र्यांचे डबे, वापरात नसलेले टायर्स काढून टाकणे, छतावरील प्लास्टिक शेडमध्ये जमा झालेले पाणी, एसीमधून सोडलेले पाणी, रेफ्रीजरेटरच्या मागील बाजूस डिफ्रॉस्टींगमुळे जमा झालेले पाणी इत्यादी काढून टाकण्यासाठी जनजागृती करण्यात आली.
- प्रशिक्षण व जनजागृतीसाठी प्रमुख वृत्तपत्रात डेंगीविषयक माहिती प्रसिध्द करण्यात येते.
- वस्ती पातळीवर आरोग्य शिक्षण तसेच, माहितीपत्रके व भित्तीपत्रकांचे वाटप करण्यात येते.

- नगरसेवक, आमदार, खासदार व सामाजिक कार्यकर्त्यांबरोबर ठिकठिकाणी विशेष कार्यक्रम आयोजित केले जातात.
- वाहनांवर लाऊडस्पीकर लावून जनजागृती करण्यात येते.
- जनजागृती करुनही ज्या रहिवाशांनी प्रतिबंधात्मक उपाययोजना अंमलात आणल्या नाहीत व जेथे डासांची उत्पत्ती आढळून आली अशा ६०८२ ठिकाणी जानेवारी ते जून २०१७ या कालावधीत मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम ३८१(१), ३८१(अ), ३८१ (ब) अन्वये कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे.
- याव्यतिरिक्त डासांच्या अळया सापडल्यावर ११९७ ठिकाणी ताकिद पत्रे देण्यात आली आहेत.

-----------------

**डोंबिवली (पूर्व) भागात भूमाफियांनी बेकायदा इमारती उभारल्याबाबत**

**(६५) * ३२८५४ श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डोंबिवली (पूर्व) भागातील नांदिवली पंचानंद (पी अ‍ॅण्ड टी कॉलनीजवळ) येथील महापालिकेच्या विकास आराखडयातील रस्त्यामध्ये काही भूमाफियांनी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण तसेच महापालिकेला न जुमानता सात ते आठ टोलेजंग बेकायदा इमारती उभारल्या असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भुमाफियांनी सर्व नियम डावलून इमारतीचे बांधकाम केल्याने स्थानिक सांडपाणी वाहून जाण्यास अडथळे निर्माण होत असून सांडपाणी गल्ली बोळात साचून राहत असल्याने परिसरातील रहिवाश्यांना दुर्गंधीचा सामना करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू बेकायदा बांधकामाबाबत मा.मुख्यमंत्री यांच्याकडे येथील रहिवाश्यांनी तक्रारी करुनही अदयाप कोणतीच कार्यवाही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तद्नुसार दोषी व्यक्तीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) अंशतः खरे आहे.

- कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रात २७ गावे दिनांक १४/०५/२०१५ च्या अधिसूचनेन्वये नव्याने समाविष्ट केली आहेत.
- सदर २७ गावांचा विकास आराखडा दिनांक ०९/०५/२०१७ रोजी अंतिमत: मंजूर झाला आहे.
- सदर मंजूर विकास योजनेतील नकाशाप्रमाणे काही बांधकामे विकास योजना रस्त्यावर/रस्त्यालगत आहेत, ही वस्तुस्थिती आहे.
- तथापि, सदरची काही बांधकामे विकास आराखडा मंजूर होण्यापूर्वी झाल्याचे निदर्शनास आले आहे.

(२)

- उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे २७ गावांसाठी विकास आराखडा मंजूर होण्यापूर्वीची काही बांधकामे विकास योजना रस्त्यावर/रस्त्यालगत असल्याचे दिसून आले आहे.
- या परिसरात सांडपाणी साचून येणाऱ्या दुर्गंधीबाबत महानगरपालिकेस ठोस तक्रारी प्राप्त झालेल्या नाहीत. तथापि, दैनंदिन स्वच्छता व सांडपाणी व्यवस्थापनासाठी महानगरपालिकेमार्फत आवश्यक ती कार्यवाही नियमितपणे करण्यात येते.

(३) व (४)

- कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील काही भागातून अनधिकृत बांधकामाबाबत नागरिकांच्या तक्रारी प्राप्त झाल्या.
- सदर तक्रारीस अनुसरुन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतूदीनुसार कायदेशीर प्रक्रिया पुर्ण करुन महानगरपालिकेने अधिनियमातील कलम ४७८ अन्वये अनधिकृत बांधकामे म्हणून घोषित केली आहेत.
- सदर अनधिकृत बांधकामाच्या निष्कासनाचा कृति आराखडा महानगरपालिकेमार्फत तयार करण्यात आलेला असून त्या अनुषंगाने कारवाई करण्यात येत आहे.
- सदर अनधिकृत बांधकामांवर कारवाई करण्यास स्थानिकांचा तीव्र विरोध होत असल्याने "विशेष पोलीस बल" उपलब्ध करुन देण्याची महानगरपालिकेने पोलीस आयुक्त, ठाणे यांना विनंती केली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## कर्जत (जि. रायगड) येथील कोंढाणे धरण सिडकोकडे हस्तांतरित करण्याबाबत

**(६६) * ३३७९८ श्री.जनार्दन चांदूरकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई क्षेत्रातील रहिवाशांना (ता.खालापूर, जि.रायगड) येथील मोरबे धरणातून महानगरपालिका पाणीपुरवठा करते परंतु खारघर, पनवेल, कामोठे, कळंबोली, रण या दक्षिण नवी मुंबईतील रहिवाशांना पाणीपुरवठा करताना या महानगरपालिकेला अथक प्रयत्न करावे लागत असल्याचे दिनांक १७ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कारणास्तव सदरहू विभागातील नागरिकांना पाणीपुरवठा करण्यासाठी सिडकोने शासनाकडे कर्जत (जि.रायगड) येथील कोंढाणे धरण मागितले असून याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) नाही.

नवी मुंबई महानगरपालिकेच्या मोरबे धरणातून फक्त कामोठे या सिडको वसाहतीत दैनंदिन ३५ द.ल.लि. इतका पाणीपुरवठा करण्यात येतो. खारघर, कळंबोली, पनवेल, द्रोणागिरी व उलवे या सिडको वसाहतीस हेटवणे धरणातून १०० द.ल.लि. व महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्या पाताळगंगा योजनेतून दैनंदिन ६३ द.ल.लि. इतका पाणीपुरवठा करण्यात येतो. दुरुस्तीसाठी अथवा विद्युत पुरवठा खंडीत झाल्यास तेवढ्या कालावधीमध्ये पाण्याची कमतरता भासते.

(२) सिडकोने केलेल्या मागणीच्या अनुषंगाने कर्जत (जि.रायगड) येथील कोंढाणे धरण सिडकोला हस्तांतरीत करण्यास तसेच सदर प्रकल्प पाणीपुरवठा प्रकल्प म्हणून घोषित करण्यास राज्य मंत्रिमंडळाने दिनांक ३ जुलै, २०१७ च्या बैठकीमध्ये मान्यता दिली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## घाटकोपर (पश्चिम) गावदेवी रोड येथील इमारतीच्या पुनर्बांधणीचे काम प्रलंबित असल्याबाबत

**(६७) * ३३५०६ श्री.रामनिवास सिंह :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) घाटकोपर (पश्चिम) गावदेवी रोड येथील स्वामी लिला शहा व हितेश को.ऑ.सोसायटी या दोन्ही इमारतीच्या पुनर्बांधणीचे दोन वर्षापूर्वी सुरु केलेले काम प्रलंबित असून विकासक रहिवाश्यांना भाडे देखील देत नसल्याने रहिवाश्यांना आर्थिक भुर्दंड सहन करून भाडयाच्या घरात राहण्याची वेळ आल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, घाटकोपर (पश्चिम) गावदेवी रोड येथील जैनभवन व सोमेश्वर सोसायटीचे पुनर्बांधणीचे काम मागील ८ वर्षापासून प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रश्न भाग (२) मध्ये नमूद दोन्ही इमारतीमध्ये एकूण ५५ भाडेकरु राहत असून सदर प्रकल्प हा १२ मजल्याचा असून विकासक परेश छाबरिया यांनी भाडेकरुना पर्यायी भाडयाच्या घरात राहण्याकरिता भाडे दिले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी लोकप्रतिनिधीनी दिनांक २४ मार्च, २०१७ रोजी वा त्यासुमारास मा.मंत्री महोदयांना पत्रव्यवहार करुनही यावर कोणतीही कार्यवाही झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तदनुषंगाने दोषी विकासकाविरुध्द कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता :** (१), (२) व (३) होय

(४) नाही. प्रस्तुत प्रकरणी विधान परिषद सदस्य श्री. रामनिवास सिंह यांनी दिनांक २४/३/२०१७ रोजी मंत्री (गृहनिर्माण) यांना पत्र दिले, ही बाब खरी आहे. सदर पत्राच्या अनुषंगाने दिनांक ६/४/२०१७ रोजी मंत्री (गृहनिर्माण) यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली होती. तथापि, काही अपरिहार्य कारणामुळे सदरहू बैठक झाली नाही.

(५) व (६) प्रस्तुत प्रकरणा संदर्भात असे आढळून आले आहे की, सदरहू प्रकल्प हे खाजगी पुनर्बांधणीचे प्रकल्प असून, संबंधित विकासकाविरुध्द रहिवाश्यांची तक्रार आहे. अशाप्रकारची प्रकरणे हाताळण्यासाठी दिनांक १/५/२०१७ पासून महाराष्ट्र राज्यात महाराष्ट्र स्थावर संपदा नियामक प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली असून, उपरोक्त प्राधिकरणाकडे दाद मागण्याचा मार्ग रहिवाश्यांकडे खुला आहे.

-----------------

## परभणी महानगरपालिकेत शौचालय बांधकामाचे अर्ज प्रलंबित असल्याबाबत

**(६८) * ३२२८५ श्री.रामराव वडकुते :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या स्वच्छ महाराष्ट्र अभियानामध्ये परभणी महानगरपालिकेकडे दिनांक ३१ मे, २०१७ रोजीपर्यंत १७ हजार लाभार्थ्यांनी शौचालय बांधकामासाठी अर्ज केले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यापैंकी सुमारे १० हजार लाभार्थी अजूनही लाभापासून वंचित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, १० हजार लाभार्थी वंचित असण्याची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत परभणी महानगरपालिकेकडे दिनांक ३१ मे, २०१७ रोजीपर्यंत शौचालय बांधकामासाठी एकूण १०,८७८ लाभार्थ्यांचे अर्ज प्राप्त झाले होते.

(२)

- परभणी महानगरपालिकेकडे शौचालय बांधकामासाठी दिनांक ४/७/२०१७ पर्यंत एकूण १३,१५० अर्ज प्राप्त झाले आहेत.
- त्यापैकी एकूण ११,०४३ लाभार्थ्यांना पहिल्या हप्त्याचे अनुज्ञेय अनुदान वाटप करण्यात आले आहे. त्यापैकी एकूण १,९८५ लाभार्थ्यांना संपूर्ण अनुज्ञेय अनुदान वाटप करण्यात आले आहे.
- परभणी महानगरपालिका क्षेत्रातील सर्व पात्र लाभार्थ्यांना शौचालय बांधकामांसाठी अनुदान वितरीत करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईत विविध ठिकाणी बसविण्यत आलेले सी.सी.टी.व्ही. कॅमेरे निकृष्ट दर्जाचे असल्याबाबत

**(६९) * ३२५०१ श्री.अमरिशभाई पटेल, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील विविध ठिकाणी निकृष्ट दर्जाचे सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आल्याची बाब माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निकृष्ट दर्जाचे सीसीटीव्ही कॅमेरे बसविल्यामुळे गुन्ह्यांचा शोध लागत नसल्याचे पोलिसांकडून सांगण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त सीसीटीव्ही कॅमे-यांच्या दर्जाबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार याप्रकरणातील संबंधित अधिका-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, उत्कृष्ट दर्जाचे सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) मुंबई सीसीटीव्ही प्रकल्पांतर्गत मुंबई शहरामध्ये बसविण्यात आलेले सीसीटीव्ही कॅमेरे चांगल्या प्रतिचे (High Definition) आहेत. सदर कॅमे-यांद्वारे होणारे रेकॉर्डींग चांगल्या प्रतिचे असून या प्रकल्पाच्या निविदेतील अटी व शर्तीनुसार सदर कॅमेरे बसविण्यात आले आहेत.

(२), (३), (४), व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या स्पर्धा परीक्षार्थींच्या मागण्यांबाबत**

**(७०) * ३२६७० श्री.कपिल पाटील, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या स्पर्धा परीक्षांमध्ये डमी उमेदवार बसविल्याचे रॅकेट नांदेड येथे निदर्शनास आले आहे आणि खोटया क्रीडा प्रमाणपत्रावर राज्यसेवेत अनेक अधिकाऱ्यांची नियुक्ती झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बोगस प्रकार रोखण्यासाठी सदर परिक्षेसाठी बायोमॅट्रीक हजेरी पध्दत सुरु करणे आणि अन्य मागण्यांसाठी या विद्यार्थ्यांनी सातत्याने केलेल्या आंदोलनाची दखल शासनाने घेतली आहे काय,

(३) असल्यास, राज्यात तामिळनाडू पॅटर्न सुरू करण्याच्या मागणीवर शासनाची भूमिका काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे अंशत: खरे आहे.

आयोगाने घेतलेल्या लिपिक-टंकलेखक परीक्षा २०१४ मध्ये एका डमी उमेदवाराबाबतची बाब अलिकडेच निदर्शनास आली आहे.

शिफारसपात्र उमेदवारांना नियुक्ती देण्यापुर्वी क्रीडा प्रमाणपत्रे तसेच शैक्षणिक अर्हता, वय, आरक्षित प्रवर्ग इत्यादी दाव्याबाबतची प्रमाणपत्रे पडताळणी करुनच नेमणूका द्याव्यात अशा सूचना विभागांना देण्यात आलेल्या आहेत.

(२) आयोगाच्या स्पर्धा परीक्षांसाठी बायोमॅट्रीक पध्दत वापरण्यासाठी आंदोलन झालेले नाही. तथापि, प्रतिक्षा यादी, तामिळनाडू पॅटर्न इ. अन्य मागण्यांसाठी निवेदने प्राप्त झालेली आहेत

संभाव्य गैरप्रकार रोखण्यासाठी आयोगाच्या परीक्षेस अर्ज करताना उमेदवाराच्या आधार क्रमांकाचा समावेश अर्जामध्ये करण्याची पध्दत सन २०१६ पासून सुरु करण्यात आली आहे.

(३) व (४) तामिळनाडू पॅटर्नच्या संबंधात उमेदवारांकडून प्राप्त झालेल्या निवेदनाच्या अनुषंगाने आयोगाच्या कार्यालयाच्या स्तरावर तपासणी करण्यात येत असून याबाबत तामिळनाडू लोकसेवा आयोगाकडून तामिळनाडू पॅटर्नच्या वेळापत्रकाच्या अंमलबजावणी व फलनिष्पत्तीबाबत माहिती घेण्यात येत आहे.

तामिळनाडू पॅटर्न प्रमाणेच आयोगामार्फत पुढील वर्षभरात आयोजित केल्या जाणा-या स्पर्धा परीक्षांचे वेळापत्रक साधारण नोव्हेंबर/डिसेंबर महिन्यामध्येच आयोगाच्या संकेतस्थळावर आगाऊ प्रसिध्द केले जाते व त्यानुसार परीक्षा घेतल्या जातात.

-----------------

## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातील मौल्यवान धातूच्या नाण्यांची चोरी झाल्याबाबत

**(७१) * ३२७९१ श्री.गिरीशचंद्र व्यास, प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार, श्री.मितेश भांगडिया :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या प्राचीन भारतीय ऐतिहासिक संस्कृती व पुरातन विभागातून मौल्यवान धातूची नाणी चोरीस गेली असून अद्याप सदर प्रकरणातील संशयितावर कारवाई झाली नसल्याचे दिनांक २० एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून गुन्हेगारावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या प्राचीन भारतीय ऐतिहासिक संस्कृती व पुरातन विभागाकडून २६३३ पुरातन वस्तु व २२४ विष्णुकंडीण नाणी चोरीस गेल्याचे दिनांक १९ एप्रिल, २०१७ रोजी निदर्शनास आले आहे.

सदर प्रकरणी स्थावर अधिकारी, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या प्राचीन भारतीय ऐतिहासिक संस्कृती व पुरातन विभागातून २६३३ पुरातन वस्तु व २२४ विष्णुकंडीण नाणी गहाळ झाल्याबाबत दिलेल्या तक्रारीवरुन पोलीस स्टेशन, अंबाझरी येथे अपराध क्रमांक ७२/१७ कलम ३८० भादंवि प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याचा सखोल तपास सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मोरबे (ता.खालापूर, जि.रायगड) धरणातील पाण्याची चोरी होत असल्याबाबत**

**(७२) * ३२४५९ श्री.जयंत पाटील, श्री.बाळाराम पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोरबे (ता.खालापूर, जि.रायगड) धरणातील पाण्याचा पुरवठा नवी मुंबई तसेच पनवेल, उरण परिसरातील गावांना केला जात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या धरणालगतच्या परिसरात मोठमोठे प्रकल्प सुरू असून संबंधित विभागाला डावलून प्रकल्प उभारणी करणाऱ्यांमार्फत अनधिकृतपणे पंपाद्वारे टँकरमध्ये पाणी भरून पाणी चोरी केली जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अनधिकृतपणे चोरी करणा-ऱ्या प्रकल्पाच्या मालकांविरूध्द संबंधित विभागाने गुन्हा दाखल केला आहे काय,

(४) असल्यास, केव्हा व कोणत्या प्रकल्पाच्या मालकाविरूध्द गुन्हे दाखल करण्यात आले आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२)

- मोरबे धरणातून नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रास तसेच जलवाहिनी लगत असलेल्या पनवेल तालुक्यातील आदई, सुखापूर, विचुंबे, चिखले, शिवकर, बोरले व तळेगाव या सात गावांना पाणी पुरवठा करण्यात येतो.

- धरणावर महानगरपालिकेची २४ तास सुरक्षा व्यवस्था कार्यरत असून जलवाहिनीस २४ तास गस्त घालण्यात येते. अशाप्रकारे पाणी चोरी न होण्याची सर्वप्रकारे दक्षता घेण्यात येते.
- तरीही पाणी चोरी आढळून आल्यास त्यावर कडक कारवाई करण्याच्या सूचना महानगरपालिकेमार्फत देण्यात आलेल्या आहेत.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नागपूर शहरातील देवडिया मॅटर्निटी होम व मिनी माता नगरातील दवाखाना बी.ओ.टी. तत्वावर चालविण्याच्या प्रस्तावाबाबत**

**(७३) * ३१८४९ प्रा.अनिल सोले, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.मितेश भांगडिया :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरातील महानगरपालिका अधिनस्त देवडिया मॅटर्निटी होम व मिनी माता नगरातील दवाखाना मागील अनेक वर्षापासून बंद असल्याने सदर दवाखाना बी.ओ.टी. तत्वावर चालविण्याचा प्रस्ताव असल्याचे दिनांक १२ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर दवाखाना मल्टीस्पेशालीटी धर्तीवर चालविण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर दवाखाना कोणत्या धर्तीवर चालविण्यात येणार त्याबाबत निकष ठरविण्यात आले आहेत काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२), (३) व (४) नागपूर शहरातील महानगरपालिकेचे देवडिया हॉस्पिटल, क्वेटा कॉलनी हे मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल म्हणून बी.ओ.टी. (बांधा, वापरा व हस्तांतरीत करा) तत्वावर विकसित करण्याच्या प्रस्तावास, नागपूर महानगरपालिकेमार्फत मंजुरी देण्यात आली असून, त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

तर, मिनीमाता नगरातील महानगरपालिकेच्या दवाखान्याचा नॅशनल अर्बन हेल्थ मिशन अंतर्गत विकास करण्याचा महापालिकेचा प्रस्ताव आहे.

-----------------

## खोटे प्रतिज्ञापत्र व कागदपत्राद्वारे गृहनिर्माण सोसायटीच्या स्थापना करुन शासन व म्हाडाची फसवणूक केल्याबाबत

**(७४) * ३२८१२ श्री.प्रविण दरेकर, श्री.धनंजय मुंडे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खोटे प्रतिज्ञापत्र व कागदपत्राद्वारे गृहनिर्माण सोसायटीच्या स्थापना करुन शासन व म्हाडाची सुमारे ४० कोटीची फसवणूक केल्याप्रकरणी चेंबूरमधील टिळकनगर पोलीस ठाण्यात सोसायटीच्या माजी पदाधिका-यासह सहा जणांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तद्नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता :** (१) व (२) उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, म्हाडा यांचेकडून प्राप्त अहवालानुसार, महालक्ष्मी पॅलेस सहकारी गृहनिर्माण संस्था, टिळक नगर, चेंबूर या संस्थेने सदरहू संस्थेतील शासकीय/अधिकारी/कर्मचारी यांच्यासाठी आरक्षित असलेल्या १०% सदनिका शासनाच्या ताब्यात न देता परस्पर खुल्या बाजारात विकल्या आहेत तसेच म्हाडाच्या वाटप / देकार पत्रातील भूभाडेपट्टा करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार सदरहू संस्थेने वाढीव सभासदांची पात्रता म्हाडामार्फत करुन घेतलेली नाही. अशा प्रकारे सदरहू गृहनिर्माण संस्थेने म्हाडा व शासनाची फसवणूक केली असून त्या संदर्भात टिळक नगर, चेंबूर पोलीस ठाणे येथे पहिली खबर क्रमांक १५९ वर्ष २०१७ दिनांक ०८/०६/२०१७ अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ठाणे महानगरपालिकेतील कंत्राटी कर्मचाऱ्यांना नियमित सेवेत सामावून घेणेबाबत

**(७५) * ३१४३१ ॲड.निरंजन डावखरे : तारांकित प्रश्न क्रमांक २७१६७ ला दिनांक २२ मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे महानगरपालिका आस्थापनेवर कार्यरत कंत्राटी कर्मचाऱ्यांना कायम करण्याचा अधिकार असताना सुध्दा महानगरपालिका प्रशासनाने शासनाकडे मार्गदर्शन मागितले असल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये व त्यानंतर मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ठाणे महानगरपालिकेच्या आस्थापनेवर शासनाने केलेल्या पदनिर्मितीनुसार रिक्त पदांवर अनेक वर्षांपासून काम करणाऱ्या सदर कंत्राटी कर्मचाऱ्यांना महानगरपालिका सेवेत कायम करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, त्याबाबतची सद्यस्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) ठाणे महानगरपालिकेच्या आस्थापनेवर त्यांनी केलेल्या विनंतीनुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ५१ (४) नुसार नगर विकास विभागाने यापूर्वी दिनांक ३१/०१/२०००, दिनांक १८/०२/२००३ व दिनांक २३/०७/२००३ च्या शासन निर्णयान्वये एकूण १,३१६ पदांना मंजुरी दिली होती.

या मंजूर पदांवर सेवा प्रवेश नियम, सेवा जेष्ठता व वेळोवेळी शासनाने निर्गमित केलेले शासन आदेशांच्या अनुषंगाने निवड प्रक्रियेत पात्र ठरलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना यापूर्वी ठाणे महानगरपालिकेत नियुक्ती देण्यात आली आहे.

या प्रक्रियेद्वारे निवड न झालेल्या अस्थायी/ कंत्राटी कर्मचाऱ्यांनी लोक प्रतिनिधीमार्फत वारंवार विनंती केल्यामुळे ठाणे महानगरपालिकेने माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये शासनाशी पत्र व्यवहार केला आहे.

ठाणे महानगरपालिकेच्या आस्थापनेवर शासनाने महानगरपालिकेच्या मागणीनुसार आवश्यक ती पद निर्मिती केलेली आहे. त्यानुसार रिक्त पदांवर विहित प्रक्रियेचे अनुपालन करुन ठाणे महानगरपालिकने पद भरती करण्याच्या सूचना ठाणे महानगरपालिकेस देण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महिंद्र ॲण्ड महिंद्र कारखान्यातील कंत्राटी कामगारांचे निर्मुलन बोर्डात विचाराधीन असलेले प्रकरण निकाली काढणेबाबत

**(७६) * ३३१६० श्री.नागोराव गाणार, प्रा.अनिल सोले :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्ह्यातील महिंद्र ॲण्ड महिंद्रची एम.आय.डी.सी क्षेत्र हिंगणा रोड या कारखान्यातील कंत्राटी कामगारांचे निर्मुलन बोर्डात विचाराधीन असलेल्या प्रकरणी निर्णय करून निकाली काढणेबाबत मा. कामगार मंत्री यांना स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निवेदन दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर :** (१) हे खरे आहे.

मा. श्री सुधाकर वि.कोहळे, विधानसभा सदस्य (दक्षिण नागपूर) यांनी तसेच मा. डॉ. परिणय फुके, विधानपरिषद सदस्य यांनी अनुक्रमे दिनांक ०३/०४/२०१७ व १८/०४/२०१७ रोजी मा. ना. श्री संभाजी पाटील-निलंगेकर, मंत्री(कामगार) महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना निवेदने सादर करुन महिंद्रा अॅन्ड महिंद्रा कंपनीच्या कामगारांच्या प्रश्नावर / मे. महिंद्रा अॅन्ड महिंद्रा (ट्रॅक्टर डिव्हिजन) नागपूर येथील कंत्राटी कामगारांच्या निर्मुलनाकरिता बैठक आयोजित करण्याबाबत विनंती केलेली होती.

(२) उपरोक्त निवेदनांच्या अनुषंगाने मा. मंत्री (कामगार) महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे समक्ष दिनांक ०५/०७/२०१७ रोजी बैठक आयोजित करण्यात आलेली होती. परंतु काही अपरिहार्य कारणास्तव सदरहू बैठक पुढे ढकलण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईत आझाद मैदानावर उपोषणास बसलेल्या बेरोजगार अभियंत्याचा मृत्यू झाल्याबाबत

**(७७) * ३१२०८ श्री.किरण पावसकर, श्री.धनंजय मुंडे, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.आनंद ठाकूर, श्रीमती विद्या चव्हाण, अॅड.राहुल नार्वेकर, श्री.सतिश चव्हाण, श्री.नागोराव गाणार, प्रा.अनिल सोले, श्री.जयवंतराव जाधव, श्री.सुनिल तटकरे, श्री.अमरसिंह पंडित, अॅड.निरंजन डावखरे, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत आझाद मैदानावर उपोषणास बसलेल्या कंधार येथील बेरोजगार अभियंत्याचा मृत्यू झाल्याची घटना माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त उपोषणा दरम्यान मृत्यू पावलेल्या अभियंत्याच्या कुटुंबियांना शासन मदत देणार आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तदनुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर कुटंबास मा.मुख्यमंत्री सहायता निधी मधून आर्थिक मदत देण्याबाबतच्या प्रस्तावावर कार्यवाही सुरु आहे.

(३) सदर प्रकरणात करण्यात आलेल्या चौकशीनुसार दिनांक ०५/०४/२०१७ रोजीपासून सदर व्यक्ती आझाद मैदान येथे उपोषणास बसले होते. दिनांक २८/०४/२०१७ रोजी उपोषणा दरम्यान ते आजारी पडल्याने त्यांना गोकुळदास

तेजपाल रुग्णालयात दाखल करण्यात आले असता दिनांक ०६/०५/२०१७ रोजी त्यांचा मृत्यू झाला. प्राथमिक अहवालात वैद्यकीय अधिकारी यांनी त्यांचा नैसर्गिक मृत्यू झाल्याचे नमुद केले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पाचोरा (जि.जळगाव) येथे बनावट नोटा छापणाऱ्या ठिकाणी पोलिसांनी धाड टाकल्याबाबत**

**(७८) * ३३३७५ श्रीमती स्मिता वाघ, ॲड.अनिल परब :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पाचोरा (जि.जळगाव) येथे पाचशे रुपयांच्या बनावट नोटा छापणाऱ्या ठिकाणी पोलिसांनी दिनांक ३० मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास धाड टाकून ९२ हजारांच्या नोटा जप्त करुन याप्रकरणी एका शिक्षकासह पाच जणांना अटक केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तदनुसार संबंधित दोषीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) सदर घटना पाचशे रुपयांच्या बनावट नोटांशी निगडीत नसुन १०० रुपये दराच्या बनावट चलनी नोटा संदर्भात आहे.
सदर प्रकरणी दिनांक ३१/०५/२०१७ रोजी ५ आरोपींना अटक करुन त्यांच्याकडुन एकूण ७३,९००/- रुपये (रुपये १०० किंमतीचे एकूण ७३९ नग) किंमतीच्या बनावट चलनी नोटा व २७० नग अर्धवट छापलेल्या/प्रिंट केलेल्या बनावट नोटा जप्त केल्या आहेत.
(२) सदर प्रकरणी एकुण ६ आरोपींविरुद्ध दिनांक ३१/०५/२०१७ रोजी भडगांव पोलीस स्टेशन, भाग-५ येथे गु.र.नं.६४/२०१७ भा.दं.वि. कलम ४८९(अ) (क) (ड), १२० (ब), ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करुन ५ आरोपींना अटक करण्यात आली आहे. एक आरोपी फरार आहे. गुन्हा तपासावर प्रलंबित आहे.
(३) विलंब झालेला नाही.

-----------------

**औरंगाबाद महानगरपालिका अग्निशमन दलासाठी "महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियान" अंतर्गत नवीन पदनिर्मिती करणेबाबत**

**(७९) * ३२१८६ श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबाद महानगरपालिका अग्निशमन दलासाठी "महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियान" अंतर्गत नवीन पदनिर्मितीसाठी महानगरपालिकेने आकृतीबंध ठरविला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महानगरपालिकेतील पाच अग्निशमन केंद्र व सात अग्निशमन वाहनासाठी अग्निशमन विभागास २३२ अधिकारी/ कर्मचारी पदे निर्माण करण्यास महानगरपालिकेने दिनांक ७ सप्टेंबर, २०११ रोजीच्या सर्वसाधारण सभेत मान्यता दिली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, २३२ पदे मान्य करणेसाठी शासनाकडे प्रस्ताव पाठवला असून तो प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रस्ताव मंजूर करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२), (३) व (४) औरंगाबाद महानगरपालिकेतील अधिकारी / कर्मचारी यांच्या पदांचा आकृतीबंध तसेच सेवाप्रवेश नियमास मान्यता देण्याचा प्रस्ताव महानगरपालिकेने शासनाकडे सादर केला होता.

सदर प्रस्तावास महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेच्या मान्यतेची आवश्यकता असल्याने, मान्यता घेऊन सदर प्रस्ताव शासनास सादर करण्याबाबत आयुक्त, औरंगाबाद महानगरपालिका यांना कळविण्यात आलेले आहे.

औरंगाबाद महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेच्या मान्यतेचा ठराव प्राप्त झाल्यानंतर पदांचा आकृतीबंध तसेच सेवाप्रवेश नियमांस मान्यता देण्याबाबतची पुढील कार्यवाही शासन स्तरावरुन करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मेक इन इंडिया मिशनमध्ये गुंतवणूक करण्याचे आवाहन करून लोकांची फसवणूक केल्याबाबत

**(८०) * ३११२३ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईत चार व्यक्तींनी मेक इन इंडिया मिशनमध्ये गुंतवणूक करण्याचे आवाहन करुन २५ हजार लोकांची करोडो रुपयांची फसवणूक केली असल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात सायबर सेल, पुणे येथे तक्रार दाखल करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१)  अंशत: हे खरे आहे.

माहे जून, २०१६ ते दिनांक ०८/०१/२०१७ या कालावधीत आरोपींनी www.makeinindia.rocks व www.rocksfamilyglobal.com या वेबसाईटवरून तसेच हॉटेल्स मध्ये मिटींग्स घेऊन फिर्यादी व इतर २१ व्यक्तिंना अमिष दाखवून रुपये ६९,०६,०००/- ची फसवणूक केली आहे.

(२) सदर घटनेबाबत निगडी पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.  आरोपीवर गु.र.नं. २७८/२०१७ भा.दं.वि.कलम ४०६,४२,१२०(ब), प्राईस ॲन्ड मनी सर्कुलेशन स्किम ॲक्ट १९७८ चे कलम ४, ५ महाराष्ट्र ठेवीदारांचे वित्तीय संस्थेच्या हितसंबंधाचे संरक्षण अधिनियम १९९९ चे कलम ३ व माहिती तंत्रज्ञान कायदा कलम ६६ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(३) एकुण ४ आरोपींना अटक करण्यात आलेली आहे. तसेच त्यांचेकडून रुपये ६,७५,०००/- रोख, ३ मोबाईल संच, ५ वेगवेगळया बँकांचे ATM  कार्ड, ७ सिम कार्ड व १ फोर्ड कंपनीची इन्डुयवर वाहन जप्त करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील दहिसर व कांदिवली पश्चिम येथील खारफुटीच्या जंगलाचे जतन करणेबाबत

**(८१) * ३१५१०  श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील दहिसर येथील गणपत पाटील नगर जवळील खारफुटी जंगलामध्ये प्लास्टिक, दारूच्या बाटल्या, तोडलेल्या झाडांची खोडे इत्यादींचे या जमिनीवर झालेल्या अतिक्रमणामुळे खारफुटी जंगलाचा नाश होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कांदिवलीतील चारकोप येथेही खारफुटी जंगलाची भिंत ही फक्त ९०० मीटर बांधली असल्यामुळे तेथील जमिनीवरही अतिक्रमण झाले असल्याचे निदर्शनास आले आहे, या ठिकाणी अनेक अवैध प्रकार होत असून प्लास्टिक आणि दारूच्या बाटल्यांचा खच वाढला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी महानगरपालिकेला तक्रार नोंदविण्यात आली असून सध्या कचरा उचलण्याचे कंत्राट संपल्याचे कारण आर/ उत्तर विभागाकडून देण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अशा प्रकारे पर्यावरणासाठी पोषक असणाऱ्या खारफुटी जंगलाचे योग्यरित्या जतन करण्यासाठी शासन महानगरपालिकेला निर्देश देणार आहे काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) दहिसर येथील गणपत पाटील नगर येथील खारफुटीच्या जंगल परिसरात अतिक्रमण आढळून आल्यामुळे ८ प्रकरणी संबंधितांविरुध्द फौजदारी कारवाई करण्यात आली आहे.

(२) व (३) चारकोप येथील खारफुटीच्या जंगलाभोवती अतिक्रमण रोखण्याच्या दृष्टीने, खारफुटी क्षेत्राच्या उत्तर दिशेला संरक्षक भिंत बांधण्यात आली आहे.

तसेच, सदर ठिकाणच्या खारफुटी व त्यालगतच्या जागेवर होणारी अतिक्रमणे जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर, विभागीय वने अधिकारी, कांदळवन संवर्धन घटक या विभागाच्या सहकार्याने महानगरपालिकेमार्फत वेळोवेळी निष्कासित करण्यात आली आहेत.

कांदळवन कक्ष कर्मचारी व स्वयंसेवी संस्था यांच्या सहकार्याने महानगरपालिकेमार्फत विशेष स्वच्छता मोहिम राबविण्यात येऊन खारफुटी क्षेत्रातील कचरा उचलून पूर्णपणे सफाई करण्यात आली असून, सदर जागी जमा होणारा कचरा वेळोवेळी साफ करण्यात येतो.

(४) व (५) पर्यावरणासाठी पोषक असणाऱ्या खारफुटी जंगलाचे जतन करण्यासाठी महानगरपालिकेमार्फत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे :-

- गणपत पाटील नगर परिसरातील खारफुटीच्या जागेवर अनधिकृत मातीची भरणी करणाऱ्या ८७ इसमांविरुध्द एम.आर.टी.पी. कायद्यांतर्गत कारवाई करण्याची प्रक्रिया सुरु आहे.
- सदर जागेवर पुन:श्च खारफुटीची तोडणी करुन भविष्यात अनधिकृत बांधकामे होऊ नयेत यासाठी नियमित स्थळपाहणी करण्यात येते.
- वाहनांना व रहिवाशांना अटकाव व्हावा म्हणून चर मारण्यात आला आहे.
- गणपत पाटील नगर येथील खारफुटीपासूनच्या ५० मीटर अंतरामधील पूर्वी निष्कासित झालेल्या व पुन:श्च उभारण्यात आलेल्या झोपडयांवर वेळोवेळी निष्कासनाची कारवाई करण्यात येते.

-----------------

## मुंबईतील मरोळ (अंधेरी) येथील सार्वजनिक वाहनतळ महापालिकेने विकासकाला विकल्याबाबत

**(८२) * ३०९५७ श्री.नरेंद्र पाटील, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.जयवंतराव जाधव, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील मरोळ (अंधेरी) येथे निलकंठ टेक पार्क या कंपनीला प्रकल्पाच्या ४० टक्के एफएसआय देऊन महापालिकेला बांधून दिलेला सार्वजनिक वाहनतळ महापालिकेने फक्त ६९ लाख ४८ हजार रुपयांना कवडीमोलदराने पुन्हा विकासकालाच विकल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या ठिकाणी १०० हून अधिक वाहने उभी करण्यासाठी विकासकाने महापालिकेला बहुमजली वाहनतळ देणे अपेक्षित असताना महापालिकेने सन २०१२ मध्ये विकासकाला दिलेले संमतीपत्र सन २०१५ मध्ये रद्द करुन पुन्हा नवीन संमतीपत्र दिले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणाबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तदनुसार सदर गैरव्यवहार करणाऱ्या महापालिका अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) अशी बाब नाही.

प्रस्तुत प्रकरणी विकासकाने बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावलीच्या विनियम ३३(२४) अंतर्गत बहुमजली वाहनतळाचा प्रस्ताव बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे सादर केलेला होता. त्यानुसार सार्वजनिक वाहनतळ बांधून महानगरपालिकेस हस्तांतर होणार होते. बृहन्मुंबई महानगरपालिकेने दिनांक १६/१/२०१२ रोजी सदर प्रस्तावास इरादापत्र दिलेले होते. त्याप्रमाणे बृहन्मुंबई महानगरपालिकेने इमारतीचे नकाशे मंजूर करुन इमारतीमधील विंग क्र. ए व बी ला दिनांक ५/१०/२०१२ रोजी भोगवटाप्रमाणपत्र दिलेले होते. वरील ठिकाणी बांधण्यात आलेले वाहनतळ महानगरपालिकेस हस्तांतर करण्यात आलेले नाही. तद्नंतर मध्यंतरीच्या कालावधीमध्ये विकासकाने वाहनतळाचा प्रस्ताव रद्द करणेसाठी महानगरपालिकेकडे अर्ज सादर केला. विकासकाने सार्वजनिक वाहनतळापोटी अनुज्ञेय असणारे प्रोत्साहनात्मक चटई क्षेत्रफळ घेतलेले नसल्याने दिनांक २६/८/२०१६ रोजी महानगरपालिकेने पूर्वी दिलेले इरादापत्र रद्द केले. तसेच दिनांक २७/१२/२०१६ रोजी सदर इमारतीचे सुधारित नकाशे सार्वजनिक वाहनतळाशिवाय मंजूर केलेले आहेत.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर शहरात अन्य राज्यातील गुन्हेगारांच्या टोळया सक्रिय असल्याबाबत

**(८३) * ३२७२७ प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरात उत्तरप्रदेशसह अन्य राज्यातील गुन्हेगारांच्या टोळया बॅग लिफ्टींग, चोरी, लुटमार, घरफोड्या व दरोड्यासह अनेक गुन्हयांत सक्रिय असल्याची बाब माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, काही प्रकरणात गुन्हेगारांना अटक केल्यानंतरही आर्थिक देवाणघेवाण झाल्यानंतर स्थानिक पोलिसांकडून गुन्हेगारांविरोधात कोणतीही कारवाई करण्यात येत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अशा प्रकारांमुळे शहरात गुन्हेगारीचा आलेख सतत वाढत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, गुन्हेगारीवर आळा आणण्याकरिता गुन्हेगारांना अटक करुन त्यांच्यावर कारवाई करण्यासाठी तसेच कर्तव्यात कसूर करणाऱ्या पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) नागपूर शहरात उत्तरप्रदेशातील गुन्हेगारांची १ टोळी बॅग लिफ्टींग आणि दरोड्याच्या गुन्हयात सक्रिय असल्याची बाब माहे जून, २०१७ च्या सुमारास निदर्शनास आली आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) सदर प्रकरणी दिनांक ११/६/२०१७ रोजी अयोध्या नगर धुळस ले आऊट, महादुला येथील एम.आय.ई.बी. भिंतीलगत शस्त्र व इतर साहीत्यासह दरोडा घालण्याच्या तयारीत असलेल्या मुरादाबाद आणि रामपूर उत्तरप्रदेशच्या ७ आरोपींना अटक करण्यात आली आहे.सदर आरोपींविरूद्ध पोलीस स्टेशन, कोराडी, नागपूर शहर येथे अप.क्र. १०८/२०१७ कलम ३९९ भादंवि सहकलम ४/२५, भा.ह.का., कलम १३५ महा.पो.का. अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

उपरोक्त प्रकरणी आरोपीबाबत अधिक चौकशी केली असता त्यापैकी ५ आरोपींना मोर्शीला जाणाऱ्या बसमध्ये चढत असताना एका महिलेच्या बॅगेमधील सोन्याचांदीचे दागिने व नगदी रुपये १२००/- असा एकूण ६१,२००/- रूपयाचा माल चोरूल्याप्रकरणी पोलीस स्टेशन गणेश पेठ येथे अप.क्र. २८३/१६ भादंवि कलम ३७९ अन्वये नोंद असलेल्या गुन्हयात अटक करण्यात आली होती.

उपरोक्त दोन्ही गुन्हे तपासावर आहेत तसेच सदर प्रकरणात पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचेकडून कसूर आढळून आला नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## उल्हासनगर (जि.ठाणे) येथील पोलीस वसाहतींची दुरवस्था व पोलिसांसाठी राखीव भूखंडावर अतिक्रमण झाल्याबाबत

**(८४) * ३१११८ श्री.जगन्नाथ शिंदे, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.किरण पावसकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर (जि.ठाणे) शहरातील तीन पोलीस वसाहती आणि गृहसंकुलांसाठी राखीव असलेल्या स्वामी शांती प्रकाश आश्रमाशेजारील भूखंडावर जीन्स कारखाने व भूमाफियांनी अतिक्रमण सुरु केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या भूखंडासह गणेश नगर येथील भूखंडाभोवती संरक्षक भिंत बांधून तिथे नामफलक लावण्याची गरज असून या भूखंडावर राज्य व केंद्र शासनाची मालकी असून ती मालकी पोलीस विभागाकडे हस्तांतरित करण्याची मागणी वारंवार शासनाकडे करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शहरातील पोलीस ठाणी व पोलीस वसाहतींच्या दुरुस्तीसाठी आलेला कोट्यवधी रुपयांचा निधी कागदोपत्री खर्च झाल्याचा आरोप पोलीस वसाहतीतील रहिवाशांकडून करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

सदर जागेबाबत प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

(२) गणेशनगर येथील जागेबाबत प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

(३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुंबई महानगरपालिका क्षेत्रात मोठयाप्रमाणात प्लास्टिक पिशव्यांचा वापर होत असल्याबाबत**

**(८५) * ३१०२१ श्रीमती विद्या चव्हाण, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.धनंजय मुंडे, ॲड.राहुल नार्वेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अमरिशभाई पटेल, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबईत मंडई, दुकाने, फेरीवाल्यांकडून ५० मायक्रॉनपेक्षा कमी जाडीच्या व ८ बाय १२ इंचापेक्षा लहान प्लास्टिक पिशवी वापरावर बंदी असताना वसई, सिलव्हासा, दमन, दीव, भिवंडीतुन रेल्वे मार्गाने हजारो टन प्लास्टिक पिशव्या आणुन मस्जिद बंदर, ग्रांट रोड येथील गोदामात साठवुन ठेऊन या पिशव्या सर्रास वापरल्या जात असून व याबाबत महापालिकेकडून अल्प प्रमाणात कारवाई होत असल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१६ या वर्षात फक्त १,११२ किलो प्लास्टिक पिशव्या जप्त करुन फक्त ८०० व्यक्तींवर कारवाई झाली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बंदी असलेल्या प्लास्टिकच्या पिशव्याच्या वापरामुळे पर्यावरणावर मोठया प्रमाणात परिणाम होत असल्याने ५० मायक्रॉनपेक्षा कमी जाडीच्या प्लास्टिक पिशव्यांचा वापरावर रोख लावण्याबाबत तसेच थर्मोकॉल, प्लॉस्टर ऑफ पॅरिस या अविघटनशील व पर्यावरणाच्या ऱ्हासास कारणीभूत ठरणाऱ्या वस्तूच्या निर्मितीवर बंदी आणण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) ५० मायक्रॉनपेक्षा कमी जाडीच्या व ८ x १२ इंचापेक्षा कमी आकाराच्या प्लास्टिक पिशव्यांची विक्री करणाऱ्या दुकानांवर माहे जानेवारी, २०१७ ते जून, २०१७ या कालावधीत २८६ व्यक्तींवर महानगरपालिकेमार्फत कारवाई करण्यात आली आहे.

सदर कारवाईदरम्यान त्यांचेकडून २०४.५७० कि.ग्रॅ. प्लास्टिक पिशव्या जप्त करण्यात आल्या असून रुपये १४,२५,०००/- इतका दंड वसूल करण्यात आला आहे.

(२) सन २०१६ या वर्षामध्ये प्लास्टीक पिशव्या जवळ बाळगणाऱ्या ७८५ व्यक्तींवर महानगरपालिकेमार्फत कारवाई करण्यात आली आहे.

सदर कारवाई दरम्यान त्यांचेकडून ११८१.९७७ कि.ग्रॅ. प्लास्टिक पिशव्या जप्त करण्यात आल्या असून रुपये ३९,२५,०००/- इतका दंड वसूल करण्यात आला आहे.

(३) व (४) ५० मायक्रॉनपेक्षा कमी जाडीच्या प्लास्टिक पिशव्यांच्या वापरावर बंदी असून या पिशव्यांचा वापरावर रोख लावण्यासाठी, केंद्रीय प्रदुषण नियंत्रण बोर्डाच्या पर्यावरण (संरक्षण) अधिनियम १९८६, प्लास्टिक कचरा व्यवस्थापन नियम २०१६ तसेच महाराष्ट्र अविघटनशील कचरा (नियंत्रण) अधिनियम, २००६ मधील तरतुदींनुसार महानगरपालिकेमार्फत वेळोवेळी कारवाई करण्यात येते.

-----------------

**महाराष्ट्र-कर्नाटक सीमा प्रश्न सोडविण्याबाबत**

**(८६) * ३०९९२ श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र-कर्नाटक सीमा प्रश्न राज्यस्तरावर प्रलंबित असताना कर्नाटक सरकारकडून विधानसभेत 'जय महाराष्ट्र' म्हणणाऱ्या मराठी भाषिक लोकप्रतिनिधींचे सदस्यत्व रद्द करण्यात येणार असल्याची महाराष्ट्र द्वेषी घोषणा दिनांक २३ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र द्वेषी घोषणा करुन मराठी भाषिक लोकप्रतिनिधींसह स्थानिक जनतेला वेठीस धरण्याचा सातत्याने होत असलेल्या प्रयत्नामुळे राज्यातील जनतेमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने गंभीर दखल घेऊन महाराष्ट्र-कर्नाटक सीमा प्रश्न सोडविण्याबाबत केंद्र शासनाकडे पाठपुरावा करुन सीमा रेषेवरील मराठी भाषिकांना न्याय देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) याबाबत महाराष्ट्र शासनाने गंभीर दखल घेतलेली असून श्री.चंद्रकांत दादा पाटील, समन्वयक मंत्री, महाराष्ट्र-कर्नाटक सीमा प्रश्न यांनी दिनांक २३/०५/२०१७ च्या पत्रान्वये महाराष्ट्र शासनाची नाराजी कर्नाटक शासनास कळविलेली आहे. तसेच सीमा प्रश्नाच्या अनुषंगाने राज्य शासनाने मा.सर्वोच्च न्यायालयात दावा क्र. ४/२००४ दाखल केलेला आहे. या दाव्याची पुढील सुनावणी दिनांक २४ जुलै, २०१७ रोजी मा.सर्वोच्च न्यायालयात ठेवण्यात आली आहे. या न्यायालयीन प्रकरणी राज्य शासनाने नामांकित वकिलांची नेमणूक केली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्याचे माजी मुख्यमंत्री स्वर्गीय वसंतराव नाईक यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मृती सभागृह उभारण्याबाबत

**(८७) * ३२९२६ श्री.प्रकाश गजभिये :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याचे माजी मुख्यमंत्री स्वर्गीय वसंतराव नाईक यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त नागपूर येथील राजभवनाच्या जागेवर आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्वर्गीय वसंतराव नाईक स्मृती सभागृह उभारण्याचे काम शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) व (३) माजी मुख्यमंत्री स्व. वसंतराव नाईक जन्मशताब्दी वर्ष योजनेंतर्गत रुपये २० कोटी जिल्हा प्रशासनास उपलब्ध करुन देण्यात आले आहेत.

जिल्हा प्रशासनाने उपरोक्त निधीत २००० आसन क्षमतेचे सभागृह बांधणे शक्य नसल्याचे कळविल्याने सदर निधी नागपूर सुधार प्रन्यासकडे हस्तांतरीत करण्यात आला. तसेच नागपूर सुधार प्रन्यासला कार्यकारी अभिकरण म्हणून मान्यता देण्यात आली व सभागृह बांधण्याकरीता अतिरिक्त निधी नागपूर सुधार प्रन्यासने उपलब्ध करावा असे सूचित करण्यात आले आहे.

सदर सभागृहाकरीता अद्याप जागा उपलब्ध झालेली नसल्यामुळे नागपूर सुधार प्रन्यासव्दारे बांधकाम सुरु करण्यात आलेले नाही.

-----------------

## उल्हासनगर (जि.ठाणे) येथील मुकेश वाईन शॉपवर अज्ञात हल्लेखोरांनी गोळीबार केल्याबाबत

**(८८) * ३१४६८ श्री.हेमंत टकले, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, ॲड.जयदेव गायकवाड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर (जि.ठाणे) येथील कॅम्प ५ भागातील मुकेश वाईन शॉपवर अज्ञात हल्लेखोरांनी हल्ला केल्याची घटना दिनांक २५ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर घटनेची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तदनुसार सदर हल्लेखोराचा तपास करुन त्यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

ठाणे पोलीस आयुक्तालयाच्या परिमंडळ ४ मधील हिललाईन पोलीस ठाण्याच्या हद्दीत सदरची घटना दिनांक २५ मे, २०१७ रोजी घडलेली नसून ती दिनांक २७ एप्रिल, २०१७ रोजी घडलेली आहे.

(२) सदर प्रकरणी हिललाईन पोलीस स्टेशन येथे गु.र.क्र. १०६/२०१७ भा.दं.वि कलम ३०७, १२० (ब), ३८७, ३४ सह भा.ह.का. कलम ३, २५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर प्रकरणी चार आरोपींना अटक करण्यात आली आहे. सदर गुन्ह्याचा पुढील तपास सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील मोठ्या उद्योजकांनी महापालिकेचा मालमत्ता कर थकविल्याबाबत

**(८९) * ३२६३३ श्री.सुभाष झांबड, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील लोखंडवाला रुपये ७.०७ कोटी एच.डी.आय.एल. बांधकाम व्यावसायिक रुपये २.३७ कोटी आणि फिनिक्स मिल मॉल रुपये १.५५ कोटी, सहारा स्टार हॉटेल रुपये २.१२ कोटी, कोहिनूर प्लॅनेट रुपये २.६१ कोटी यांनी महापालिकेचा मालमत्ता कर थकविल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या थकबाकीदारांनी महापालिकेचा रुपये ९७ कोटींचा महसूल थकविला असल्याने महापालिका प्रशासनाने या मोठ्या उद्योजकांकडून कोटयवधी रुपयांचा थकीत असलेला मालमत्ता कर वसूलीसाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) सदर मालमत्ताधारकांच्या थकबाकीचा तपशील खालीलप्रमाणे आहे :-

| मालमत्तधारक | थकीत मालमत्ता कर |
|---|---|
| लोखंडवाला | रुपये ३,७८,०९,५१७ |
| एच.डी.आय.एल. | रुपये १५५,९६,३८,९१६ |
| फिनिक्स मिल मॉल | थकबाकी नाही. |
| सहारा हॉस्पिटॅलिटी | रुपये ४,८७,४७,२६९ |
| कोहिनूर प्लॅनेट | रुपये २८,०४,४१,४११ |

(२) मे. लोखंडवाला कटारिया कन्स्ट्रक्शन प्रा. लि. यांच्याकडे दिनांक ३१/०३/२०१७ रोजी रुपये ६,७८,०९,५१७/- एवढी मालमत्ता कराची थकबाकी होती, त्यापैकी त्यांनी रुपये ३ कोटी इतक्या रकमेचा भरणा केला असून आजमितीस त्यांच्याकडे रुपये ३,७८,०९,५१७/- इतकी थकबाकी शिल्लक आहे.

मे.एच.डी.आय.एल. यांच्या करनिर्धारीत करण्यात आलेल्या मालमत्ता कराची एकूण थकबाकी रुपये १५५,९६,३८,९१६/- इतकी असून, सदर थकबाकीच्या वसुलीकरिता महानगरपालिकेमार्फत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे:-

**अ.** एच/पूर्व विभागातील १७, एच/पश्चिम व पी/उत्तरमधील प्रत्येकी १ व टी विभागातील १३ मालमत्तांवर जप्ती व अटकावणीची नोटीस बजावण्यात आली आहे.

**ब.** एल विभागातील ०१ मालमत्ता मोहोरबंद करण्यात आली आहे.

**क.** एल व एस विभागातील प्रत्येकी ६ व एन विभागातील ०२ मालमत्तांची जलजोडणी खंडीत करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच, एस विभागातील १४ मालमत्तांची जलजोडणी खंडीत करण्यात आलेली आहे.

**ड.** पी/उत्तर विभागातील १२ व एल विभागातील २५ मालमत्तांना नोटीसा बजावण्यात आल्या आहेत तसेच एल विभागातील ४४ मालमत्ताधारकांस मागणीपत्रे पाठविण्यात आली आहेत.

मे.सहारा हॉस्पिटॅलिटी या मालमत्तेची एकूण थकबाकी रुपये १३,०९,१५,३६६/- इतकी असून मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार ५०% मालमत्ता कराचा भरणा करण्यात आला आहे.

मे.कोहिनूर प्लॅनेट यांच्या एल विभागामध्ये मालमत्ता कराच्या वसुलीकरिता पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे:-

- २३ मालमत्तांना जाहीर सूचना देण्यात आल्या आहेत.
- एका मालमत्तेची जलजोडणी खंडीत करण्याची कार्यवाही प्रस्तावित आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## डोंबिवली (जि.ठाणे) येथील औद्योगिक वसाहतीमधील प्रोबेस कंपनीतील स्फोट होवून नुकसान झालेल्या रहिवाश्यांना नुकसान भरपाई मिळणेबाबत

**(९०) * ३२३२४ श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, अ‍ॅड.राहुल नार्वेकर, श्री.नरेंद्र पाटील, अ‍ॅड.निरंजन डावखरे, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे : तारांकित प्रश्न क्रमांक २८२३० ला दिनांक १५ मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डोंबिवली (जि.ठाणे) येथील औद्योगिक वसाहतीमधील प्रोबेस कंपनीमध्ये दिनांक २६ मे, २०१६ रोजी वा त्यासुमारास स्फोट होवून नुकसान झालेल्या रहिवाश्यांना एक वर्षाचा कालावधी उलटून नुकसान भरपाई मिळाली नसल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तदनुसार सदर नुकसानग्रस्तांना लवकरात लवकर नुकसान भरपाई मिळावी म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) सदर घटनेतील १२ मृत व्यक्तींच्या वारसांपैकी ९ व्यक्तींच्या वारसांना मा.मुख्यमंत्री सहायता निधीमधून रक्कम रु.१८.०० लक्ष वितरीत करण्यात आले आहेत. तर उर्वरित मृत ३ व्यक्ती ह्या सदर स्फोटास जबाबदार असलेल्या कंपनीचे मालक असल्याने त्यांच्या वारसांना आर्थिक मदत देण्याची बाब प्रलंबित आहे.  सदर घटनेतील जखमींना रु.२६,५१,९१०/- इतकी आर्थिक मदत देण्यात आली आहे.

सदर बाब ही नैसर्गिक आपत्तीमध्ये मोडत नसल्याने शासन धोरणानुसार सदर घटनेतील आपद्ग्रस्तांना आर्थिक मदत देय नाही. तथापि, सदर घटनेतील रहिवाश्यांना त्यांच्या झालेल्या नुकसानाबाबत विशेष बाब म्हणून आर्थिक मदत देण्याबाबतचा प्रस्ताव जिल्हाधिकारी, ठाणे यांनी मा.मुख्यमंत्री सहायता निधी कक्षाकडे सादर केला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## राज्य शासनाच्या सेवेतील आरक्षित पदांवर बिगर मागासवर्गीय उमेदवारांमधून नियुक्त्या करण्याच्या घेण्यात आलेल्या निर्णयाबाबत

**(९१) * ३१३७९ श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.नागोराव गाणार, प्रा.अनिल सोले :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या सेवेतील अनुसूचित जाती-जमाती व अन्य घटकांसाठी आरक्षित ठेवलेल्या जागा बिगर मागासवर्गातील उमेदवारांमधून भरण्यात येऊ नयेत अशी सन २००१ मध्ये केलेल्या आरक्षण कायद्याच्या कलम ४ (२) मध्ये तरतूद करण्यात आलेली असताना त्याचे उल्लंघन करुन आरक्षित पदांसाठी मागासवर्गीयामधून उमेदवार उपलब्ध न झाल्यास अशा जागा रिक्त न ठेवता त्या खुल्या प्रवर्गातील उमेदवारांमधून नियुक्त्या करुन भरण्याचा निर्णय सामान्य प्रशासन विभागाने दिनांक २९ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनुसूचित जाती-जमाती व अन्य घटकांसाठी शासकीय/ निमशासकीय सेवांमध्ये घटनात्मक व कायदेशीर तरतुदींनुसार असलेले आरक्षण अबाधित न ठेवता त्यात शासन निर्णयाद्वारे बेकायदेशीरपणे बदल करण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, छोट्या संवर्गाकरिता दोन, तीन किंवा चार पदे मंजूर असतात त्यावेळी सर्व मागासवर्गीयांसाठी केवळ एकच पद उपलब्ध होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय

(४) असल्यास, शासकीय/निमशासकीय सेवांमध्ये असलेल्या घटनात्मक व कायदेशीर आरक्षणात सामान्य प्रशासन विभागाच्या उक्त शासन निर्णयान्वये बदल केल्यामुळे अनुसूचित जाती-जमाती व अन्य घटक यांना त्यांच्या हक्कांपासून वंचित रहावे लागणार असल्यामुळे उक्त शासन निर्णय रद्द करुन आरक्षणाची तरतूद अबाधित ठेवण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) छोटया संवर्गातील मागासवर्गीयांकरिता आरक्षित पदे भरण्याबाबत मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठाने दिनांक ९ मे, २०१३ रोजी दिलेल्या निर्णयास अनुसरुन आरक्षण अधिनियम २००१ शी सुसंगत अशी कार्यपध्दती सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक दिनांक २९ मे, २०१७ अन्वये विहित करण्यात आली आहे. त्यामध्ये ज्यावेळी बिंदुनामावलीच्या क्रमवारीनुसार विशिष्ट मागास प्रवर्गाचा उमेदवार उपलब्ध होत नसेल, अशा वेळी प्रशासकीय दृष्टया कामकाज सुरळीत चालण्यासाठी सदर पद त्या विशिष्ट प्रवर्गासाठी तात्पुरत्या स्वरुपात अनारक्षित करुन ते सेवाजेष्ठ उमेदवारांमधून (मागासवर्गीय /खुला) तात्पुरत्या स्वरुपात भरण्याची तरतुद आहे.

(२) हे खरे नाही. छोटया संवर्गात सर्व मागासवर्गीयांना समान संधी उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने तसेच घटनात्मक व कायदेशीर तरतुदींचे पालन करुन मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठाने दिनांक ९ मे, २०१३ रोजी दिलेल्या निर्णयास अनुसरुन आरक्षण अधिनियम २००१ शी सुसंगत अशी कार्यपध्दती दिनांक २९/५/२०१७ च्या परिपत्रकान्वये विहित करण्यात आलेली आहे.

(३) व (४) होय, ज्यावेळी सर्व मागास प्रवर्गासाठी केवळ एकच पद उपलब्ध होते अशा वेळी सर्व मागास प्रवर्गांना प्रतिनिधीत्व देण्याच्या दृष्टीने, आरक्षण अधिनियम २००१ मधील कलम ६(१) मधील तरतुदीनुसार बिंदुनामावलीच्या क्रमवारीनुसार पद अदलाबदलीने भरण्याबाबतची तरतुद मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठाने दिलेल्या निर्णयानुसार सदर शासन परिपत्रकामध्ये आहे. या तरतुदीनुसार सर्व मागास प्रवर्गांना समान संधी मिळणार असल्यामुळे अनुसूचित जाती-जमाती व अन्य घटक यांना त्यांच्या हक्कांपासून वंचित रहावे लागणार नाही. त्यामुळे सदर शासन परिपत्रक रद्द करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नक्षलग्रस्त भागासाठी तसेच मुंबई पोलिसांसाठी अत्याधुनिक पध्दतीचे बुलेटप्रुफ जॅकेट पुरविण्याबाबत**

**(९२) * ३११६३ श्री.जयवंतराव जाधव, श्री.अमरसिंह पंडित, श्री.धनंजय मुंडे, श्री.नरेंद्र पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक २७९६९ ला दिनांक ८ मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा पोलीस अधिक्षक, गडचिरोली यांनी नक्षलग्रस्त कारवायांचा मुकाबला करण्यासाठी हलक्या वजनाचे नवीन पध्दतीचे बुलेटप्रुफ जॅकेट मिळण्यासाठी पाठविलेला प्रस्ताव माहे मे, २०१७ पर्यंत शासनाकडे प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गडचिरोली जिल्ह्यातच बुलेटप्रुफ चिलखतीविना नक्षलविरोधी मोहीम राबविली जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबई पोलिसांसाठी अत्याधुनिक बुलेटप्रुफ जॅकेट पुरविण्याची प्रक्रिया गेल्या अनेक दिवसांपासून प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून नक्षलग्रस्त भागासाठी तसेच मुंबई पोलिसांसाठी अत्याधुनिक पध्दतीचे बुलेटप्रुफ जॅकेट पुरविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) पोलीस उप महानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र, नागपूर यांचेकडून बुलेटप्रुफ जॅकेट उपलब्ध करुन देण्याबाबतचा प्रस्ताव दिनांक १३/४/२०१६ रोजी पोलीस महासंचालक कार्यालयास पाठविण्यात आला होता. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने व इतर पोलीस घटकांकडील मागणी विचारात घेऊन ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आलेली असून एकूण ५००० नग बुलेटप्रुफ जॅकेट खरेदीबाबतचे आदेश पुरवठादारास देण्यात आलेले आहेत.

(२) हे खरे नाही. गडचिरोली पोलीस दलाकडे सध्या एकूण ५१५ नगर बुलेटप्रुफ जॅकेट व ६२ नग बुलेटप्रुफ पटका उपलब्ध आहेत.

(३) व (४) मुंबई पोलीसांसाठी सन २०१०-११ मध्ये ५४४ नग बुलेटप्रुफ जॅकेट यापूर्वीच पुरविण्यात आलेले आहेत. राज्यातील नक्षलग्रस्त भागासह सर्व पोलीस दलासाठी एकत्रित ५००० नग बुलेटप्रुफ जॅकेट खरेदी करण्याचा पोलीस महासंचालक स्तरावरील खरेदी समितीने निर्णय घेतला असून, माहे एप्रिल, २०१७ मध्ये पुरवठादारास तात्काळ पुरवठा करण्याचे आदेश देण्यात आलेले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नांदगाव (जि.नाशिक) शहरात नियमित पाणीपुरवठा करण्याबाबत**

**(९३) * ३१३२४ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदगाव (जि.नाशिक) शहरात सद्यस्थितीत १२ ते १३ दिवसाने पाणीपुरवठा होत असल्याने येथील महिलांनी नगरपालिकेवर हंडा मोर्चा काढून प्रशासनाविरोधात असंतोष व्यक्त केला असल्याचे दिनांक २५ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रस्तूत प्रकरणी शासनाने चौकशी करून नांदगाव शहरात नियमित पाणीपुरवठा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) नांदगाव शहराच्या पाणीपुरवठयातील अनियमिततेबाबत दिनांक २४ एप्रिल, २०१७ रोजी नागरिकांनी मोर्चा काढला होता, हे खरे आहे.
(२) नांदगाव शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या जलवाहिनीवरील ढासेमळा भागातील व्हॉल्व दिनांक २३ एप्रिल, २०१७ रोजी नादुरुस्त झाल्याने पाणीपुरवठा खंडीत झाला होता.
सदरील व्हॉल्वची दिनांक २४ एप्रिल, २०१७ रोजी दुरुस्ती करुन पाणीपुरवठा सुरळीत करण्यात आला.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**केंद्र शासनाच्या अमृत योजनेतील विविध योजनांसाठीच्या निधीचा ५० टक्के वाटा राज्याने उचलला नसल्याबाबत**

**(९४) * ३११३३ श्री.नारायण राणे : दिनांक २४ जुलै, २०१७ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक २ मधील प्रश्न क्रमांक २८२६६ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाच्या अमृत योजनेमध्ये राज्यातील ४४ शहरांचा समावेश केला असला तरी संबंधित शहरातील विविध योजनांसाठी राज्याने गेल्या दोन वर्षात निधीचा ५० टक्के वाटा उचलला नसल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्र शासनाने ४०० कोटी रुपयांचे अनुदान वितरीत केले असताना राज्याने त्यांच्या हिस्सेचे ४७७ कोटी रुपयापैकी जेमतेम २९ कोटी रुपये वितरीत केले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने निर्णय घेऊन संबंधित शहरांचा प्रलंबित हिस्सा तेथील स्थानिक स्वराज्य संस्थांना वर्ग करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) केंद्र शासनाने अमृत अभियानांतर्गत सन २०१५-१६ या वर्षाच्या मंजूर आराखडयाच्या प्रथम हप्त्यापोटी वितरीत केलेल्या १८२.९८ कोटी निधीच्या प्रमाणात राज्य शासन हिश्याचा रुपये ९१.४९ कोटी निधी अभियान शहरांना वितरीत केला आहे.

अमृत अभियानाच्या सन २०१६-१७ व सन २०१७-१८ या वर्षाच्या आराखडयापोटी केंद्र शासनाने अनुक्रमे रुपये २३५.२० कोटी व रुपये २८८.६३ कोटी निधी राज्य शासनास वितरीत केला आहे.

केंद्र शासनाच्या सूचनेनुसार केंद्र शासन हिश्याचा निधी व त्याप्रमाणात राज्य शासन हिश्याचा अनुक्रमे रुपये ११७.६१ कोटी व रुपये १४४.३४ कोटी इतका निधी राज्य अभियान संचालनालयाकडे वितरीत केला आहे. अमृत अभियानांतर्गत मंजूर प्रकल्पांचे कार्यादेश दिल्यानंतर प्रथम हप्त्याचा निधी संबंधित अभियान शहरांना वितरीत करण्यात येणार आहे.

-----------------

## ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते श्री.राजाराम भास्कर गुरुजी यांच्यावर प्राणघातक हल्ला झाल्याबाबत

**(९५) * ३१०८५ श्री.धनंजय मुंडे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.अमरसिंह पंडित :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते व महाराष्ट्र राज्याचे मांझी म्हणून ओळख असणारे श्री.राजाराम भास्कर गुरुजी यांच्यावर प्राणघातक हल्ला झाल्याची घटना गुंडेगाव (जि.अहमदनगर) येथे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान घडली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ग्रामसभेत दारुबंदीचा विषय का मांडला म्हणून त्यांच्यावर प्राणघातक हल्ला झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणातील आरोपींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते श्री.राजाराम आनंदा भापकर गुरुजी यांच्यावर प्राणघातक हल्ला झाल्याची घटना दिनांक ०७/०५/२०१७ रोजी गुंडेगाव (जि.अहमदनगर) येथे घडली.

(२) होय, हे खरे आहे.

(३) सदर प्रकरणी नगर तालुका पोलीस स्टेशन, जि. अहमदनगर येथे गु.र.नं. १३३/२०१७ भा.दं.वि. कलम ३०८, ३३६, ३३७, ३२३, ५०४, ५०६, ३४, १०९ प्रमाणे दिनांक १३/०५/२०१७ रोजी ३ आरोपींविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्ह्यात १ आरोपीस अटक करण्यात आली असून इतर २ आरोपींना मा.न्यायालयाने अटकपुर्व जामीन मंजुर केला आहे. सदर प्रकरण तपासाधीन आहे.

(४) विलंब झालेला नाही.

-----------------

## मुंबई व उपनगरात स्वस्तात म्हाडाचे घर देण्याचे आमिष दाखवून टोळीने अनेकांची फसवणूक केल्याबाबत

**(९६) * ३२६७७ ॲड.राहुल नार्वेकर, श्री.जयवंतराव जाधव, श्री.अमरसिंह पंडित, श्री.नरेंद्र पाटील, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.आनंद ठाकूर, ॲड.जयदेव गायकवाड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई व उपनगरात म्हाडाच्या इमारतीचे बांधकाम सुरु असलेल्या जागेवर (साईटवर) गरजू लोकांना नेऊन त्याठिकाणी स्वस्तात म्हाडाचे घर देण्याचे आमिष दाखविणाऱ्या टोळीने २५ लोकांसह अनेकांना दोन वर्षात करोडो रुपयांना फसविले असल्याप्रकरणी फसवणुक झालेल्या तक्रारदाराने मुंबई येथील साकीनाका पोलीस स्टेशनमध्ये माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान तक्रार केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले आहे, तद्नुसार फसवणूक केल्याप्रकरणी किती जणांवर व कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.
(२) सदर प्रकरणी साकीनाका पोलीस ठाणे येथे गु.र.क्र.२१३/१७, भा.दं.वि. कलम ४१९, ४२०, ४६५, ४६७, ४६८, ४७१, १७०, १२० (ब), ५०४, ५०६ (२), ३४ अन्वये गुन्हा दाखल आहे. नमूद गुन्ह्यामध्ये ४ आरोपींविरुध्द मा. न्यायालयात दोषारोपपत्र सादर करण्यात आले असून सदरचा गुन्हा न्यायप्रविष्ठ आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**वडगावशेरी (जि.पुणे) येथील विमाननगरमधील म्हाडाच्या मालकीच्या जागेवर अनधिकृत अतिक्रमण झाल्याबाबत**

**(९७) * ३२३४९ श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वडगावशेरी (जि.पुणे) येथील विमाननगर मधील म्हाडा सोसायटीतील म्हाडाच्या मालकीच्या मोक्याच्या जागेवर अनधिकृतरित्या अतिक्रमण केले असल्याचे व या अतिक्रमणाकडे म्हाडा प्रशासन दुर्लक्ष करीत असल्याची बाब माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्‌नुसार म्हाडाच्या जागेवर करण्यात आलेले अतिक्रमण हटविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता :** (१) विमाननगर, पुणे येथील म्हाडा वसाहतीमधील म्हाडाच्या मंजूर अभिन्यासातील नियमानुसार सोडण्यात येणाऱ्या खुल्या जागेवर अनधिकृतरित्या कुंपण घालण्याचा प्रकार माहे मे, २०१७ मध्ये निदर्शनास आलेला आहे.
(२) व (३) सदर प्रकरणी दिनांक ०१/०६/२०१७ रोजी स्थानिक रहिवाश्यांसोबत म्हाडाच्या संबंधित अधिकाऱ्यांमार्फत प्रत्यक्ष जागेवर जाऊन सदर वसाहतीची पाहणी करण्यात आली. मंजूर अभिन्यासामध्ये नियमानुसार सोडावयाच्या एकूण ६ खुल्या जागा आहेत. सदर खुल्या जागेवर अतिक्रमण होत असल्याने व रहिवाशी यांचे मागणीनुसार मोकळ्या जागा महानगरपालिकेस हस्तांतरीत करण्याचे सांगण्यात आले. त्या अनुषंगाने भूअभिन्यासातील सर्व खुल्या जागा नाममात्र दराने पुणे महानगरपालिकेस पुढील देखभाल व विकसनासाठी हस्तांतरीत करण्यासंबंधीचा सविस्तर प्रस्ताव मुख्य अधिकारी, पुणे गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ यांनी त्यांचे पत्र क्र.३०९८, दिनांक ०९/०६/२०१७ अन्वये आयुक्त, पुणे महानगरपालिका यांच्याकडे दाखल केला आहे. सदर खुली जागा हस्तांतरीत करण्याची प्रक्रिया म्हाडा व पुणे महानगरपालिका यांच्याकडे सुरु आहे.

-----------------

**डॉ.नरेंद्र दाभोळकर व कॉ.गोविंद पानसरे यांच्या हत्येच्या तपासाबाबत**

**(९८) * ३३४२० श्री.विक्रम काळे, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.आनंद ठाकूर, श्रीमती विद्या चव्हाण, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.जयवंतराव जाधव, श्री.अमरसिंह पंडित, श्री.धनंजय मुंडे, श्री.प्रकाश गजभिये : तारांकित प्रश्न क्रमांक २६९२५ ला दिनांक १५ मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डॉ.नरेंद्र दाभोळकर व कॉ.गोविंद पानसरे हत्त्या प्रकरणी शासनामार्फत सुरु असलेला तपास पूर्ण झाला आहे काय,

(२) असल्यास, तपासात काय आढळून आले व त्यानुसार सदर हत्त्या करणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) डॉ.नरेंद्र दाभोळकर यांच्या हत्येच्या संदर्भात डेक्कन पोलीस स्टेशन येथे गु.र.क्र.१५४/२०१३, भा.दं.वि. कलम ३०२, ३४ शस्त्र अधिनियम ३ (२५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याचा तपास दिनांक ३/६/२०१४ रोजी केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभागाकडे (सीबीआय) वर्ग करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याचा तपास पोलीस उप अधिक्षक, सीबीआय, स्पेशल क्राईम ब्रँच, नवी मुंबई हे करीत आहेत.

कॉ.गोविंद पानसरे यांच्या हत्येच्या संदर्भात कोल्हापूर जिल्ह्यातील राजारामपूरी पोलीस ठाणे येथे गु.र.क्र.३९/२०१५ भा.दं.वि. कलम ३०२, ३०७, १२० (ब), ३४ सह आर्म ॲक्ट ३(१)/२५ (१ब) (अ), ५ (२७) अन्वये गुन्हा दाखल झाला आहे. सदर गुन्ह्यामध्ये ४ आरोपींचा सहभाग असल्याचे निष्पन्न झाले आहे. सदर गुन्ह्यातील दोन आरोपींना अटक करुन त्यांच्याविरुद्ध मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले असून गुन्ह्याचा पुढील तपास सी.आर.पी.सी. १७३(८) प्रमाणे चालू आहे. तसेच उर्वरित दोन आरोपींचा शोध घेण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मुंबई महानगरपालिकेच्या शाळेतील विद्यार्थ्यांच्या शालेय पोषण आहाराबाबत**

**(९९) * ३२३१९ श्रीमती हुस्नबानू खलिफे, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेच्या सन २०१७-१८ च्या अर्थसंकल्पात शालेय विद्यार्थ्यांसाठी पोषण आहाराकरिता तरतुद करण्यात आली नसल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महानगरपालिकेच्या शाळांमध्ये जवळपास ३४% कुपोषित मुले असल्याची माहिती माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महानगरपालिकेकडून मिड-डे-मिल या योजनेकरिता देण्यात येणाऱ्या निधीत कपात करण्यात आली असून उपलब्ध निधीपैकी फक्त २५% निधी वापरण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपलब्ध निधी खर्च न करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांविरुध्द शासनाने कोणती कार्यवाही केली तसेच शालेय पोषण आहारासाठी निधीची तरतूद करण्यासाठी व कुपोषित बालकांची संख्या कमी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) शालेय पोषण आहार या केंद्र शासन पुरस्कृत योजनेकरीता केंद्र शासन व राज्य शासनाकडून १०० टक्के (६०:४०) अनुदान प्राप्त होत असल्यामुळे महापालिकेच्या अर्थसंकल्पामध्ये शालेय पोषण आहाराकरीता तरतूद करण्यात आलेली नाही.

(२) सन २०१४-१५ पासून लागू करण्यात आलेल्या उंचीप्रमाणे वजन या निकषानुसार ३४% विद्यार्थी कुपोषित (कमी वजनाचे) आढळून आले हे खरे आहे.

(३) शालेय पोषण आहार योजनेंतर्गत शासनाकडून महानगरपालिकेस प्राप्त होणाऱ्या निधीचा तपशिल खालीलप्रमाणे आहे :-

- सन २०१५-१६ मध्ये ५,७०,३०८ विद्यार्थ्यांकरीता रुपये ७१.१४ कोटी इतका निधी शासनामार्फत महानगरपालिकेस प्राप्त झाला होता.
- प्राप्त निधीपैकी रुपये ५५,९५ कोटी इतका निधी खर्च झाला असून रुपये १५.१९ कोटी इतका निधी शिल्लक राहिला आहे.

- सन २०१५-१६ या वर्षात ७८.६४% इतका निधी खर्च झालेला आहे.
- सन २०१६-१७ मध्ये ५,३८,४७६ विद्यार्थ्यांकरीता रुपये ४८.७५ कोटी इतका निधी शासनाकडून महानगरपालिकेस प्राप्त झाला होता.
- सदर निधी तसेच, सन २०१५-१६ मध्ये शिल्लक असलेल्या निधीपैकी रुपये ६.११ कोटी असे मिळून सन २०१६-१७ मध्ये रुपये ५४.८६ कोटी इतका निधी खर्च झाला आहे.
- सन २०१६-१७ मध्ये प्राप्त झालेला निधी १००% खर्च झाला आहे.

(४) शाळेतील विद्यार्थ्यांच्या आरोग्यामध्ये सुधारणा करण्यासाठी महानगरपालिके मार्फत खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतात :-

- विद्यार्थ्यांना व पालकांना संतुलित व सकस आहाराबाबत समुपदेशन देण्यात येते.
- उपचाराची आवश्यकता असलेल्या विद्यार्थ्यांना वैद्यकीय महाविद्यालय/ रुग्णालयांमध्ये संदर्भित करण्यात येते.
- वर्षातून दोन वेळा जंतनाशक गोळ्यांचे वाटप करण्यात येते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**ठाणे-कळवा उड्डाण पुलाच्या बांधकामाबाबत**

**(१००) * ३३६४४ श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे-कळव्याला जोडणाऱ्या तिसऱ्या महत्वाकांक्षी पुलाच्या कामाला सुरूवात झाली असून या उड्डाण पुलासाठी उभारण्यात आलेले खांब निकृष्ट दर्जाचे असल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार निकृष्ट दर्जाचे बांधकाम करणाऱ्या ठेकेदारावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) ठाणे महानगरपालिकेमार्फत ठाणे-कळवा हा २.४ कि.मी. लांबीचा पूल बांधण्यात येत आहे. सदर पूलाचे ३५% काम पुर्ण झाले आहे. प्रगतीपथावरील कामाच्या विविध चाचण्या घेण्यात येतात.

माहे डिसेंबर, २०१६ मध्ये ८ खांबांच्या चाचण्यानुसार एका खांबाचे चाचणी निष्कर्ष हे प्रमाणित निकषांपेक्षा कमी आल्याने नव्याने तो खांब उभारण्याचे निर्देश कंत्राटदारास देण्यात आले.
(२) कंत्राटदाराला दिलेल्या निर्देशानुसार तो खांब तोडुन कंत्राटदाराने नव्याने तो खांब स्वखर्चातुन बांधुन दिला आहे. सदर खांब निकषानुसार आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जिंतूर (जि.हिंगोली) शहरातील पोलीस कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानांची दुरवस्था झाल्याबाबत

**(१०१) * ३३३१८ श्री.रामराव वडकुते :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जिंतूर (जि.हिंगोली) शहरातील पोलीस कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानांची देखभाल अभावी दुरवस्था झाल्याने पोलीस कर्मचाऱ्यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या पोलीस कर्मचाऱ्यांच्या निवासस्थांनाच्या पाठीमागील बाजूने गटारे-नाले वाहत असून परिसरातही घाण पसरली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अनेक निवासस्थानांची दुरवस्था झाल्याने अनेक कर्मचारी भाडयाच्या खोलीत राहत आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, ही बाब उपविभागीय पोलीस अधिकारी, जिंतूर तसेच उपअभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, जिंतूर यांच्या निदर्शनास आणूनही कोणतीच कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, अद्याप कार्यवाही न करण्याची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) होय.
(३), (४) व (५) पोलीस स्टेशन जिंतूर येथे २६ निवासस्थाने असून पोलीस अधिकारी/ कर्मचारी यांचे मंजूर संख्याबळाच्या अनुषंगाने अपुरी असून नवीन निवासस्थाने बांधण्याकरीता खर्चाचे अंदाजपत्रके व नकाशे सादर करण्याकरीता क्षेत्रिय कार्यालयाकडून सार्वजनिक बांधकाम विभाग, परभणी यांना पत्र व्यवहार करण्यात येत आहे.

-----------------

**वारणानगर (कोल्हापूर) येथील धाडीतील रक्कम पोलिसांनी लुटल्याबाबत**

**(१०२) * ३२५२० श्री.अमरिशभाई पटेल, श्री.संजय दत्त, श्री.हेमंत टकले, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंद ठाकूर, श्रीमती विद्या चव्हाण, अॅड.राहुल नार्वेकर, श्री.जयवंतराव जाधव, श्री.अमरसिंह पंडित :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वारणानगर (कोल्हापूर) येथील शिक्षक कॉलनीतील फ्लॅटमध्ये पोलिसांनी टाकलेल्या धाडीत ९ कोटी १८ लाखांची रक्कम पोलिसांनी लुटल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी सांगलीचे पोलीस निरीक्षक श्री.विश्वनाथ घनवट आणि सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री.सुरज चंदनशिवे यांच्यासह ८ पोलीस कर्मचा-यांना दिनांक १७ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास निलंबित करण्यात आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरील प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार सदरील पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सदरील प्रकरणी एकुण ७ पोलीस अधिकारी/ कर्मचारी यांच्या विरुध्द २ गुन्हे दाखल करण्यात आले असून, सर्व संबंधीतांना निलंबित करण्यात आले आहे.
(३) या प्रकरणी अपर पोलीस अधिक्षक, कोल्हापूर यांनी चौकशी केली असून त्यांचा चौकशी अहवाल व फिर्याद यावरुन संबंधित पोलीस अधिकारी व कर्मचारी यांच्याविरुध्द कोडोली पोलीस ठाणे येथे गु.र.नं. ४८/२०१७ भा.दं.वि. कलम ४५४, ३८०, १२० (ब), १६६, १६७, ४११, ३४ व गु.र.नं. ४९/२०१७ भा.दं.वि. कलम ४५४, ३८०, १२० (ब), १६६, १६७, ३४ अन्वये २ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. सदर गुन्ह्याचा तपास रा.गु.अ.वि. कोल्हापूर पथकामार्फत सुरु आहे.
(४) विलंब झालेला नाही.

-----------------

**आंबिवली (ता.कल्याण, जि.ठाणे) येथे पोलिसांवर हल्ला झाल्याबाबत**

**(१०३) * ३२५०८ श्री.जयंत पाटील, श्री.बाळाराम पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण (जि.ठाणे) जवळील आंबिवली स्टेशनजवळ इराण्यांच्या कबिल्यात पोलीस रेकॉर्डवरील गुन्हेगार समीर इराणी आणि हसन इराणी या संशयितांना ताब्यात घेण्यासाठी दिनांक ९ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास उल्हासनगर मध्यवर्ती पोलीस ठाण्यातील पोलिसांचे एक पथक आंबिवली येथे गेले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर दोन्ही आरोपींना ताब्यात घेवून त्यांना गाडीतून नेत असताना या कबिल्यातील एका टोळीने पोलिसांवर हल्ला चढविला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या टोळीने पोलीस निरीक्षक सावंत व पोलीस नाईक महाजन यांच्या अंगावर पेट्रोलमिश्रित रॉकेल ओतून त्यांना जिवंत जाळण्याचा प्रयत्न केला, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) होय.

(४) सदरहू प्रकरणी ठाणे पोलीस आयुक्तालयातील परिमंडळ ३ कल्याण जि. ठाणे येथील खडकपाडा पोलीस ठाण्यात गु.र.क्र.। ११०/१७ भा.दं.वि. कलम ३०७, ३३२, ३५३, ३४१, १४३, १४७, १४८, १४९, ५०४, २२४ क्रिमीनल ॲक्ट ७, प्रमाणे गुन्हा दाखल असून गुन्हयातील एकुण ३ आरोपींना अटक करण्यात आलेली असुन त्यांना मा.न्यायालयात हजर करण्यात आले आहे. इतर १० आरोपींनी अटक पुर्व जामीनासाठी अर्ज केलेला आहे व तीन आरोपी अद्याप मिळून आले नाहीत.

सदर गुन्हयाचा तपास सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुंबईतील इंदू मिलच्या जागेवर भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक उभारण्याबाबत**

**(१०४) * ३१७५८ ॲड.निरंजन डावखरे, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.हेमंत टकले, ॲड.जयदेव गायकवाड : तारांकित प्रश्न क्रमांक २८१०७ ला दिनांक ८ मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई येथे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक उभारण्यात येत असून त्याकरिता शासनाने इंदू मिलची १२ एकर जागा उपलब्ध करुन दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एमएमआरडीने काढलेल्या परिपत्रकानुसार या १२ एकर जागेपैकी ५ एकर जागेवर सीआरझेडचे आरक्षण असून फक्त ७ एकर जागेवर स्मारक बांधता येणार असल्याने या स्मारकासाठी सीआरझेड च्या नियमात शिथिलता आणून संपूर्ण १२ एकर जागा उपलब्ध करुन देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त स्मारकाच्या बांधकामाच्या मालकी हक्काबाबतच्या अभिलेख्यांमध्ये फेरफार नोंदी घेण्याबाबत जिल्हाधिकारी, मुंबई यांना दिनांक २ फेब्रुवारी, २०१७ रोजी दिलेल्या सुचनांनुसार कार्यवाही करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, उक्त स्मारक आराखडे अंतिम करण्याबाबत गठीत करण्यात आलेल्या सामाजिक न्याय मंत्री यांचे एकसदस्यीय समितीने अंतिम केलेल्या आराखडयासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) शासन नगर विकास विभागाकडील दिनांक २१/११/२०१६ रोजीच्या अधिसूचनेन्वये इंदू मिल ६, माहिम नगर रचना योजना क्र.४ मधील अंतिम भूखंड क्र. ६ च्या एकंदर ४.८४ हेक्टर क्षेत्रापैकी सीआरझेडने बाधीत नसलेले २.८३ हेक्टर क्षेत्र हे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकासाठी आरक्षित झालेले आहे. यासंदर्भात केंद्र शासन पर्यावरण, वन व वातावरणीय बदल मंत्रालयाने दिनांक २३/१२/२०१६ रोजीच्या अधिसूचनेमध्ये प्रस्तावित स्मारकाचे बांधकाम अनुज्ञेय होणेसाठी सीआरझेड अधिसूचना-२०११ मध्ये सुधारणा

केल्यावर, महाराष्ट्र शासनाने सीआरझेडने बाधित असलेले उर्वरित २.०१ हेक्टर क्षेत्रही दिनांक ५/१/२०१७ रोजीच्या अधिसूचनेन्वये भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकासाठी आरक्षित केलेले आहे. इंदू मिलचे संपूर्ण क्षेत्र स्मारकासाठी आरक्षित करण्याची कार्यवाही पूर्ण झालेली आहे.

(३) याबाबतची कार्यवाही पूर्ण झालेली आहे.

(४) व (५) मंत्री (सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य) यांच्या अध्यक्षतेखालील एकसदस्यीय समितीने स्मारकाच्या आराखडयाची संकल्पना अंतिम केलेली असून त्यास शासनाची तत्वत: मान्यता देणेत आलेली आहे. त्यानुसार अंतिम नकाशे तसेच अंदापजत्रक तयार करुन निविदा मागविणेची कार्यवाही करणेबाबत महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांना दिनांक १३/४/२०१७ रोजीचे पत्रान्वये आदेश देणेत आलेले आहेत. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत निविदा मागविण्यात आलेल्या आहेत.

-----------------

## मुंबईतील वडाळा आणि चेंबूर येथील माथाडी कामगारांच्या गृहसंकुलाच्या प्रस्तावाबाबत

**(१०५) * ३१३४५ श्री.किरण पावसकर, श्री.धनंजय मुंडे, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.आनंद ठाकूर, श्रीमती विद्या चव्हाण, ॲड.राहुल नार्वेकर :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माथाडी कामगारांच्या वडाळा आणि चेंबूर येथील गृहसंकुलाचा प्रस्ताव शासनाकडे अनेक वर्षापासून प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावावर शासनाचा अंतिम निर्णय झाला आहे काय,

(३) असल्यास, वडाळा आणि चेंबूर येथे माथाडी कामगारांसाठी उभारावयाच्या गृहसंकुलाचा प्रस्ताव निकाली काढणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२) व (३) शासन ज्ञापन, महसूल व वन विभाग, दिनांक २१/०१/२००६ अन्वये “माथाडी कामगार सहकारी गृहनिर्माण संस्था” या संस्थेस मौ. चेंबुर,ता. कुर्ला येथील १,७४,३४८ चौ.मी. व मौ. वडाळा आणिक येथील ६५,००० चौ.मी. जमीन ३० वर्षाच्या भाडेपट्याने मंजूर केली आहे.

शासन ज्ञापन, महसूल व वन विभाग, दिनांक २१/०८/२००९ अन्वये या संस्थेस टी.डी.आर. वापरण्यास तसेच संस्थेस प्रदान करण्यात आलेल्या जमिनीवरील एकूण बांधकाम क्षेत्राच्या १५% क्षेत्राचा वाणिज्य वापर करण्यास परवानगी दिली आहे.

सदरहू जमीन ही माथाडी कामगारांच्या सहकारी गृहनिर्माण संस्थेस मंजूर करण्यात आली असल्याने, टी.डी.आर. अन्वये उपलब्ध होणाऱ्या नवीन बांधकामामध्ये तयार होणाऱ्या सदनिकां करिता माथाडी कामगारांव्यतिरिक्त इतर कोणासही शासनाच्या पूर्वपरवानगीशिवाय सभासद म्हणून सामावून घेता येणार नाही, अशी अट घातलेली आहे.

तथापि, सदर संस्थेने माथाडी कामगारांव्यतिरिक्त, शासन निर्णय, महसूल व वन विभाग दिनांक २५/०५/२००७ अनुसार पात्र सभासद घेण्यास परवानगी मिळणेबाबत शासनाकडे विनंती केलेली आहे.

त्याचप्रमाणे मा.मुंबई उच्च न्यायालयात दाखल झालेल्या एका रिट याचिकेमध्ये मा.मुंबई उच्च न्यायालयाने दिनांक २३/१२/२०१४ रोजी आदेश पारीत करुन माथाडी कामगार सहकारी गृहनिर्माण संस्थेस जमीन वाटपाच्या कार्यवाहीची फेरतपासणी करण्याचे आदेशित केले आहे. त्यानुषंगाने या प्रकरणी मंत्री (महसूल) यांच्या स्तरावर एक सुनावणी झाली असून संबंधितांना मत मांडण्याची संधी देऊन उचित निर्णय घेण्याची कार्यवाही सुरू आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसरात स्वाइन फ्लू या साथीच्या आजाराला प्रतिबंध घालण्याबाबत

**(१०६) * ३३३७३ श्रीमती स्मिता वाघ, डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे व पिंपरी-चिंचवड परिसरात स्वाइन फ्लू आजाराची साथ वाढत असून ऐन उन्हाळयात या आजाराचे शेकडो रुग्ण आढळल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या साथीच्या रोगाने ११ रुग्णांना आपले प्राण गमवावे लागले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, स्वाइन फ्लू या साथीच्या आजाराला प्रतिबंध घालण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) पुणे महानगरपालिका परिसरात एप्रिल, २०१७ च्या दरम्यान ३२१ संशयित रूग्णांपैकी ९८ बाधित रूग्ण आढळून आले असून त्यापैकी १७ रूग्ण मृत्यू पावले.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका परिसरात माहे एप्रिल, २०१७ मध्ये एकूण ६० बाधित रूग्ण आढळुन आले असून त्यापैकी ६ रूग्णांचा मृत्यू झाला आहे, ही वस्तुस्थिती आहे.

(३)

- बाधीत रूग्णांच्या व मृत्यू पावलेल्या रूग्णांच्या घरी जाऊन निकटवर्तीयांच्या व आसपासच्या घरांचे सर्व्हेक्षण करण्यात येते.
- मनपाच्या सर्व दवाखाने व रूग्णालयामार्फत हाय रिस्क गृप यांना नियमित मोफत एच वन एन वन लसीकरण करण्यात येते.
- जनजागृती करण्यासाठी स्थानिक वृत्तपत्रामध्ये जाहीर आवाहन वेळोवेळी प्रसिध्दी करण्यात येते.
- शासनाकडून वेळोवेळी स्वाईन फ्लू औषध उपलब्ध करण्यात येत आहेत, तसेच आवश्यकता असल्यास पुणे महानगरपालिकेमार्फत औषधे खरेदी करण्यात येतात.
- स्वाईन फ्लू बाबत नागरिकांना माहिती देण्यासाठी हेल्पलाईन सुरू करण्यात आली आहे.
- फ्लूसह सर्व साथीच्या रोगांचे सर्व्हेक्षण सुयोग्यरित्या होणेसाठी महानगरपालिकातील वैद्यकीय विभागामार्फत खाजगी व्यावसायीक रुग्णालय आणि प्रयोगशाळा यांच्याशी नियमित समन्वय साधला जातो. व या सर्व घटकांकडून दैनंदिन स्तरावर माहिती संकलीत केली जाते.
- स्वाईन फ्लू रुग्णांसाठी आय.सी.यु. कक्षामध्ये बेड उपलब्ध करून दिला जातो. ज्या ठिकाणी आय.सी.यु. बेड व व्हेंटीलेटर्स उपलब्ध आहेत अशा ठिकाणी स्वाईन फ्लू रूग्ण दाखल करून घेतले जातात व त्याची माहिती दैनंदिन स्तरावर महानगरपालिकेस तातडीने कळविण्यात येते अशी व्यवस्था करणेत आलेली आहे.
- पिंपरी चिंचवड कार्यक्षेत्रात १५० ठिकाणी स्वाईन फ्लू फ्लेक्स लावण्यात आले, ३ लाख नागरींकांमध्ये फ्लू बाबत माहितीपत्रक वाटप करण्यात आले, तसेच एस.एम.एस. व्दारे जनजागृती करण्यात आली आहे व फ्लू बाबत जाहीर निवेदने मनपामार्फत देण्यात आले.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**औरंगाबाद महानगरपालिकेत पाणीटँकरच्या देयकात गैरव्यवहार झाल्याबाबत**

**(१०७) * ३२१८७ श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद शहरात टँकरने पाणीपुरवठा करण्यासाठी महानगरपालिका दरमहा अंदाजे रुपये ४० लक्ष खर्च करते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महानगरपालिका ७० ते ७५ खाजगी टँकर्सद्वारे पाणीपुरवठा करते परंतु, टँकर्सऐवजी, दुचाकी वाहनाचे क्रमांक देऊन प्रतिमहा ४० लाखाचा आर्थिक गैरव्यवहार केला जातो, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे अशंत: खरे आहे.

औरंगाबाद शहरात टँकरने पाणीपुरवठा करण्यासाठी महानगरपालिकेकडून खालील प्रमाणे दरमहा खर्च करण्यात आलेला आहे.

| | | |
|---|---|---|
| फेब्रुवारी २०१७ | - | रुपये १९.८९ लक्ष (२० दिवस) |
| मार्च २०१७ | - | रुपये ३४.९२ लक्ष |
| एप्रिल २०१७ | - | रुपये ४१.४१ लक्ष |
| मे २०१७ | - | रुपये ४३.७२ लक्ष |

(२) हे, खरे नाही.

या अनुषंगाने वर्तमानपत्रात दिनांक ०५/०४/२०१७ रोजी प्रसिध्द झालेल्या बातमीच्या संदर्भात औरंगाबाद महानगरपालिकेने त्याच दिवशी संबंधित वर्तमानपत्राकडे बातमीत तथ्य नसल्याबाबतचा खुलासा केलेला आहे.

औरंगाबाद शहरात पाणीपुरवठा करण्यासाठी प्रादेशिक परिवहन अधिकारी, औरंगाबाद यांचेकडून नोंदणी झालेले टँकर वापरलेले आहेत असे औरंगाबाद महानगरपालिकेने कळविलेले आहे.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**कोल्हापूर येथे पोलीस आयुक्तालय स्थापन करण्याबाबत**

**(१०८) * ३११२८ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयात गुन्हयांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत असून वाढते गुन्हे रोखण्यासाठी आणि पोलीस यंत्रणा अधिक सक्षम होण्यासाठी अनेक वर्षापासून येथे पोलीस आयुक्तालयाची मागणी प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जनतेतून होणाऱ्या मागणीनुसार शासनाने निर्णय घेऊन येथे पोलीस आयुक्तालयाची स्थापना करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी कोल्हापूर येथे पोलीस आयुक्तालय निर्माण करणेबाबतचा प्रस्ताव दिनांक २५/०५/२०१६ च्या पत्रान्वये शासनास सादर केला आहे. सदर प्रस्ताव वित्त विभागाच्या मान्यतेस्तव सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावावर वित्त विभागाने उपस्थित केलेल्या विविध मुद्यांच्या अनुषंगाने पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्याकडून माहिती मागविण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील प्रमुख शहरातील प्रदुषणात वाढ होत असल्याबाबत**

**(१०९) * ३१६९६ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात होणारी बेसुमार वृक्षतोड आणि दिवसरात्र धावणा-या वाहनांमार्फत होणारे वायु प्रदूषण तसेच प्रमुख शहरांमध्ये असणारी वस्त्यांची आणि वाहनांची दाटी, धुळीचे वाढते प्रमाण यामुळे दम्याच्या रुग्णांचे प्रमाण गेल्या पाच वर्षात दुप्पट झाले असल्याची बाब निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्याच्या प्रमुख शहरांमध्ये वाढत्या शहरीकरणामुळे त्या त्या शहरातील प्रदूषणाची पातळी झपाट्याने वाढत असून शहरांमधील दम्याच्या रुग्णांची संख्याही वाढत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्याचप्रमाणे रस्ते व बांधकामाच्या नावाखाली अनेक ठिकाणी वृक्षतोड करण्यात आल्यामुळे शहरातील हवा शुद्ध ठेवणारी नैसर्गिक यंत्रणा कमकुवत झाली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, प्रदुषणाच्या वाढत्या समस्येवर मात करण्यासाठी केंद्र शासनाच्या 'स्वच्छ भारत' अभियानाच्या धर्तीवर राज्य शासन 'स्वच्छ हवा' ही योजना राबविण्यासाठी कोणती उपाययोजना करणार आहे
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) वाढत्या वायु प्रदुषणामुळे दम्याच्या रुग्णांची संख्या वाढत असल्याच्या स्वरुपाची बाब निदर्शनास आलेली नाही. तथापि, कोल्हापुर, नाशिक या शहरातील दम्याच्या रुग्णांची संख्या घटल्याचे महानगरपालिकांच्या अहवालावरुन दिसुन येते.
(३) अत्यावश्यक परिस्थितीत विकास कामात अडथळा येऊ नये, या दृष्टीने वृक्षतोड करण्यास महानगरपालिका स्तरावरुन परवानगी देण्यात येते. तथापि, अशा वृक्षतोडीच्या बदल्यात महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम, १९७५ कलम ८(५) अन्वये नवीन वृक्ष लागवड करण्याची अट विहित केली आहे.

वायु प्रदुषणाच्या नियंत्रणाकरीता केंद्र शासनाने वायु (प्रदुषण प्रतिबंध व नियंत्रण) कायदा १९८१ अन्वये तरतुदी विहीत केलेल्या आहेत. त्याबाबत विविध प्राधिकरणामार्फत कार्यवाही करण्यात येते.
(४) राज्य शासनाच्या महत्वाकांक्षी वृक्ष लागवड कार्यक्रम अंतर्गत नागरी स्थानिक स्वराज्य संस्था व नगर विकास विभागाच्या अखत्यारीतील क्षेत्रिय कार्यालयांना सन २०१७ मध्ये ७८८६५० वृक्षारोपणाचे उद्दिष्ट ठरवुन दिले आहे.

वृक्षारोपणाच्या माध्यमातुन प्रदुषण नियंत्रण व हवा स्वच्छ राहण्यासाठी नागरी स्थानिक स्वराज्य संस्था प्रयत्नशील आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील पोलीस ठाण्यात सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसविण्याबाबत

**(११०) * ३०९५८ श्री.नरेंद्र पाटील, श्री.धनंजय मुंडे, श्री.हेमंत टकले, श्री.सुनिल तटकरे, श्री.किरण पावसकर, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील पोलीस कोठडीत होणारे मृत्यू रोखण्यासाठी पोलीस ठाण्यात सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसविण्याचे आदेश मा.न्यायालयाने देवूनही मुंबईतील ९३ पोलीस ठाण्यांपैकी ६८ पोलीस ठाण्यांमध्ये सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसविले नसल्याचे माहे एप्रिल,२०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले तद्नुसार सर्वच पोलीस ठाण्यांमध्ये सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसविणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) मा. उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार पोलीस आयुक्त, मुंबई यांच्या कार्यक्षेत्रातील २५ संवेदनशिल पोलीस ठाण्यातील चार्जरुम, लॉक अप, मार्गिका, स्टेशन हाऊस इ. ठिकाणी प्रायोगिक तत्वावर सदर पोलीस ठाण्यात प्रत्येकी ५ सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यासाठी गृह विभाग शासन निर्णय दिनांक २३/११/२०१५ अन्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. सदर सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत. तसेच गृह विभाग शासन निर्णय दिनांक ६/१/२०१७ अन्वये सदर २५ पोलीस ठाण्यांमध्ये अधिकचे ४१० सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यासाठी प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. त्याबाबत माहिती व तंत्रज्ञान विभागामार्फत निविदा प्रक्रिया राबविण्यात येत आहे.

तसेच स्थानिक नागरिकांच्या मदतीने पोलीस आयुक्त, मुंबई यांच्या कार्यक्षेत्रातील सर्व ९३ पोलीस ठाण्यामध्ये ५०६ सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## रॉयल ट्विंकल स्टार क्लब व सिट्रस चेक इन्स या कंपनीच्या संचालकांनी गुंतवणूकदारांची फसवणूक केल्याबाबत

**(१११) * ३१२४९ श्री.जगन्नाथ शिंदे, श्रीमती विद्या चव्हाण :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मिराह ग्रुपच्या अंतर्गत असलेल्या रॉयल ट्विंकल स्टार क्लब व सिट्रस चेक इन्स या कंपनीच्या माध्यमातून संचालकांनी दामदुप्पट, दाम तिप्पटच्या नावाखाली १५ लाख गुंतवणूकदारांची सन २००८ मध्ये फसवणूक करून ७५०० कोटी रुपयांचा गैरव्यवहार केल्याबाबतची तक्रार गुंतवणूकदारांनी मा.मुख्यमंत्री महोदय यांच्याकडे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कंपनीच्या संचालकांवर फौजदारी गुन्हे दाखल करून त्यांची मालमत्ता जप्त करून त्यातून गुंतवणूकदारांचे पैसे तातडीने मिळावेत अशी मागणी मा.मुख्यमंत्र्यांकडे सिटीझन्स जस्टीस प्रेस कौन्सिल ऑफ महाराष्ट्राचे सरचिटणीस श्री.रफिक मुलाणी यांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) होय. सदर तक्रार मा.मुख्यमंत्री सचिवालय येथे दिनांक २६/४/२०१७ रोजी प्राप्त झालेली आहे.
(३) रॉयल ट्विंकल स्टार क्लब प्रा.लि. यांनी मा. सर्वोच्च न्यायालय व सेक्युरीटीज अपीलेट ट्रिब्युनलच्या आदेशाने कंपनीचे कामकाज थांबविले आहे. सदर रॉयल ट्विंकल स्टार क्लब व सिट्रस चेक इन्स या कंपन्यांवर नॅशनल कंपनी लॉ ट्रिब्युनल यांनी प्रशासक नेमला असून सेक्युरीटीज अपीलेट ट्रिब्युनलच्या आदेशाप्रमाणे गैरअर्जदार कंपनीला गुंतवणूकदारांना रक्कम परत करण्यासाठी दिनांक २/२/२०१८ पर्यंत मुदतवाढ दिलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर शताब्दी रुग्णालय (कांदिवली) येथील कंत्राटी कामगारांना सुधारित वेतन व मूलभूत सोयी-सुविधा लागू करण्याबाबत

**(११२) * ३०९३३ श्रीमती विद्या चव्हाण, श्री.किरण पावसकर, श्री.धनंजय मुंडे, श्री.हेमंत टकले, ॲड.राहुल नार्वेकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई उपनगरातील कांदिवली येथील महानगरपालिकेचे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर शताब्दी रुग्णालयातील दलित, मागास, दुर्बल व महिला कंत्राटी कामगारांना किमान वेतन कायद्यानुसार सुधारित वेतन व मूलभूत सोयी-सुविधा लागू करण्याबाबत सुमारे २०० हून अधिक कंत्राटी कामगारांनी श्रमजीवी कामगार संघटनेच्या नेतृत्वाखाली ठेकेदार व प्रशासनाच्या विरोधात माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान आंदोलन करीत असल्याबाबत समर्थन या संस्थेने मा. मुख्यमंत्री, मा.कामगार मंत्री, सचिव (कामगार) व आयुक्त (कामगार) यांच्याकडे दिनांक २४ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन देऊन निदर्शनास आणले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर महानगरपालिका रुग्णालय प्रशासनाने कामगार पुरविण्यासाठी स्वयंसेवी संस्था (NGO) मार्फत ठेकेदार नेमून या कंत्राटी कामगारांचे वेतन प्रत्यक्षात रुपये ५,००० देऊन त्यांच्याकडून सेवा केली जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत व्यवहाराची शासनाने चौकशी करून महानगरपालिकेतर्फे शासनाच्या कामगार कायद्यानुसार अनुदानास पात्र ठरलेल्या कंत्राटी कामगारांना किमान मासिक वेतन रुपये १५,००० हजार देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर रुग्णालयात ५० बहुउद्देशीय कामगारांच्या सेवा ४ स्वयंसेवी संस्थांमार्फत (NGO) व १२१ सफाई कामगारांच्या सेवा ९ स्वयंसेवी संस्थांमार्फत घेण्यात आल्या आहेत.

किमान वेतन अधिनियमातील तरतुदीनुसार वेतन देण्याबाबत तसेच कामगारांच्या भविष्य निर्वाह निधीच्या व कामगार विमा रक्कमा संबंधित यंत्रणेकडे जमा करण्याबाबतच्या अटी या संस्थांशी केलेल्या करारात समाविष्ट आहेत.

किमान वेतन अधिनियमातील तरतुदीनुसार कंत्राटी कामगारांना प्रतिदिन रुपये ५५०/- वेतन देण्यात येत आहे याची पडताळणी केल्यानंतर या संस्थांना महानगरपालिकेमार्फत सदर रकमेचे अधिदान करण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात पत्रकारांवर होणारे हल्ले रोखण्याबाबत

**(११३) * ३१००८ श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर, आर्कि.अनंत गाडगीळ : तारांकित प्रश्न क्रमांक २७८४३ ला दिनांक १५ मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मागील पाच वर्षात पत्रकारांवरील हल्ल्यांच्या ३४१ घटना घडल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले असून पत्रकारांवर होणारे वाढते हल्ले रोखण्यासाठी सन २०१७ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात शासनाने पत्रकारांच्या सुरक्षेसाठी कायदा करण्याचे आश्वासन दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पत्रकारांच्या सुरक्षेसाठी आहेत ते कायदे पुरेसे असून एखाद्या विशिष्ट व्यवसायासाठी वेगळा कायदा बनविला जाऊ शकत नाही असे मा.केंद्रीय गृह राज्यमंत्री यांनी लोकसभेतील प्रश्नोत्तराच्या वेळी स्पष्ट केल्याने राज्यात पत्रकारांवर होणारे हल्ले रोखण्यासाठी कायदे तयार करण्याबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पत्रकारांना कायदेशीर संरक्षण मिळावे, पत्रकारांवर हल्ला हा अजामिनपात्र गुन्हा ठरवावा आणि हल्ल्याचे खटले जलदगती न्यायालयामार्फत चालवावेत याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.
(२), (३) व (४) पत्रकारांवर होणारे हल्ले रोखण्यासाठी कायदा तयार करण्याकरिता विधानमंडळाच्या सन २०१७ च्या अर्थसंकल्पिय अधिवेशनामध्ये विधेयक सादर करण्यात आले. त्यास विधान सभा व विधान परिषद या दोन्ही सभागृहांनी मान्यता दिली असून मा.राज्यपाल महोदयांनी प्रस्तुत विधेयक मा.राष्ट्रपती महोदयांच्या मान्यतेसाठी केंद्र शासनाकडे पाठविले आहे.

-----------------

**राज्यात कायदा व सुरक्षा राखण्याकरिता पोलिसांच्या संख्येत वाढ करणेबाबत**

**(११४) * ३१४७० श्री.हेमंत टकले, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, ॲड.जयदेव गायकवाड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र राज्याची लोकसंख्या सुमारे १२ कोटी असून १ लाख लोकांच्या रक्षणासाठी केवळ १६८ पोलीस कार्यरत असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तदनुसार राज्यात कायदा व सुरक्षा राखणाऱ्या पोलिसांच्या संख्येत वाढ करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.
(२) राज्याची लोकसंख्या विचारात घेता राज्य पोलीस दलातील पोलीस अधिकारी/कर्मचारी यांची विविध संवर्गातील एकुण ६१४९४ पदे पाच टप्प्यामध्ये निर्माण करण्यास तत्वत: मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी पदनिर्मितीच्या पाच टप्प्याचा एकत्रित प्रस्ताव शासनास सादर केला आहे. त्यानुषंगाने पदनिर्मितीच्या पहिल्या टप्प्यामध्ये विविध शासन निर्णयांन्वये एकुण १२२९७ पदे निर्माण करण्यास मान्यता देण्यात

आली आहे. तसेच पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी पदनिर्मितीच्या दुसऱ्या टप्प्यामध्ये १२५४९ पदे निर्माण करण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर केला आहे. सदर प्रस्ताव वित्त विभागाच्या मान्यतेस्तव सादर करण्यात आला असता त्यावर वित्त विभागाने त्यांच्या दिनांक २५/०५/२०१७ च्या शासन निर्णयानुसार पोलीस दलाचा आकृतीबंध निश्चित करुन प्रस्ताव फेरसादर करावा असे अभिप्राय दिले आहेत. त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :** **उत्तमसिंग चव्हाण**
**मुंबई.** **सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.